# कॉंग्रेसमधील जहाल गटाचे प्रणेते

## बाळ गंगाधर टिळक

## १८९०–१९०८

लेखिका

मंदा भिवगडे

मार्गदर्शिका

डॉ. शांता कोठेकार
एम ए. पी. एच. डी.

पदव्युत्तर इतिहास विभाग
नागपूर विद्यापीठ नागपूर

नागपूर विद्यापिठाच्या इतिहास
विभागाच्या एम. फिल. पदवीसाठी
सादर केलेला लघुशोध निबंध

१९८४–८५

<u>प्रमाणपत्र</u>

कु. मंदा भिवगडे यांनी उपलब्ध साधने परिश्रमपूर्वक अभ्यासून "काँग्रेसमधील जहाल गटाचे प्रणेते बाळ गंगाधर टिळक १८९० – १९०८" हा लघुशोध निबंध लिहिला आहे. हा प्रबंध नं. १६४ नुसार नागपूर विद्यापीठाच्या एम. फिल. [इतिहास] परिक्षेसाठी सादर करण्यास योग्य आहे असे मी प्रमाणित करते.

नागपूर :

दिनांक : जुलै १९८५

SKothekar.

डॉ. शांता कोठेकर

# ऋ ण नि र्दे श

लघु शोध प्रबंधाच्या विषयाची निवड करतांना आणि त्या विषयाचा अभ्यास करतांना माझ्या मार्गदर्शिका डॉ. शांता कोठेकर, स्नातकोत्तर इतिहास विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे बहुमोल मार्गदर्शन मला लाभले. याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. तसेच डॉ. कृ. आ. शेटे, पदव्युत्तर इतिहास विभाग, अधिव्याख्याता यांचे मला मौलिक सहकार्य लाभले याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.आणि नागपूर विद्यापीठाचे इतिहास प्रमुख डॉ. मुजुमदार यांनी इतिहास संशोधनातील नविन क्षेत्र लक्षात आणून दिल्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. स्नातकोत्तर विभाग ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. माहूरकर व इतर कर्मचारी वर्ग आणि नागपूर विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयाच्या ग्रंथपाल आणि त्यांच्या सहकार्यांनी अनेक दुर्मिळ संदर्भग्रंथ मला उपलब्ध करून माझ्या अभ्यासात महत्वपूर्ण मदत केली याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

नागपूर :

दिनांक ५ जुलै '१९८५

मंदा भिकाडे

कु. मंदा भिकाडे

# प्रस्तावना

आधुनिक भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात टिळकांच्या जहाल राजकारणाला अतिशय महत्वपूर्ण स्थान आहे. त्यांच्या लोकजागृतीच्या चळवळीमुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला नवी दिशा मिळालेली दिसते. टिळकांच्या जहाल राष्ट्रवादी राजकारणाने देशात इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध, त्यांच्या शासन-प्रणालीबद्दल भारतीय जनतेमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली. टिळकांच्या राजकीय लेखांद्वारे त्याला खत-पाणी मिळाले.

गुलामगिरीत खितपत पडलेल्या आपल्या मायभूमीला स्वतंत्र करण्याकरीता वाटेल तो त्याग करण्याची भावना लोकांमध्ये जागृत करण्याचे कार्य, तसा आदर्श स्वत: त्यांच्यापुढे ठेवून टिळकांनी केले. स्वत: तुरुंगात जाऊन लोकांसमोर एक क्रियाशील व त्यागी राजकीय नेत्याचा प्रभावी आदर्श भारतीय जनतेसमोर ठेवला. आपल्या देशाला प्रभावशाली प्राचीन इतिहास आहे, याची जाणीव लोकांना करून देऊन भारतीय जनतेतील न्युनगंडाची भावना नष्ट करून त्यांची अस्मिता जागृत केली. त्यांची देशभक्ती व स्वाभिमान जागृत केला. इंग्रज सरकार भारतीयांची आर्थिक पिळवणूक कशी करीत आहे याची जाणीव टिळकांनी आपल्या केसरीतील लेखांद्वारे आणि वेळोवेळी केलेल्या भाषणाद्वारे जनतेला करून दिली.

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर प्रचलित असलेल्या मवाळ गटाच्या ध्येयधोरणाला विरोध करून त्यांनी सक्रिय व लढाऊ

राजकारणाचा शुभारंभ केला व राष्ट्रीय चळवळीला नवे वळण दिले. टिळकांचे जहाल राजकारण १८९१ पासूनच ख-या अर्थाने सुरु झाले होते. १८९१-१९०८ हा काळ त्यांच्या जहाल राजकारणातील सुवर्णकाळ मानला जातो. या काळात त्यांच्याइतका प्रभावी व कृतिप्रवण नेता भारतीय राजकारणाच्या क्षेत्रात दुसरा झाला नाही. १९०८ च्या तुरुंगवासानंतर मात्र त्यांच्या जहाल राजकारणाला ओहोटी लागली.

टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जहाल राजकारणाबद्दल उलट सुलट विचार व मते व्यक्त केली गेली. त्यांच्या टिकाकारांच्या व समर्थकांच्या मतांच्या व अभिप्रायांच्या संदर्भात टिळकांच्या जहाल राष्ट्रवादाचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

या लघुशोध निबंधात टिळकांच्या लेखांच्या आधारे महाराष्ट्रातील जहाल राष्ट्रवादाचे प्रणेते म्हणून टिळकांचे मूल्यमापन करण्याचा प्रयास केला आहे. यासाठी त्यांनी केसरीत लिहिलेले लेख व त्यांनी राष्ट्रीय चळवळीच्या दरम्यान वेळोवेळी केलेली भाषणे आधाराला घेऊन विवेचन केले आहे. महाराष्ट्रातील जहाल-वादाचे ते प्रणेते व एकस्तंभी आधार होते व त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे राजकारण मागे पडले व ते पुढे चालविण्यास त्यांच्या पश्चात त्यांच्या इतका प्रभावी नेता महाराष्ट्रात पुढे आला नाही असे आढळून येते.

---

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण १ : | बाळ गंगाधर टिळकांचे पूर्वजीवन .. | 1–18 |
| प्रकरण २ : | महाराष्ट्रात जहाल विचारप्रणालीची उत्क्रांती .. .. .. | 19 – 66 |
| प्रकरण ३ : | टिळकांच्या जहालवादाचा राष्ट्रीय आविष्कार .. .. .. | 67-107 |
| प्रकरण ४ : | समालोचन .. .. .. | 108-126 |
| | संदर्भग्रंथसूची .. .. .. | 127-129 |

प्रकरण १ले

# बाळ गंगाधर टिळकांचे पूर्वजीवन.

१८५६-८१.

## प्रकरण १ ले

## बाळ गंगाधर टिळक यांचे पूर्व जीवन

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात काँग्रेसने बजावलेली कामगिरी बहुमोल आहे. या संघटनेने नानाविध विचारसरणींचे, आदर्शांचे, भिन्न गुण वैशिष्ट्यांचे लोक आपल्यात सामावून घेतले आणि त्यांचा राष्ट्रीय चळवळीसाठी योग्य तो उपयोग करून घेतला. आरंभीला काही वर्षे मवाळ नेमस्त नेत्यांच्या प्रभावाखाली असलेली ही संघटना विसाव्या शतकाच्या आरंभी जहालांच्या हाती जाण्याची चिन्हे दिसू लागली. या जहाल गटाचे प्रणेते बाळ गंगाधर टिळक हे होत. काँग्रेसमध्ये त्यांनी सक्रिय भाग घेवू लागल्यानंतर काही वर्षातच त्यांनी प्रखर राष्ट्रवादी जहाल गट आयोजित केला, व त्यांच्या मृत्युबरोबरच या गटाचे अस्तित्व लयाला गेले. म्हणूनच जहाल गटाचे प्रणेते व सूत्रधार म्हणून टिळकांचे स्थान मोलाचे आहे. त्यांच्या प्रारंभीच्या जीवनकाळात त्यांच्या जहाल विचारसरणीची बीजे रूजलेली आढळतात.

### जन्म आणि शिक्षण :

बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ ला भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील रत्नागिरी जिल्ह्यात दापोली येथे झाला. त्यांचे जन्मनाव केशव आणि बळवंत होते. बळवंत वरून "बाळ" हे टोपण नाव पडले. "टिळकांच्या जन्मकाळच्या परिस्थितीत त्यांची भावी महानियता सूचित करणारी कोणतेही चिन्हे दृगोचर होत नाही. साधारण घरातच त्यांचा जन्म झाला पण आज मात्र त्या घराची जोपासना राष्ट्रीय स्मारक म्हणून केली जाते.[१] आणि टिळकांच्या कुंडलीवरून जितकी

---

१. डॉ. करंदीकर म.अ. - आधुनिक भारताचे शिल्पकार, पृ. ४

भविष्ये वर्तविली गेली. त्याहून दुसऱ्या कोणत्याही कुंडलीवरून आजवर पर अधिक भविष्ये चुकली तितकी दुसऱ्या कोणत्याही कुंडलीवरील भविष्य चुकली नसतील. चिखल गावची खोती कुटुंबात वंशपरंपरेने चालू असल्यामुळे या कुटुंबाला थोडीबहुत प्रतिष्ठा लाभलेली असली तरी त्या खोतीचे उत्पन्न तुटपुंजेच होते.[२]

टिळकांना बालपणीच घरी अक्षर ओळख बाराखड्या, संस्कृत श्लोक, तोंडचे हिशेब, तिथी, वार, नक्षत्रे, महिने उजळणी हे त्या काळातील प्राथमिक शिक्षण मिळाले. १८६१ मध्ये दाभोळ येथे इंग्रजांच्या प्रभावाने निघालेल्या शाळेत घालण्यात आले. १८६६ मध्ये वडिलांची बदली पुण्याला झाल्यामुळे सिटी स्कूल मध्ये तीन इयत्ता केल्यानंतर १८६९ साली हायस्कूलमध्ये पाचव्या वर्गात बाळचे नाव घातले.

पुण्यास आल्यानंतर थोड्याच दिवसात टिळक [२४ जुले १८६६] मातृसुखास मुकले आणि १८७२ ला वयाच्या सोळाव्या वर्षी वडील वारले.[३] टिळकांना संस्कृत व गणित या विषयाची गोडी पैतृक वारसाने लाभली होती. बुध्दिमत्ता व हट्टवादीपणा या दोन गुणावगुणांच्या लीलांशिवाय त्यांच्या बालचरित्रात विशेष काही घडले असे वाटत नाही. टिळकांचा विवाह त्या काळच्या रूढीला धरून सोळाव्या वर्षी, वडिलांच्या निधनाच्या काही महिने अगोदर मे १८७१ ला दापोली गावातील बल्लाळांची कन्या तापी हिच्याशी झाले.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

२. केळकर न. चिं. लो. टिळक यांचे चरित्र, पृ. २१

३. धनंजय कीर : लोकमान्य टिळक, पृ. ८

१८७३ मध्ये टिळक डेक्कन कॉलेजात दाखल झाले. तेथील पाच वर्षे त्यांच्या दृष्टीने अत्यंत सुखसमाधानी आणि निश्चिंतपणाची ठरली.[४] "टिळकांची अभ्यास करण्याची पध्दत वेगळी होती. अभ्यास करायचा तो थोडा व निवडक आणि परिक्षेत अमुक वर्ग किंवा स्कॉलरशिप मिळवीन अशी महत्वाकांक्षा धरलेली नसल्यामुळे विद्यार्थी या नात्याने त्यांची कीर्ति विशेष झाली नाही. पण जो विषय समोर असेल त्याच्या मुळापर्यंत जाण्याची त्यांची प्रवृत्ती असल्याने त्या त्या विषयासाठी नेमलेल्या पाठ्यपुस्तकाखेरीज त्या संबंधाची इतर पुस्तके वाचून काढण्याकडे त्यांचा कल असे. टापटीप आणि व्यवस्थितपणा हा त्यांचा अभ्यासातील गुण सांगण्यासारखा आहे. वर्डस्वर्थ, हुट, छत्रे यासारख्या प्रतिष्ठित प्राध्यापकाकडून त्यांनी ज्ञानार्जन घेतले. त्यांच्यामध्ये वादविवाद करण्याची आवड आणि मार्मिक युक्तिवाद करण्याचे चातुर्य असल्यामुळे त्यांना "मी ब्लंट" हे टोपणनाव देण्यात आले होते. वाह्यपणामुळे कोणी त्यांना "डेव्हील – सैतान" म्हणत. तर सर्व विषयात सारखी प्रगती आहे म्हणून "ऑल राउंडर" या नावाने टिळकांना ओळखत."[५]

कॉलेज जीवनात अनेक सहाध्यायांपैकी त्यांचा प्रगाढ स्नेह आगरकरांशी जुळला. "निश्चिंततेच्या त्या काळातही आपल्या मायभूमीचे राजनैतिक दास्य आणि आर्थिक दैन्य या विषयीचे विचार या तरुणांच्या डोक्यात थैमान घालीत असत. आपल्या स्नेह्यांना टिळक भूतकाळात १६३२ सालावर आणि भावी काळात १९३० वर दृष्टिक्षेप घालण्यास सांगत" अशी नोंद एका समकालीन लिखाणात आढळते. १८७६ मध्ये गणित विषय घेऊन

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

४. न. र. फाटक : लोकमान्य, पृ. ५

५. धनंजय कीर : लोकमान्य टिळक : पृ. १५-१६

टिळक बी.ए.ची परिक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. दोनदा प्रयत्न करूनही ते एम.ए. करू शकले नाही. १८७९ मध्ये त्यांनी कायद्याची पदवी मिळविली.[६]

टिळक व त्यांचे स्नेही आगरकर यांनी पदवी पदरात पडल्यानंतर काय करायचे याची चर्चा करण्यात "डोंगरीच्या तुरुंगात" कित्येक रात्री घालविल्या" असे आगरकरांनी कैदेत असताना लिहिलेल्या डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस" या पुस्तकात म्हणतात की, "मी [आगरकर] एम.ए.करिता व टिळक एल.एल.बी. करिता अभ्यास करण्यासाठी कॉलेजात राहिलो असता सरकारी नोकरी न पत्करता देशसेवेत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशी निश्चय केला त्या दिवसापासून आम्ही जे जे बोललो चालबो होतो त्याची पुनरावृत्ती होत असे".[७] विद्यादात्रीच्या प्रांगणातून बाहेर पडण्यापूर्वीच त्यांनी आपल्या भावी जीवनाचा मार्ग निश्चित ठरवून टाकला होता.

टिळकांनी लिहिले की, "मिशनरी संस्थाच्या धर्तीवर खाजगी शाळा काढण्याचे महत्व आणि व्यवहार्यता याविषयी मी आगरकरांशी पहिल्यांदा चर्चा केली ती डेक्कन कॉलेजमध्ये कायद्याचा अभ्यास करीत असताना १८७९ सालच्या जुलै व ऑगस्ट महिन्यात. शिक्षणाच्या क्षेत्रात एतद्देशियांनी पुढाकार घेण्याची निकड आहे या विषयी आमच्यात मुळीच मतभेद नव्हता. प्रश्न होता तो हे कार्य यशस्वी कसे करून दाखविता येईल हाच स्वार्थ त्यागाचा एकच मार्ग आमच्यासारख्या परिस्थितीच्या तरुणांना मोकळा होता. हे उघड दिसत होते. कित्येक वेळी प्रदीर्घ चर्चा केल्यानंतर

---

६. डॉ. करंदीकर, शिल्पकार, पृ. ५
७. फाटक न. र. लोकमान्य, पृ.१७

आम्ही पुढील निर्णयावर येऊन ठेपलो" लागेल तेवढा स्वार्थत्याग करून ही कल्पना प्रत्यक्षात साकार करून दाखवायचीच" या निर्धाराने आम्ही स्वतःला या कार्यात वाहून घेतले तर ही गोष्ट अशक्य नाही."[८]

पहिल्या वर्गात पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तरुणाने स्वार्थत्यागपूर्ण व एकनिष्ठेने जनतेची सेवा करण्याची प्रतिज्ञा करायची ही गोष्ट १८७९ साली अभूतपूर्व होती. सरकारी नोकरी हे तर त्या काळातील सुशिक्षित तरुणाचे ध्येय व जीवनसर्वस्व होते. जनसेवेच्या उत्साहाने भारलेल्या म. गो. रानडे सारख्यांच्या दृष्टीनेही सार्वजनिक कार्याचे स्थान दुसरेच होते, पहिले नव्हे !

१८५७ च्या राष्ट्रीय उठावाच्या भीषण आघाताने स्तिमीत झालेला देश १८७९ मध्ये सावध झाला होता. १८७६ ला दादाभाई नौरोजींनी "पॉव्हर्टी ॲंड अनब्रिटिश रूल इन इंडिया" हा ग्रंथ प्रसिद्ध केला वासुदेव फडक्यांनी १८७८ ला आपली एक बंडाचे निशाण उभारले होते. त्यातच अभूतपूर्व दुष्काळाने देशावर झाला घालून असंख्य जीवांचे बळी घेतले होते. १८७७ ला बडोद्यांच्या महाराजांवर ब्रिटिश रेसिडेंट वर विषप्रयोग केल्याचा आरोप करून गादीवरून काढले होते. त्यावेळी मल्हारराव गायकवाड महाराजांनी १८७० ला पुण्यात स्थापन झालेल्या सार्वजनिक सभेत मोठ्या हिरीरिने आपली बाजू मांडून महाराष्ट्रात खूप खळबळ उडवून दिली. कर्तृत्वशाली जीवनाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या महाराष्ट्रीय युवकांच्या मनावर या साऱ्या घडामोडींचा परिणाम झाल्यावाचून कसा राहणार? त्यात चिपळूणकरांच्या निबंध मालेचाही प्रभाव पडलेला होता.[९]

---

८. डॉ. करंदीकर, शिल्पकार, पृ. ६

९. डॉ. करंदीकर, शिल्पकार पृ. ७

<u>शिक्षण क्षेत्र :</u>

टिळक व आगरकर हे आपल्याला उपयोग होण्यासारख्या पुण्यातील पोक्त वयाच्या आणि विचारांच्या वजनदार नागरिकांनी सल्लामसलत करण्यासाठी फिरत होते. रानडे देशहिताच्या सत्कार्याचे पुरस्कर्ते त्यांनी यांना उत्तेजन दिले. "विष्णुशास्त्री चिपळूणकर सरकारी नोकरीची बेडी तोडून पुण्यात नवी शाळा काढण्याच्या विचारात असल्याची आश्चर्यक बातमी टिळक आगरकरांच्या कानी आली व त्यांनी चिपळूणकरांकडे धाव घेतली.

चिपळूणकरांना भेटून त्यांनी आपली योजना सादर केली व त्याच बैठकीत १ जाने. १८८० हा शाळा उघडण्याचा दिवस देखील निश्चित करून टाकला आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक व आगरकरांनी पुढाकार घेऊन १ जाने. १८८० ला "न्यू इंग्लिश स्कूल" ची स्थापना पुण्यात बुधवार पेठेतील मोरोदादाबादच्या वाड्यामध्ये सुरु केली. बडोद्यांच्या महाराजांना या शाळेला भेट देवून देणगी दिली. प्रस्तुत नव्या शाळेच्या पत्रकात उदार शिक्षण देण्याबद्दल पालकांचे अभिवचन होते.[10]

स्वभाषा व स्वधर्म व स्वदेशाविषयी अभिमान विद्यार्थ्यांत निर्माण करावा गतेतिहासाची स्मृती शिक्षणाच्या सहाय्याने करून देऊन राष्ट्रीय भावना जागृत केली पाहिजे. लोकमत जागृत करायचे म्हटले म्हणजे "चालू स्थितीची माहिती करून देणे किंवा सर्वांगीण शिक्षण" कार्य करणे जरूर आहे. "आमचे शिक्षण आम्ही हाती घेतले पाहिजे या भूमिकेवर टिळक आगरकरांनी शाळेला अस्तित्वात . आणले.[11] पुण्यात खाजगी

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१०. धनंजय कीर : टिळक, पृ. २६

११. गोवर्धन पारिख – भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार, पृ.८

रीतीने चालविल्या जाणाऱ्या अनेक शाळा पूर्वी होत्या. परंतु त्या शाळा धंदेवाल्यांच्या होत्या निःस्वार्थ ध्येयवाद्यांच्या नव्हत्या. पाठीशी मुळीच द्रव्य बळ नसता द्रव्य साधनाकडे साफ दुर्लक्ष करून शाळेसारख्या बिनकिफायतीच्या व्यवसायात उत्साहाने पडणाऱ्या या तरुणांचे लोकांना आश्चर्य वाटणे स्वाभाविक होते. राष्ट्रीय शिक्षणाच्या इतिहासात हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहीला जाईल.

तीन महिन्यातच मुलांची उपस्थिती ५०० पर जावून पोहचली आणि चिपळूणकरांनी दिलेले आश्वासन पहिले सत्र संपण्यापूर्वीच पूर्ण झाले. महादेव बल्लाळ, नामजोशी शिवराम आपटे. यासारखी मंडळी या शाळेला लाभली. टिळक आणि चिपळूणकरांनी पहिल्या वर्षी एक रुपयाही पगार घेतला नाही.[१२]

मुलांच्या शिक्षणाबाबत टिळक म्हणतात की, "मला असे वाटते की, देशाच्या राजकीय सामाजिक वगैरे परिस्थितीचे व ती स्थिती सुधारण्यासाठी ठरलेल्या सिध्दान्तरूप उपायांचे ज्ञान मुलांना लहानपणापासून करून देणे आवश्यक झाले आहे."[१३]

शिक्षण आयोगाचे अध्यक्ष डब्ल्यु. डब्ल्यु हंटर यांनी सप्टेंबर १८८२ ला शाळेला भेट दिली त्यावेळी या संस्थेने केवढे यश मिळविले होते, याची कल्पना त्यांच्या शिफारसपत्रावरून येईल. "स्वयंपूर्णता व स्वावलंबन ह्या ध्येयांनी भारलेल्या काही उत्साही, कर्तृत्ववान आणि बुध्दीमान तरुणांनी स्थापन केलेली ही संस्था सरकारकडून काहीही अनुदान मिळत नसतानाही या देशातील सरकारी शाळांशी यशस्वीपूर्ण स्पर्धा करू शकत आहे, इतकेच नव्हे तर इतर देशातील शाळांशी तुलना करता त्यांची ही

---

१२. डॉ. करंदीकर: आधुनिक शिल्पकार, पृ.८
१३. भोळे भा.ल., आधुनिक भारतीय राजकीय विचार, पृ. ३२१

शाळा सर्व प्रकारे बरोबरी करू शकेल."[१४]

<u>वृत्तपत्रीय क्षेत्रात टिळक :</u>

चिपळूणकर, नामजोशी, टिळक आणि आगरकर यांची लोकशिक्षणाची आशा आकांक्षा फक्त शाळा काढूनच तृप्त होणारी नव्हती त्यांना नव्या पिढी बरोबरच जुन्या पिढीलाही शहाणे करून सोडायचे होते. राष्ट्रीय पुनरुत्थानाचे वृत्तपत्राइतके प्रभावी साधन हा कल्पनेच्या नव्या क्षेत्राचा पाया आहे". हे त्यांच्या लक्षात आले. थोड्याच अवधीत नवी वृत्तपत्रे काढण्याचा संकल्प करून २ जाने १८८१ ला "मराठा" आणि ४ जाने. १८८१ ला "केसरी" ही वृत्तपत्रे इंग्रजी व मराठीतून सुरु केली केसरीच्या उद्देश पत्रकात म्हटले होते की "आम्हाला जे सत्य वाटते त्याच्या अनुरोधाने प्रत्येक विषयाची निःपक्षपाती भूमिकेतून चर्चा करण्याचा आमचा निर्धार आहे."[१५] या पत्रकात एरवीच्या वर्तमान पत्राप्रमाणे नेहमीचे विषय तर येतीलच पण याखेरीज लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथावर टीका, तसेच विलायतेतील राज्य प्रकरणांच्या वाटाघाटीचा सारांश या विषयांचा समावेश केला जाईल".[१६]

न्यू इंग्लिश स्कूलप्रमाणे या दोन्ही साप्ताहिकांनी झपाट्याने यश मिळवून दाखविले. सर्वात अधिक खप असलेल्या भारतीय वृत्तपत्राचा मान अवघ्या दोन वर्षात "केसरीने" पटकावला, तर पश्चिम भारतातील सुशिक्षित मताचे मुखपत्र म्हणून "मराठा" मान्यता पावला. केसरी चालविण्याचे काम आगरकरांनी घेतले होते. टिळकांनी केसरीचे जाहीर संपादक होण्यापूर्वी फारच कमी लेख केसरीत लिहीले आहे. त्यांनी धर्म व कायदा या

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१४. धनंजय कीर : टिळक, पृ. ३६

१५. कीर : टिळक, पृ. ३०

१६. फाटक, लोकमान्य. पृ.३५

विषयावर केसरीतील अग्रलेख लिहीले. सुरुवातीला "केसरी" व "मराठा" च्या लिखाणाबद्दल टिळक आगरकरांच्या परखड वृत्तीबद्दल बोलताना प्राध्यापक प.म. लिमये म्हणतात की, "कोणतीही अनुचित गोष्ट मग ती कितीही प्रतिष्ठा पावलेली आणि अन्याय कितीही दृढमूल झालेला असो त्यावर प्रहार करायला ते सतत सिध्द असत. आपली बाजू लढविताना सावधपणा ऐवजी लढाऊ वृत्तीची कास धरल्यामुळे टिळक आगरकरांना प्रारंभी मोठयाच अग्निदिव्यातून जावे लागले."[१७]

<u>तुरुंगवास व बर्वे प्रकरण</u> :

"केसरी" व "मराठा" या पत्रांना १८८१ च्या शेवटी शेवटी महाराष्ट्रात आधीच ज्याने अस्वस्थता उत्पन्न केली होती, असा एक विषय मिळाला. तो कोल्हापूरच्या तरुण छत्रपती शिवाजी महाराजांच्या छळाबद्दल होता. या छत्रपतींना वेडे ठरवून गादीवरुन त्यांची अटकेत रवानगी केली. अटकेत त्यांचा छळ तेव्हाचे कारभारी माधवराव बर्वे करीत आहे, अशा वंदता महाराष्ट्रात सर्वत्र पिकल्या होत्या. "केसरी", मराठयापूर्वी निरनिराळया वृत्तपत्रातून या प्रकरणाला वाचा फुटली होती. गावोगाव, घरोघरी छत्रपतींचा छळ, हाच विषय लोकांच्या तोंडी घोळत होता. "केसरी, मराठयाने" त्यात लक्ष घालून त्याला प्रसिध्दी मिळवून देताच हे प्रकरण विकोपास गेले. नाना भिडे, बक्षी, ज्ञानप्रकाशाचे मालक व चालक वामनराव रानडे, टिळक आगरकर हे सदर प्रकरणी कायद्याच्या जाळयात सापडले.[१८]

कोल्हापूरचे दिवाण श्री. माधवराव बर्वे, महाराणीसाहेब व महाराजांच्या इंग्लिश पालकांनी मिळून दत्तक अल्पवयीन महाराजांविरुध्द

---

१७. डॉ. करंदीकर : शिल्पकार, पृ. ११
१८. फाटक : लोकमान्य, पृ. ३७-३८

केलेला कट केसरी, मराठाने उघडकीस आणला पण खात्रीलायक सांगणे हा पुरावा होवू शकत नाही. या मुद्यावर नियतकालीकावर "बेअब्रु" करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सिध्द होवून १७ जुले १८८२ ला चार महिन्याच्या कारावासाची शिक्षा टिळक, आगरकर, बर्वे यांना शिक्षा झाली. भिडे, रानडे यांना दोन वर्षाची साधी कैद व हजार रूपये दंड शिक्षा देण्यात आली.[१९]

हायकोर्टाने शिक्षा फर्मावल्यानंतर टिळक आगरकरांना जे अनुभव आले त्यांचे वर्णन आगरकरांनी "डोंगरीच्या तुरुंगातील आमचे एकशे एक दिवस" या पुस्तकात सविस्तर केलेले आहे. आगरकरांच्या शब्दात, "टिळकांचा आणि माझा नाना त-हेच्या विषयावर वाद घालण्यात पुष्कळ वेळ जाई. कित्येकदा तर आम्ही रात्रीच्या रात्री बोलत घाल-विल्याचे आठवते. मी एम. ए. करिता व टिळक एल.एल.बी करिता अभ्यास करण्यासाठी कॉलेजात राहिलो असता सरकारी नोकरी न पत्करिता देशसेवेत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशी निश्चय केला, त्या दिवसापासून आम्ही जे जे बोललो, चालो होतो त्याची पुन्हापुन्हा आठवण होवून अनेक वेळा पुनरावृत्ती होत असे.

"आताप्रमाणे फिरून तुरुंगात न येण्यासाठी कोणत्या गोष्टीची खबरदारी ठेविली पाहिजे. फिरून तुरुंगात यावे लागले तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशी गोष्टी कोणत्या, वगैरे नाही नाही त्या विषयावर आमचा पुष्कळदा जोरात वाद चाले, शेवटी आगरकर लिहितात की, वर्तमान पत्रे काढून पूरे एक वर्ष झाले न झाले तो आम्हावर एक दोन बिकट प्रसंग येवून गेले त्यातून आम्ही निभावलो हे केवळ ममताळू मित्रांच्या मदतीमुळे

---

१९. कीर : टिळक, पृ. ३२-३३

झाले."[२०] आणि "आमच्या दृष्टीने तो अवमधात ठरला नसला तरी आधीच निश्चित केलेल्या मार्गाने स्वदेशाची सेवा करण्याच्या आमच्या निर्धाराला मात्र यामुळे पोलादी सामर्थ्य प्राप्त झाले."[२१]

बर्वे प्रकरण सुरु असतानाच १७ मार्च १८८२ ला चिपळूणकरांचा अकाली मृत्यू झाला. टिळक, आगरकरांचा न्य तुरुंगवास आणि चिपळूण-करांचा मृत्यु या अरिष्टांचा न्यु इंग्लिश स्कूल व केसरी", मराठा" यावर अनिष्ट परिणाम झाला नाही. उलट त्यामुळे वृत्तपत्राची कार्यक्षेत्राची कक्षा रुंदावली. "लोकमान्याच्या सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ कारावासाने झाला. सार्वजनिक महत्वाच्या मताबाबत कारावासाची शिक्षा झाल्यामुळे सार्वजनिक नेत्याचा एक नवा आदर्श टिळक व आगरकरांच्या रुपाने उभा राहिला."[२२]

२८ आक्टो. १८८२ रोजी टिळक, आगरकरांची डोंगरी तुरुंगातून सुटका झाली. त्यांची सुटका लवकरच होणार ही बातमी आधी लोकात पसरुन एका वृत्तपत्रात" त्यांना वाजत गाजत सन्मानाने आणावे" अशी इच्छा प्रदर्शित केली. टिळक आगरकरांना सुटकेपूर्वीच ही बातमी कळली तेव्हा त्यांच्या सुचनेवरुन "केसरीत" २४ आक्टो. १८८२ ला पुढील मजकूर प्रसिध्द करण्यात आला. "रा. टिळक व रा. आगरकर हे तुरुंगातून आल्यावर त्यास वाजत गाजत सन्मानाने आणावे अशी "दिनबंधु" कर्ते ह्यांनी सुचना केली आहे. ह्या संबंधाने रा. टिळक व रा. आगरकर हे आम्हास कळवितात की, "ही गोष्ट त्यास बिलकुल संमत नाही, कारण त्यांच्या

---

२०. फाटक, लोकमान्य, पृ. ४४-४५

२१. डॉ. करंदीकर : शिल्पकार, पृ. १२

२२. गोविंद तळवलकर : नौरोजी ते नेहरु, पृ. १३१

हातून हा सन्मान मिळविण्याजोगे काही महत्कृत्य अद्यापी घडून आले नाही. लोकांनी मात्र इच्छा दर्शविली. एवढेच त्यास पुरे आहे. प्रत्यक्ष मिरविण्याची काहीच जरुरी नाही."[२३]

वृत्तपत्राच्या व्यवसायात कोल्हापूरचे कारभारी बर्वे यांनी "केसरी", मराठा" या दोन्ही साप्ताहिकावर अब्रु नुकसानीची फिर्याद मुंबई येथील हायकोर्टात गुदरुन टिळकांना आगरकर टिळकांना बर्व्यांची माफी मागीतली असतांनाही चार महिन्यांची साधी कैदेची शिक्षा भोगण्याची पाळी आली.

<u>डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज</u> :

टिळक, आगरकर ऑक्टोबरमध्ये सुटून आल्यानंतर ते व इतर सहकारी यांच्यामध्ये संस्थेला जास्त नियमबध्द असे स्थायी रुप व कार्यक्षमता प्राप्त होण्यासाठी "डेक्कन एज्युकेशन सोसायटी" नावाची व्यापक संघटना अस्तित्वात आणण्याची कल्पना १८८३ ला निश्चित करण्यात येऊन नोव्हें. १८८४ मध्ये ती कायदेशीर रीतीने जाहीर करण्यात आली. संस्थेच्या संकल्प समारंभाला रानडे, भांडारकर, वेडर्बर्न, तेलंग, आपटे, गोळे, छत्रपती साहू प्रभृती या बडया देशी विदेशी गृहस्थानी उपस्थित राहून आशीर्वाद तर दिलेच पण त्यातल्या त्यात किस्येकांनी व्यवस्थापन मंडळाची कामगिरीही स्वीकारली.[२४]

शाळेच्या काहीश्या अनपेक्षित भरभराटीमुळे टिळक-आगरकर-आपटे यांच्यामध्ये कर्तृत्वाचा असा आवेश संचारला होता की, त्यांनी सोसायटी-च्या स्थापनेनंतर अवघ्या दोन महिन्यांनाच नविन कॉलेजला परवानगी

---

२३. फाटक: लोकमान्य, पृ. ४७
२४. धनंजय कीर : टिळक, पृ. ३९

मिळावी असा अर्ज मुंबई विद्यापीठाकडे पाठविला. डिसें. मध्ये त्यावर विचार होऊन परवानगी मिळताच २ जाने १८८५ ला मुंबईचे गव्हर्नर "फर्ग्युसन" यांच्या नावाने कॉलेजचे प्रत्यक्ष काम चालू झाले जुन्या इमारती-च्या एका दालनात कॉलेजचा प्रथम वर्ग भरू लागला. अध्यापकांच्या योग्यतेसंबंधी आजच्या प्रमाणे विशिष्ट दृष्टीने कडक निर्बंध नव्हते आणि असते जरी तरी त्यांना पुरून उरण्याइतकी पात्रता सोसायटीच्या पहिल्या आजीव सदस्यात होती.[25]

अनेक शाळा-महाविद्यालये चालविणारी पहिलीच संस्था होण्याचा मान या संस्थेला मिळाला. आर्य समाजाला देखील डेक्कन एज्युकेशन सोसा-यटीनेच प्रेरणा दिल्याची ग्वाही स्वतः लाला लजपतरायांनी दिली आहे. फर्ग्युसन कॉलेजने पुढे इतकी प्रगती केली की, १८८७ ला "सरकारने चालविलेले डेक्कन कॉलेज ताब्यात घेऊन संस्थेने ते फर्ग्युसन महाविद्यालयात विलीन करून टाकावे" ही सूचना नाकारल्यामुळे मुंबई सरकारकडून मिळणारे तीन हजाराचे वार्षिक अनुदान बंद करण्यात आले.[26]

<u>शिक्षण क्षेत्रातुन राजीनामा</u> :

सामाजिक सुधारणेवरून टिळकांनी सोसायटी सोडली, हा समज डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा इतिहास पहिल्यांदा निराधार वाटतो. सामाजिक सुधारणेविषयीचा वाद वृत्तपत्रात कोणती मते यावीत एवढ्या-पुरताच मर्यादित होता. खरा वाद सोसायटीच्या सभासदांचे वेतन, कमी वेतनात भर टाकणारी स्वीकृत शिक्षणाबाहेरची कामे करावी की न करावी, या प्रश्नावरून धुमसत होता आणि त्यावरूनच टिळकांना सोसायटी सोडून जावे लागले.[27]

---

२५. फाटक : लोकमान्य, पृ. ३१
२६. डॉ. करंदीकर : शिल्पकार पृ. १४-१५
२७. फाटक : लोकमान्य पृ. ५८-५९

सन १८८८ साली होळकरांनी दिलेल्या अनुदानाच्या वाटणीसंबंधी आगरकरांना टिळकांशी निकराने वाद घालावा लागला होता. विनावेतन सन्माननीय जनसेवा स्वीकारण्याला देखील विरोध करण्यात त्यांनी टोकापर्यंत ताणले, यात संशय नाही. आजीव सदस्याने स्वतःच्या शक्ती अशा प्रकारे शिक्षणेतर कार्यावर खर्ची घालायला टिळकांनी कडून विरोध केला.[२८]

सन १८८८ मध्ये सोसायटीच्या सभासदाच्या समेटाचे जे प्रयत्न झाले त्यात टिळकांना पुढाकार देवून इतरांच्या सहाय्याने त्यांनी आपल्या मनाप्रमाणे संस्था चालवाव्या. अशी एक तोड काढण्यात आली होती. एकदा गोखल्यांना सर्वांचे अनियंत्रित अधिकार देवुन पाहिले. त्या योजनेची थोड्याच दिवसात वाट लागली. मग तीन सभासदांच्या कमेटीकडे कारभार सोपवुन पाहिला. हाही प्रयोग फुकट गेला. प्रत्येक नव्या तात्कालीच्या पर्यंत लेखी सगर तोंडी रितीने आपल्या सोसायटी सोडण्याच्या संकल्पाची वाच्यता टिळकांनी केल्याचे आढळते. इतक्यात होळकरांची देणगी टिळक आगरकरांच्या पदरी पडली व तिच्यावरून टिळक आगरकरातील तेढ वाढीला लागून नवे निमित्त मिळाले.[२९]

सन १८८९ मध्ये टिळकांनी पहिली सहामाही रजेत घालविल्या-नंतर समेटाचा रंग दिसला म्हणून ते संस्थेच्या कामावर हजर झाले. वरून शांतता वाटत असली तरी सभासदांच्या अंतरंगात स्वस्थता नव्हती. ही अनिश्चित स्थिती गोखल्यांनी सार्वजनिक सभेचे चिटणीस पद स्वीकारल्याने दिखाऊ शांतता दुभंगली आणि १४ आक्टो. १८९० ला टिळकांनी त्यागपत्र

---

२८. धनंजय कीर : टिळक पृ. ४७-४८
२९. फाटक : लोकमान्य, पृ. ६३

दिले त्याबरोबरच गोखल्यांनी पण राजीनामा दिला.[30] या दोघांचे राजीनामे २१ नोव्हें ला कौन्सिलने विचारात घेऊन त्यागपत्राची कारणे सादर करावी असे टिळक गोखल्यांना कळविले. टिळकांनी आपल्या कारणांचा सांकलयक खर्डा १५ डिसें. १८९० ला संस्थेकडे पाठविला. त्यात संस्थेवर खोटया हिशेबाचा आरोप केला होता. त्याची दखल घेवून कौन्सिलने २ फेब्रु. १८९१ च्या बैठकीत आरोप निराधार असल्याचे नमूद केले. समितीचे अध्यक्ष डॉ. र. गो. भांडारकरांनी "टिळकांनी नियामक समितीच्या सदस्यावर लादलेल्या अप्रामाणिकपणाच्या आरोपाकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही" असे सांगून राजीनामा स्विकारला.[31]

प्रत्यक्ष संस्था सोडून जाण्याचा क्षण आल्यावर मात्र टिळकांना रागापेक्षा खेदच अधिक झाला. "बाहेरचे काम आणि वेतन हे दोन प्रश्न सोडविण्याचा अखंड आग्रह धरल्यामुळे मी जवळजवळ प्रत्येकाच्याच सहानुभूतीला मुकलो आहे. लोक मला इतरांच्या मार्गातील धोंड मानू लागले आहेत, इतके मी स्वतःला अप्रिय करून घेतले आहे आणि माझ्या प्रत्येक दोषावर मग तो कितीही क्षुल्लक का असेना झडप घालून तो अविश्वसनीय भासावा इतका फुगवून दाखविला जात आहे. स्वतःच्या योजनातील मुख्य ध्येयांचा मी त्याग करीत असलो तरीही त्यापासून दूर होण्याचेच कदाचित त्यांची सेवा उत्तम प्रकारे बजावू शकेल हा विचार मला दिलासा देत आहे."[32]

---

३०. डॉ. करंदीकर : पृ. १८
३१. फाटक, लोकमान्य पृ. ६७
३२. डॉ. करंदीकर : शिल्पकार, पृ. १९

टिळकांनी ज्येसुईट पंथाचे नाव पुष्कळदा आपल्या वादात ओढून त्याच्या कसोटीवर सोसायटीच्या सभासदांना हिणकस मानविले आहे. जेसुईटांचा स्वार्थत्याग म्हणजे आपल्या अपेक्षा काय? याचे स्पष्टीकरण टिळकांच्या लेखनात येत नाही.... जेसुइटांची संघटना लष्करी शिस्तीची आहे, त्यांना कसलीच मालमत्ता जवळ ठेवण्याला परवानगी नाही पंथाचे हे चरित्र असतात आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सभासदांना अशक्य होते. आप खुशीच्या स्थूल स्वार्थत्याग व निष्ठेने विद्या प्रसार एवढ्या पुरते जेसुईट व सोसायटीचे सभासद यांच्यात काही प्रमाणात साम्य दिसेल.[33] असे फाटक म्हणतात.

खरे तर टिळक म्हणतात त्या तत्वावर व टिळकांना अभिप्रेत असलेल्या त्यांच्या अर्थावर शाळेच्या उपक्रमाची उभारणी झालेली नव्हती. स्वार्थत्यागाचो पराकोटीची भावना टिळक व आगरकर यांच्या ठायीच होतो. व शाळेच्या क्षेत्रातच जखडबंध राहणारी ही मंडळीच नव्हती त्यामुळे त्यांनी बाहेरची कामे करण्यात तत्वच्युतींचा फारसा प्रश्नच येत नव्हता. त्यांच्यापैकी कोणीही शाळेच्या कामात हलगर्जीपणा केल्याचे नमूद नाही. त्यामुळे टिळकांच्या टीकेत चडयाचे तेल वांग्यावर काढण्याचा भाग अधिक असल्याचे सांगून श्री. पळशीकर म्हणतात की, सोसायटीतले भांडण हा वस्तुतः पुढारीपणाचाच झगडा होता आणि तो टिळकांनीच उपस्थित केला होता.[34]

जी संस्था महाराष्ट्रात स्वतंत्र स्वार्थ त्यागाच्या तत्वावर खाजगी शाळा काढण्यासाठी निर्माण झाली ती पुढे ग्रँटन्स इन- एडच्या लोभाने १८९८-९९ साली पूर्णपणे सरकारच्या काहयात गेलो" सोसायटीच्या या

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

33. फाटक : लोकमान्य , पृ. ७०
34. वसंत पळशीकर : नेतृत्वाची उभारणी, पृ. ७९

टिकेबद्दल कोणीही सोसायटीच्या आजीव सदस्याने काढला नव्हता असे केळकर आपल्या पुस्तकात म्हणतात.[३५]

टिळक यावर खेद करताना लिहीतात की, "११ वर्षांपूर्वी आपणापैकी काही लोक एकत्र आलो. आज इतके दिवस आपणापैकी बहुतांशी, काही एक प्रकारचे ध्येय डोळयापुढे ठेवून मेहनत केली, विरोध सोसला, उपहास करून घेतला, निराशा मिळली. यामुळे आज सोसायटी सोडून जाताना मला किती दुःख होत असेल याची कल्पना करा निदान माझ्या तरी आयुष्यातील महत्वाकांक्षा" या सोसायटीचे काम म्हणजे "शिक्षण विषयक काम करणे" हीच होती पण असे असूनही अखेर मला ही संस्था सोडून जावे लागणार आहे. अलीकडे आमच्या पैकी कित्येकात आपले जुने धोरण व तत्वे सोडण्याची प्रवृत्ती दिसत आहे. ज्यावेळी मला ती दिसली, तेव्हा मी तक्रार केली पण एकमेकांनी परस्पर बोलून टाकावी किंवा मनात जळफळावे एवढाच काय तो परिणाम झाला."[३६]

२६ डिसें. १९१९ च्या केसरीत टिळकांनी यावर खुलासा करताना लिहीले की "डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही संस्था स्थापन करण्याचे वेळी मूळ संस्थापनाचे जे उद्देश होते. ते पुढे सूटत चालले होते." डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे त्यागपत्र दिल्यामुळे टिळकांना "केसरी" व "मराठा" या पत्राकडे अधिक लक्ष पुरविता आले. लवकरच केसरीचा खप पाच हजारावर पोहचला[३७]

---

३५. केळकर : टिळक चरित्र, उत्तरार्ध, पु. पृ.२२
३६. केळकर : चरित्र पूर्वार्ध, पृ. २०३-२०४
३७. केळकर : चरित्र उत्तरार्ध, पृ. २०

२५ ऑक्टोबर १८८७ च्या अंकात केसरीने "टिळक हे प्रकाशक आणि आगरकरांचा यापुढे संपादकीय संबंध नाही असे जाहीर केले. डी.ए. सोसायटीला राजीनामा दिल्यामुळे टिळक "केसरी" कडे अधिक लक्ष देवू लागले.[३८] टिळकांनी ३०-३५ वर्षापर्यंत अनेक विषयावर लेख लिहीले त्यात राजकीय विषयावर भर होता. राजकीय चळवळीच्या भरात व लेखन व्यवसायाच्या आवडीने, त्यानंतरही प्रायः आयुष्यांच्या अखेरीपर्यंत त्यांनी केसरीत लेख लिहीले आहे. टिळकांनी २२ ऑगस्ट १८८८ च्या अग्रलेखात पहिल्यांदा राजकीय लेख लिहिला.[३९]

डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून बाहेर पडल्यानंतर टिळकांनी सार्वजनिक व राजकीय क्षेत्रात लक्ष घालण्यास सुरुवात केली हे कार्य त्यांच्या पत्रकारितेच्या कामाशी निगडीतच होते. त्यांच्या वृत्तपत्रीय लिखाणातून हळूहळू त्यांच्या जहाल विचारसरणीचा आविष्कार होवू लागला. म्हणून ही घटना त्यांच्या जीवनाला एक नवे वळण देणारी महत्वाची घटना ठरते.

---

३८. डॉ. करंदीकर : शिल्पकार, पृ. २०-२१

३९. लो. टिळक लेख संग्रह खंड १ ला, पृ. १-४

—

प्रकरण २रे

# महाराष्ट्रात जहाल विचार प्रणालीची उत्क्रांती

१८९०-९८.

## प्रकरण २ रे

## महाराष्ट्रात जहाल विचारप्रणालीची उत्क्रांती

१८९० पासून टिळकांच्या सार्वजनिक क्षेत्रातील कार्याला गती मिळाली. याच काळात त्यांच्या जहाल राजकीय विचारसरणीचा प्रगट आविष्कार होवू लागला. आणि त्यांच्या समविचारी मंडळींचा गट महाराष्ट्रात संघटित होवू लागला; त्यांना राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व लाभण्यास अनुकूल अशी पार्श्वभूमी ही या कालखंडात तयार झाली. १८९१ पासून १८९६ पर्यंत हिन्दु समाजाला क्षोभाने ग्रासणारे विषय पुण्यात व पुण्याबाहेर उपस्थित झाल्यामुळे या क्षोभाचा फायदा घेवून आपल्या पुढारीपणाचे सिंहासन टिळकांना उभे करता आले.

परकीय राज्यकर्त्यांनी भारतीय सामाजिक आणि धार्मिक चालीरीतीत हस्तक्षेप करू नये हा त्यांच्या जहाल वादाचा एक पैलू शारदा सदन प्रकरणाने उघड केला. पंडिता रमाबाईचे "शारदा सदन" हे टिळकांनी हाताळलेले असे पहिले प्रकरण असून त्यामध्ये त्यांना बिनतोड विजय मिळाला.[1]

**शारदासदन प्रकरण :**

पंडिता रमाबाईंनी स्त्री शिक्षणासाठी "शारदासदन" ११ मार्च १८८९ मध्ये ही संस्था काढली होती. रमाबाई मूळच्या हिन्दु होत्या पण अमेरिकेत जावून ख्रिस्ती धर्माची दिक्षा त्यांनी घेतली होती. टिळकांचे मत होते की, "शारदा सदन ही संस्था केवळ प्रौढ कुमारींच्या अगर विधवांच्या

---

१. फाटक, लोकमान्य, पृ. ७५

बौध्दीक आणि व्यवहारिक उन्नतीसाठी निघालेली नसून मेंढराचे कातडे पांघरुण अकस्मात घात घालणाऱ्या हिंस्त्र श्वापदासारखी आहे आणि तिचा उद्देश ख्रिश्चन धर्मप्रसार करण्याचा आहे". टिळकांनी अधून मधून केसरीमध्ये लेख लिहून यावर प्रकाश टाकण्यास सुरुवात केली. समाजसुधारक रानडे, भांडारकर आणि आगरकर या शारदासदन संस्थेचे सभासद होते. टिळकांनी या संस्थेबद्दल चौकशी करुन माहिती मिळविली तेव्हा त्यांना ख्रिस्ती धर्माच्या औदार्याचे खरे स्वरुप लक्षात आले. टिळकांनी रानडे, भांडारकरांना यापासून सावध केले. परंतु त्यांना विश्वास वाटला नाही. "सुबोध पत्रिका" आणि "सुधारक" यांनी "टिळकांचे विचार स्त्रीशिक्षण विरोधी आहे" असे म्हटले होते.[२]

टिळकांनी १८ फेब्रु. १८९० च्या केसरीत लिहिले की, "बाईंनी शारदासदना भोवताली एखादा जंगी अभेद्य कोट घालून सार्वजनिक दृष्टी त्यात शिरु दिली नसती तर आम्हाला ही उठाठेव करावी लागली नसती. दोष दाखविण्यात झाला तरी संस्था सुधारुन चालावी हाच आमचा हेतु". असे रमाबाईंच्या संशयी वागण्याबद्दल म्हटले ७ जुलैच्या अंकात "सदनावरील बाई व कोठीवरील बाई" या अग्रलेखात रमाबाईंच्या आतेबहिण कृष्णाबाईचे पत्र छापले त्यात सदनात काय प्रकार होतात याबद्दल लिहिले होते. [दि. १४ जुलैच्या अंकात केसरीच्या] मुली बाटविल्याची जबाबदारी रानडे, भांडारकरांच्या वर राहील अशी धमकी दिली होती. प्रखर लोकमताला घाबरुन त्यांनी १३ ऑगस्ट १८९३ ला या संस्थेचा संबंध राजीनामा देवून तोडले.[३]

---

२. पवित : बाळ गंगाधर टिळक, पु. ४१-४२

३. केळकर : टिळकांचे चरित्र, पूर्वार्ध ३२२-३२७

शारदासदनातील दोन मुलींनी ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यामुळे टिळकांचे म्हणणे खरे ठरले. त्यांच्या मताची जिकडे तिकडे वाहवा होवू लागली. मग रमाबाई संस्था सोडून पुण्याच्या केडगावी मरेपर्यंत राहिल्या.[४]

सार्वजनिक क्षेत्रात शारदासदन प्रकरणाप्रमाणेच संमतीवय कायद्याचे प्रकरणही टिळकांना पुढे आणण्यास कारणीभूत ठरले.

<u>संमती वय विधायक वाद :</u>

ब्रिटिश राज्यकर्त्याद्वारे सामाजिक सुधारणा लादल्या जाणाऱ्या कल्पनेला टिळकांचा विरोध होता. ते केवळ हे शासक विदेशी व बेजबाबदार होते म्हणून नव्हे तर त्यांच्या समाजाची धारणा मुळातच आपल्या समाजाहून भिन्न आहे म्हणून सामाजिक परिवर्तन जबरदस्तीपेक्षा स्वेच्छेने घडायला हवे अशी त्यांची धारणा असे.[५]

टिळकांनी केलेल्या काही चळवळी स्वतःच्या कल्पनेने नविन उभारलेल्या असल्या तरी त्यांच्या बऱ्याचशा चळवळींचे उगमस्थान तत्कालीन वादामध्ये सापडते. वाद कोणीही उत्पन्न केले असले तरी ते देशाच्या विद्यमान परिस्थितीमुळे उत्पन्न झालेले असून समाजप्रगतीच्या दृष्टीने अपरिहार्य होते. टिळकांचे मोठेपण यातच होते की, कोणताही वाद उत्पन्न झाला तर त्या वादात बोलवर भिजून आपल्या धोरणाची उद्दिष्टांची प्रगती करीत.[६] पण शारदासदन प्रकरण व संमती वय कायद्याच्या प्रकरणात टिळकांची प्रतिमा विरोधकांच्या मनात "सनातनी प्रतिमा" म्हणून खूपच उजळली.[७]

---

४. फाटक : लोकमान्य, पृ. ७५
५. डॉ. करंदीकर : आ.भा.शिल्पकार, पृ. २६
६. केळकर : चरित्र, पूर्वार्ध पृ. २४९
७. भोळे भा.ल. आधुनिक भारतीय राजकीय विचार : पृ. २३३-३४

१८८७ मध्ये बहरामजी मलबारी यांनी संमतीवय कायद्याच्या बारा कलमांचा कार्यक्रम जाहीर केला त्यापैकी कलमातील पहिल्या कलमातूनच वाद झाला.[८] इंडियन पीनल कोडमधील या कलमामध्ये महत्त्वाची दुरुस्ती करणारा हा कायदा होता. कलमाप्रमाणे "बारा वर्षाच्या लग्न झालेल्या मुलीशी संभोग झाला तर नवऱ्याला कायद्याने शिक्षा व्हावी. वस्तुतः विवाहोत्तर पतीपत्नीच्या शरीरसंबंधाचे वयोमान दहा ऐवजी बारा असावे. मुलींची लहानपणी लग्न होत असल्याने ऋतु प्राप्तीपूर्वी शरीर संबंधाचा बलात्कार घडयात मुली मृत्युमुखी पडतात याकडे लक्ष देऊन सरकारने कायद्यात फेरबदल करण्याचे ठरविले या फेरबदलामुळे धर्महानी होत नाही. उलट धर्मशास्त्र आयुर्वेद इत्यादिकांचा या दुरुस्तीला आधार असल्याची खात्रीसरकारने करून घेतली होती. शेवटी कायदा पास व्हायचा तो झालाच पण त्याला विरोध करणाऱ्या टिळकांविषयी मात्र बहुसंख्य धर्माभिमान्यांची गळती वाढली. या वादामुळे टिळक पटाईत भांडखोर म्हणून प्रसिध्दीस आले. डॉ. भांडारकर, न्या. रानडे यांच्याशीही त्यांनी वाद घातला.[९] रमेशचंद्र दत्त उमेशचंद्र बॅनर्जी, तिलवाड हे टिळकांच्या मताशी सहमत होते त्यांना सुधारणा सरकारी कायद्याने नको होती.[१०]

मलबारींच्या कारवाईचा उल्लेख ता. १२ ऑगस्ट १८९० च्या केसरीत आढळतो आणि ३० सप्टे. पर्यंत हा वाद इतका वाढला की "कायदा मागण्याचा अर्ज" या मथळ्याखाली केसरीत अग्रलेख लिहून "कायदा मागण्याच्या अर्जावर सह्या घेण्यास धूर्त लोक येतील तरी सावध रहावे" अशी सामान्य जनतेला सूचना दिली. यासाठी पुराण मतवादी लोकांनी २८ ऑक्टो. १८९० ला तुळशीबागेत जाहीर सभा भरविली दुसरी सभा १ नोव्हे. १८९० ला शनिवारला जोशी हॉलमध्ये घेण्यात आली. पण

---

८. केळकर : पूर्वार्ध पृ. २५०-५१
९. फाटक : लोकमान्य, पृ. ७५-७६
१०. पर्वते : बा.ग. टिळक, पृ. ३९

त्यात वादच अधिक झाला.

अखेर संमती वयाचे बील ९ जाने. १८९१ कलकत्ता येथे वरिष्ठ कायदे कौन्सिलात सर अँड्रयु स्कोबल यांच्यासमोर आणण्यात आले. सन १८८२ च्या फौजदारी कायद्यातील ३७५ कलमाप्रमाणे "पुरुषाचा स्त्रीशी विशिष्ट स्थितीत होणारा शरीर संबंध हा "जबरी संभोग" नावाचा गुन्हा समजला जातो. १९ मार्चला असे ठरवून बील पास करण्यात आले.[११]

२० जाने. १८९१ च्या केसरीतील अंकात संमती वय बिल विषयावरील अग्रलेखात "हिंदूंच्या सामाजिक, आर्थिक धार्मिक आचार विचारात हे विधेयक हस्तक्षेप करीत नाही अशी व्हाईसरॉय साहेबांची समजूत चुकीची कशी आहे" हे स्पष्ट दाखवून दिले. मूलकरांचे भाष्य धार्मिकदृष्टया निषिद्ध आहे असाही अभिप्राय केसरीने दिला. सुमारे दीड महिना या वादात विलक्षण स्वरुप आल्याने या विषयावर अनुकूल प्रतिकूल पत्रव्यवहार, निरनिराळया सभांच्या हकीकती इ. या विषयावरील मजकुराने केसरीचे रकानेच्या रकाने भरुन असलेले आढळतात.[१२]

टिळकांनी सोलापूर, पुणे, मुंबई येथे लोकांच्या सभा घेऊन रानडे, आगरकर भांडारकरांच्या सामाजिक सुधारणेवर टिका केली. टिळकांचे विचार हे सामान्य लोकांचे विचार होते या बिलावरुन देशभर जो वाद झाला त्याचे अग्रेसरत्व टिळकांनी गाठले.[१३]

---

११. केळकर : पूर्वार्ध, पृ. २५१-२५७
१२. केळकर : पूर्वार्ध पृ. २५८
१३. पंडित : टिळक, पृ. ३९

२७ जानेवारीच्या केसरीत टिळकांनी याच विषयावर अग्रलेख लिहून "स्कोबल साहेबांनी १२७ इजीप्त व इजीप्त १२ वर्षांपूर्वी ऋतु प्राप्ती होते" याच तत्प्रमाणाचा आधार घेऊन "शेकडा पाच लोकांस या बिलाने नाहक काळे पाणी पाहावे लागणार" असा इशारा दिला" तेलंग नूलकर, भांडारकरांसारखे शास्त्रज्ञ सुधारक या बिलास शास्त्राधार आहे असे दाखवू लागले. टिळकांना याचा निषेध व्यक्त केला. हिन्दू धर्म शास्त्रास तुच्छ लेखणाऱ्या तेलंग नूलकर यांना उत्तर देणे फारसे अवघड नव्हते. पण भांडारकरांसारख्या विद्वानाने पुढे आणलेल्या शास्त्रार्थाचे सप्रमाण खंडन करून पुराव्याचे माप त्यांच्याच पदरात घालण्याचे काम तितके सोपे नव्हते. हे काम करण्यात लोकमान्यांची सूक्ष्म बुध्दिमत्ता व शास्त्रीय वादविवाद कौशल्य उत्कटपणे दिसून आले.

बिल पास झाल्यानंतर सहाजिकच ही चळवळ मंदावली. मे मध्ये पुण्यात झालेल्या प्रांतीक सभेत टिळकांनी पुढील ठराव मांडला" संमति-बिलाचे संबंधाने जे लोकमत प्रसिध्द झाले, त्याचा योग्य विचार करणे हिन्दुस्थान सरकारास आवडले नाही. ह्याबद्दल कॉन्फरन्सला फार दिलगिरी वाटते." या ठरावावरील भाषणात टिळकांनी "लोकमताचा आदर सरकारने केला नाही. ही गोष्ट राजकीय उन्नतीच्या दृष्टीने बरी झाली नाही" असा लोकमतावर जोर देवून सुधा मांडला या ठरावाला रा. वामनराव लेले यांनी अनुमोदन दिले व तो बहुमताने पास झाला ३१ मे ला मच्छाला येथे लोकांची सभा भरली. या सभेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात हिन्दूप्रमाणे मुस्लीम जनताही सरकारच्या निषेधाकरिता सभेत सामील झाली होती.[१४]

---

१४. केळकर : पूर्वार्ध, पृ. २७४-७५

१८९० साली पुण्यात व्याख्यान देताना टिळक म्हणाले की, "विधवेचा पुर्नविवाह ही सुधारणा इष्ट वाटत असतानाही काही बहुतेक समाजसुधारक ती स्वतःच्या कुटुंबात मात्र अमलात आणीत नाही. म्हणूनच मला असे वाटते की, प्रत्येकाने सुधारणेचा प्रारंभ स्वतःपासून करावा आणि कोरडे सिध्दान्त सांगण्याऐवजी स्वतःच्या आचरणाने प्रत्यक्ष उदाहरण घालून देवून इतरांचे मत परिवर्तन करावे." टिळक राजकीय सुधारणांचे पुरस्कर्ते या नात्याने सार्वजनिक जीवनातील सुधारणावाद्यांशी काही वर्षे या वादात गुंतले होते.[१५]

"संमती कायद्यावर टिळकांनी आपल्या संपूर्ण संपादकीय सामर्थ्यानिशी झुंज दिली परंतु त्यांनी आपल्या व कुटुंबात स्वतःच्या मुलीचे विवाह १६ वर्षे पर्यंत थांबवून ठेवले. यावरुन ते आपल्या सुधारणा-विषयक धोरणाशी तसेच पारंपारिक वारसाशीही एकनिष्ठ असल्याचे दिसून येते" असे जे आपल्या पुस्तकात म्हणतात[१६] १८८६ "आधी कोण? राजकीय की सामाजिक" या केसरीच्या अग्रलेखात टिळक लिहितात की, "गृहस्थिती सुधारणे, स्त्रीदास्यविमोचन, सामाजिक विषमता नष्ट करणे, विधवा पुनर्विवाह इत्यादी जोपर्यंत त्यांच्या हातून होत नाही तोपर्यंत राजकीय प्रकरणात भारतीयांनी लक्ष घालू नये, हा राज्यकर्त्यांचा स्वार्थी प्रचार आहे.[१७] त्यांनी इंग्रजांच्या स्वार्थी धोरणावर प्रकाश टाकताना म्हटले आहे.

---

१५. डॅा. करंदीकर, आ. शिल्पकार, पृ.२८

१६. : लीगसीस ऑफ दी लोकमान्य , पृ. ६८

१७. लो. टिळक, लेखन संग्रह: लक्ष्मणशास्त्री जोशी, पृ. १ ते ८

पाध्ये टिकेकर टिळकांच्या राजकीय ध्येयावर बोलताना म्हणतात की, "बहुजन समाजाला डिवचून, त्यावर टीका करून, त्यांचे दोष दाखवून किंवा त्यांची अवहेलना करून आपले कार्य साधावयाचे नाही अशी टिळकांनी पक्की खूण गाठ बांधली होती. म्हणून सामाजिक बाबतीत सुधारणा करण्याचे त्यांचे मार्ग वेगळे होते व त्यांचे विचारही कित्येक प्रसंगी प्रगतीला विरोधक वाटतात. परंतु त्या सामाजिक विरोधाचा हेतू राजकीय झगड्यावर शक्ती केन्द्रीत करण्याचा होता."[१८]

वृत्तपत्रांना महत्वाचे राजकीय कार्य आहे, त्यांनी आपली शक्ती धार्मिक व सामाजिक प्रश्नावर व्यर्थ दवडू नयेत असे टिळकांचे सांगणे होते. राजकीय सुधारणा अधिक महत्वाच्या असून सामाजिक सुधारणानंतर आपोआप घडून येतील अशी त्यांची धारणा होती. परंतु त्यामुळे सुधारणावादी गटाने त्यांच्यावर परंपरावादित्वाचा शिक्का मारला.

<u>राजकीय क्षेत्रात टिळक</u> :

टिळक सार्वजनिक कार्याच्या आखाड्यात पहिल्यांदा उतरले ते १८८८ च्या "क्रार्फड प्रकरण" खटल्यात. या खटल्यात त्यांचे नाव प्राधान्याने झळकले रेव्हिन्यु कमिशनर क्रॉफर्ड यांना लाच दिल्याच्या गुन्ह्याबद्दल काही मामलेदारांना बडतर्फ करण्यात आले होते. अन्यायाविरुध्द लढत देण्याची पहिली संधी टिळकांना या प्रकरणामुळे मिळाली १८८९ च्या पुण्याच्या परिषदेत टिळक क्रॉफर्ड खटल्यावर बोलले होते.[१९]

---

१८. पाध्ये, टिकेकर : आजकालचा महाराष्ट्र, पृ. १९४

१९. फाटक : लोकमान्य, पृ. १२५

१८६१ च्या कायद्याने मद्रास, मुंबई इत्यादी प्रांतांना प्रांतीक कायदे कौन्सिले देण्यात आली. टिळकांनी सार्वजनिक जीवनात पदार्पण केल्यानंतर पाच वर्षांनी म्हणजे १८८५ ला राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली पण टिळक काँग्रेसच्या अधिवेशनाला १८८९ मध्ये उपस्थित राहीले. मुंबईच्या या राष्ट्रीय सभेस गोपाळकृष्ण गोखले, लाला लजपतरायही व्यासपीठावर पहिल्यांदाच दिसले. "लाल-बाल-पाल" मधील बिपीनचंद्र पाल हे ३ वर्षापूर्वीच काँग्रेसला मिळाले होते. त्यावेळी काँग्रेस म्हणजे वर्षातून एकदा भरणारे सम्मेलन होते श्री. ए. ओ. ह्यूम यांचा उद्देश काँग्रेसने समाजसुधारणाचे व्यासपिठ बनावे" असाच होता. तिला राजकीय संघटना बनविण्याचा सल्ला व्हाईसरॉय डफरिनने दिला होता. ही वस्तुस्थिती आहे.[२०]

१८८९ पासून पुढे टिळक काँग्रेसच्या बहुतेक अधिवेशनांना उपस्थित होते. पण राष्ट्रीय काँग्रेसचा अध्यक्ष टिळकांना कधीच होऊ दिले गेले नाही १८८९ मध्ये टिळकांना काँग्रेसमध्ये पहिल्यांदा विधि मंडळातील सुधारणांच्या ठरावाला "केंद्रीय कायदेमंडळाच्या निवडणुका प्रांतिक कायदेमंडळाच्या लोकनियुक्त सदस्यांवरच व्हायला हव्यात" ही दुरुस्ती सुचविल्यामुळे अध्यक्ष सर वी. वेडर बर्नच्या उपस्थितीत अविस्मरणीय ठरली. गोखल्यांनी या सूचनेला दुजोरा दिला पण ही दुरुस्ती फेटाळली गेली. या अधिवेशनाच्या दिवसात पुण्याचा केसरी साप्ताहिक मुंबईहून दैनिकाच्या स्वरुपात प्रसिध्द करुन टिळकांनी नियतकालीकांच्या इतिहासातही नवीन पायंडा घातला.[२१]

१८९० पासून टिळक प्रांतिक सभेच्या चिटणिसांपैकी एक होते.[२२]

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

२०. गोवर्धन पारीख: भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार, पृ.१५

२१. धं. कीर : लोकमान्य टिळक, पृ. ५२

२२. नलिनी पंडित : महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, पृ. ६०

काँग्रेसच्या प्रांतवारीने परिषदा भरविण्याची प्रथा सुरु झाल्याने १८८९ पासून दरवर्षी १८९२ पर्यंत प्रांतिक परिषदा होत गेल्या आणि टिळक त्यामध्ये भाग घेवू लागले.[२३]

१८ ऑक्टो १८९२ च्या केसरीत " पाचवी प्रांतीक सभा व तत्संबंधी लोकांचे कर्तव्य" ह्या अग्रलेखात टिळकांनी जनतेला आव्हान केले की, "वर्षातून एकदा जमणाऱ्या हजार पाचशे लोकांच्या राष्ट्रसभेने एखादे मागणे केले, म्हणजे सरकार लागलेच कबूल होईल असे नाही, तर प्रत्येक प्रांतीतून, जिल्ह्यातून, शहरातून इतकेच काय पण प्रत्येक खेड्यातूनही त्याच प्रकारचे अर्ज गेले पाहिजेत, तरच त्या मागण्याला काही वजन येणार आहे इतर कामाप्रमाणे राजकीय चळवळीतील श्रमविभाग अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय सभेच्या प्रयत्नाला यश यावे असे जर लोकांना वाटत असेल, तर तिच्याच नमुन्यावर गावोगाव व खेड्यातूनही प्रयत्न सुरु झाले पाहिजे. राष्ट्रीय सभेनंतर प्रांतिक सभा उत्पन्न करणारांचा हाच हेतु होता.[२४]

नागपूर येथील १८९१ च्या अधिवेशनात पी. आनंदा चार्लु यांच्या अध्यक्षतेत झालेल्या सभेत शस्त्रबंदीच्या कायद्यावरील ठराव मांडण्याचा मान टिळकांना देण्यात आला. काँग्रेसच्या व्यासपीठावरुन टिळकांनी केलेले हे पहिले महत्वाचे वक्तव्य होय. हा ठराव एकमताने संम्मत करण्यात आला. लोक आता त्यांच्याकडे एक उदयोन्मुख पुढारी म्हणून पाहू लागले.[२५] या संबंधी लेख १२ जाने. १८९२ च्या केसरीत "सालगुदस्त" या शिर्षकाखाली हा लेख नव्या राजकीय खंडाच्या ३० पान नंबरवर आहे.

---

२३. फाटक : लोकमान्य, पृ. १२५
२४. केसरीतील लेख : राजकीय खंड १, पृ. १११
२५. डॉ. करंदीकर : आ. मा. शिल्पकार पृ. ४३

काँग्रेसने जनतेची सेवा करून बहुजन समाजाची संघटना बनावे यावर टिळक भर देत. ह्यूम साहेबांचे पहिले आवाहन "जन्मात चांगल्या आणि प्रामाणिक लोकांपुरतेच" असले तरी तेही आता टिळकांच्याच धर्तीवर विचार करू लागले होते. १८९२ च्या फेब्रुवारीत एक पत्रक काढून त्यांनी जनतेला संदेश दिला की, "सरकारच्या कृपाप्रसादाची वाट बघत न बसता स्वतःची गा-हाणी दूर करून घेण्यासाठी काँग्रेस सदस्यांनी चळवळ सुरू करावी.[२६] केसरीने ५ एप्रिल १८९२ च्या "राजद्रोह" या लेखाद्वारे ह्यूमना पूर्ण पाठिंबा दर्शविला होता.

१८९३ ची प्रांतिक परिषद अहमदाबादला भरली होती तेथे टिळकांनी कोकणातील शेतीची गा-हाणी एका ठरावाच्या स्वरूपात मांडली होती १८९४ साली टिळक मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर फेलो म्हणून निवडून आले १८९५ मध्ये पुण्याच्या नगरपालिकेचे सभासद ना.म. जोशींच्या विनंतीवरून झाले. लवकरच ते नियामक समितीमध्ये निवडून आले पण या संस्थेशी त्यांचा संबंध दीड वर्ष राहिला. मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य १८९५ मध्ये झाले. पण ते कौन्सिलात फिरोजशहा मेहता सारखे चमकले नाहीत. १८९७ ला टिळक दुसऱ्यांदा विधी मंडळावर निवडून आले. परंतु राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक झाल्याने त्यांनी आधीच त्यागपत्र दिले होते.

१८९५ च्या पुणे येथे भरलेल्या अधिवेशनात सुरेंद्रनाथ बॅनर्जी असताना टिळक व समाजसुधारक पक्षामध्ये मतभेद झाले. काँग्रेसच्या मंडपात सामाजिक परिषद होऊ न देण्याची टिळकांची भूमिका होती. काँग्रेसला

---

२६. य. कीर : लो. टिळक, पृ. ७७-७८

पूर्णपणे राजकीय स्वरुप असावे हा टिळकांचा आग्रह होता. कधीतरी एखदा होणा-या अधिवेशनानंतर सामाजिक सभा घेतली जाई. याला टिळकांचा विरोध होता. यावेळी दिनशा वाच्छा अधिवेशनात हजर होते. त्यांनी या प्रसंगाचा वृत्तांत आपल्या आठवणीत लिहिलेला आहे. "टिळक स्वतःच्या भूमिकेवर दृढ होते त्यांनी स्पष्ट सांगितले की, "वास्तविक पहिल्या पक्षाची इच्छा सामाजिक सुधारणांना महत्त्व न देता समाजाचा मोठा वर्ग काँग्रेसकडे खेचून घेण्याचा आहे आणि दुस-या पक्षाला समाज सुधारणा पुरस्कर्त्या पलीकडे राष्ट्रसभेचा विचार व्हायला नको आहे. जनमताला योग्य मान देण्याची या पक्षाची इच्छा नसेल तर जनतेच्या बहुमताची दखल घेण्याचा आग्रह करुन निदान काँग्रेसमध्ये फूट पाडायला मी तरी तयार नाही." यावेळी टिळकांची भूमिका तत्कालीन गरजेवर नसून चिरंतन निष्ठेवर काँग्रेसला बहुजन समाजाचा पाठिंबा मिळवून देण्याच्या आकांक्षेवर आधारित होती. १० नोव्हें. १८९५ च्या मराठामध्ये त्यांनी लिहिले की, "या अधिवेशनाला उपस्थित राहून वा त्यांच्या सभेत काँग्रेसमध्ये सभेमध्ये सहभागी होण्याची मोकळीक हजारो लोकांना देण्यात आली तरच काँग्रेस अखिल जनतेचे प्रतिनिधीत्व करु शकेल."[२७] जनसंपर्क साधण्याच्या ह्या तळमळीनेच टिळकांनी चळवळीला प्रेरणा दिली. आणि त्यांनी आपला वेगळा पक्ष स्थापन केला.

<u>हिन्दु - मुस्लीम दंगे</u> :

सन १८९३-९४ ला पुण्यात जी हिन्दु-मुस्लीम दंगे झाली त्याचे बिजे प्रभासपट्टम" या जुनागड संस्थानाच्या हद्दीतच पेटलेली होती. इतर ठिकाणाहून झालेली दंग्याची लाट व सरकारी अधिका-यांचे पक्षपाती

---

२७. डॉ. करंदीकर : आ.भा.शि. पु. ४४-४५

धोरण मुख्यत: कारणीभूत ठरले. टिळकांचा कुठलाही संबंध ह्या दंग्याशी नव्हता. पण दंग्यामुळे उत्पन्न झालेल्या राजकीय चळवळीत त्यांचे नाव प्रामुख्याने आलेले असून मुसलमान लोक त्यांना पुष्कळच दिवस आपले शत्रु समजत होते. चिरोलांनी त्यांना जातीजातीत भांडणे लावून अस्वस्थता निर्माण करणारे कळीचे नारद म्हटले तर मवाळ पक्षानेही त्यांना मुसलमानांशी शत्रुत्व करण्याबद्दल दोष दिला होता.[२८]

शिवचरित्रातील "अफझलखानाचा वध" हा विषय वादग्रस्त मानला जातो. "प्रतापगड" हा किल्ला विचारात घेऊन कारकोरिया या पारशी विद्वानाने अफझलखानाच्या घटाईखोर वर्तनामुळे त्याला मारणे शिवाजीला भाग पडले. शिवाजीवर या बाबतीत केला जाणारा आक्षेप "विश्वासघाताचा" खोटा आहे. अशा तात्पर्याचे ब-याच विस्ताराने मुंबई रॉयल एशियाटिक सोसायटीमध्ये १८९४ मध्ये भाषण केले. आणि इथूनच हिन्दु-मुस्लीम वादाला तोंड फुटले.[२९]

दंग्याचे मूळ अँग्लो इंडियन वृत्तपत्रे विशेषत: टाईम्स ऑफ इंडिया, बाम्बे आणि पायोनिर आणि चिरोल यांनी गोरक्षा चळवळ आहे असा दावा केला होता.[३०] टिळकांनी "मुसलमानाविषयी सरकारी अधिका-यांचा पक्षपात हे दंग्याचे खरे बिज होय" असे उघडकीस आणले. या दंग्याबाबत टिळकांनी जे धैर्य दाखविले ते महत्वाचे आहे. टिळकांच्या लेखसंग्रहाचा पहिला राजकीय खंड पहिल्यांदा त्यात याविषयासंबंधी लेख आढळतील. टिळकांची दृष्टी स्वाभिमानी आणि नि:पक्ष होती हे लक्षात येईल. "ज्ञान प्रकाश" पत्राने सुध्दा इंग्रज अधिका-यांचा पक्षपात या दंग्याला कारणीभूत ठरला" असे म्हटले होते.[३१]

---

२८. केळकर : लोक.टिळकांचे चरित्र पूर्वार्ध : पृ. ३३३
२९. फाटक : लोकमान्य, पृ. १०२
३०. ताम्हणकर : लो. टिळक : पृ. ५६-५७
३१. केळकर : चरित्र पूर्वार्ध, पृ. ३३७

१५ ऑगष्ट १८९३ च्या केसरीत "हिन्दु मुसलमानांचा दंगा" हा या अग्रलेखात त्यांनी लिहीले की, "मुसलमान लोक वर शेफारले असले तर आमच्या मते त्याचे मुख्य कारण सरकारची फूस होय. युरोपियन लोक हिंदु लोकास नेहमीच हिणवीत असतात की, इंग्रजी राज्य आहे म्हणून हिन्दु लोकाचे मुसलमानांपासून संरक्षण होत आहे," असल्या उद्‌गारांनी मुसलमान लोकांना विनाकारण उत्तेजन मिळत गेले आहे. कित्येक सरकारी अंमलदार ब-याच वेळी ही गोष्ट विसरून जाऊन हिन्दु मुसलमानातील व्देष भाव कायम राहिली तरच इंग्रजी राज्याचे हित आहे, अशा समजुतीने मुसलमान लोकास चिथावण्याचा प्रयत्न करीत असतात. लॉर्ड हॅरिंग्टनसारख्या वरिष्ठ अधिका-यांनी असले प्रकार बंद होतील अशी व्यवस्था व धाक ठेवली पाहिजे. इतकेही करून वर कोठे दंगा झाला तर दंगा करण्यास प्रथमत: प्रवृत्त झाले त्यास कोणाचीही भीड, मुर्वत न ठेवता योग्य शासन करावे म्हणजे असले प्रकार प्राय: कधीही घडून येणार नाहीत.[32] असे सुचविले होते.

मुंबई दंग्याची चौकशी पूर्ण होवून सरकारी निर्णय बाहेर पडण्यापूर्वीच टिळकांनी पुण्यात हिन्दूंची एक जाहीरसभा शनिवारवाड्यात घेतली. पण त्या सभेला रा.ब. रानडे यांनी नापसंती दर्शविल्याबद्दल २६ सप्टें.१८९३ च्या केसरीत टिळकांनी "रा.ब.रानडे व त्यांचे अनुयायी" हा लेख लिहून रानड्यांवर कडाडून टिका केली. २० एप्रिल १८९४ ला पुण्यात होणारा दंगा पोलिसांच्या कडक बंदोबस्तामुळे पिटांच्या फेऱ्यावर निभावला तो विपरीत प्रसंग टाळल्याबद्दल टिळकांनी "केसरीतून" कलेक्टरचे आभार मानले आणि दंग्याच्या निमित्ताने ब्राम्हणांना दिलेल्या शिव्याबद्दल त्यांची माफी मागावी असे जाहीरपणे लिहिण्याची संधी टिळकांना मिळाली.[33]

---

३२. लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख : राजकीय खंड १, पृ. २०४,५,७
३३. फाटक: लोकमान्य, पृ. ९१-९२

टिळकांचे केसरीतील लेखन हे उंटावरुन शेळया हाकणाऱ्या वाक्यमल्यासारखे नव्हते तर दंगलीच्या मैदानात दंड थोपून उभ्या राहणाऱ्या जयीष्णु मल्लाच्या गर्जनेसारखे होते. टिळकांना सामाजिक ऐक्याची खरीखुरी तळमळ होती. टिळकांची दृष्टी जरी वास्तववादी आणि लोकाभिमुख असली तरी चिपळूणकरांचा भावनाप्रधान व परंपरानिष्ठ राष्ट्रवाद हाच त्यांच्या विचारसरणीचा पाया होता. हिन्दु धर्म व मराठ्यांचा इतिहास यावर भर दिल्यामुळे मुसलमान त्यांच्या चळवळीपासून अलिप्त राहीले. आणि त्यांच्या धर्मांधतेच्या अज्ञानाच्या कडवेपणाचा फायदा घेऊन जातीय दंगली उद्भवण्यात परकीय सरकार व सत्तालोलुप पुढारी यांना संधी मिळाली. दंग्याच्या मागील ही भेदनिती टिळकांनी अचूक ओळखली. पण तिला शह देण्यासाठी मुसलमान जनतेला खेचून आणणारा कोणताही राष्ट्रीय कार्यक्रम त्यांनी आखला नव्हता."[३४]

१८९३ च्या जूनमधील सिव्हील सर्विस संबंधीचा अनुकूल ठराव झाला नसता तर ऑगष्ट पासून हिन्दु मुस्लीम तंटे कदाचित सुरु झाले नसते असे जावडेकरांना वाटते.[३५]

१८९४ ला टिळकांनी केसरीत जे लेख लिहिले हिन्दु-मुस्लीम दंग्यासंबंधी त्यामुळे हिन्दु समाज त्यांच्याजवळ आला पण मुस्लीम त्यांच्याकडे वळले नाही हा त्यांचा राजकीय पराजय ठरला. तत्कालीन परिस्थितीमुळे कदाचित हे घडले असेल. हिन्दु मुस्लीम वादामधील तिसरा पक्ष निपक्ष नव्हता. सरकार मुसलमानांचा पक्ष होते हे या वादामुळे उघडपणे सिध्द झाले. हिन्दुंना शह देण्यासाठी मुसलमानांचा वापर करण्यात आला हे जनतेच्या लक्षात येवु लागले.

---

३४. नलिनी पंडित, म. राष्ट्रवादाचा विकास, पृ. ८२

३५. आचार्य जावडेकर, आधुनिक भारत, पृ. १८२

## दोन नवीन राष्ट्रीय उत्सव :

१८९३-९४ च्या हिन्दु मुस्लीम दंगे उद्भवल्यामुळे आपल्या राजकारणाला शक्ती निर्माण करण्यासाठी गणपती आणि शिवाजी उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. लोकातील धर्मभावना व ऐतिहासिक विभूतीबद्दलची पूज्य भावना यांचा पाठिंबा राजकीय क्षेत्रात देण्याचे प्रयत्न टिळकांनी चालविले. राष्ट्रसभा जे कार्य करीत होती त्या कार्याचा सामान्य जनतेत व्यापकपणे प्रसार करण्याची ही खटपट होती.[36] आणि काही मुसलमानांनी चालविलेल्या हिन्दुविरोधी कारवाया इतकाच सरकारच्या मुसलमान धार्जिण्या पक्षपाती धोरणाचा निषेध करणे हाच गणेशोत्सवामागील कल्पनेचा मुख्य उद्देश होता.[37]

चिरोल "इंडियन अनरेस्ट" या आपल्या पुस्तकात लिहीतो की, "आपल्या राजकीय चळवळीस धर्माचा पाठिंबा असले म्हणजे चांगले या उद्देशाने हिन्दुस्थानातील अत्यंत लोकप्रिय देव गणपती जो आपल्या सर्व चळवळींचे आदि दैवत करण्याची युक्ती टिळकाने लढविली – – –गणपति उत्सवाची नवीन टूम काढून गणेश मंडळ्या स्थापन करून व तरुण तालीम बाज मंडळीचे मेळे तयार करून लोकावर आपली छाप बसविण्याची युक्ति टिळकांनी काढली ती अद्वितीय होती. गणपति उत्सवामुळे टिळकांच्या चळवळीचे क्षेत्र फारच विस्तृत झाले."

चिरोल पुढे शिवाजी उत्सवाबाबत लिहितो की "मराठे मंडळीस आ आपल्या बाजूला आणण्याचे काम टिळकास अद्यापि करावयाचे होते. म्हणून ज्या शिवाजीने मुसलमान लोकांचा पराभव करून महाराष्ट्रात हिन्दु पातशाहीची

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

३६. आ. जावडेकर : आ.भारत, पृ. २३९
३७. डॉ. करंदीकर : आ.भा. शिल्पकार, पृ. ४७

स्थापना केली. त्याचा जन्म एका मराठा सरदारांच्या कुळात झाला असल्याकारणाने त्याच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन शिवाजी बाण्याचे जे मराठी लोक, त्यांच्या मनात इंग्रजी राज्याविषयी असलेले प्रेम नाहीसे करून त्यांना आपल्या बाजूला वळवून आणण्याचा उद्योगास टिळक लागले.[३८]

या उत्सवांचा मुख्य भर सामाजिक असला तरी राजकीय जागृतीला सहाय्यभूत ठरला. "हे उत्सव म्हणजे सरकार विरोधी प्रचाराचे साधन आहे" अशी टीका टिळकांचे विरोधक करीत पण टिळकांचा दृष्टीकोन वेगळा होता "निघून जाणारा पक्ष नेहमीच स्वतःबरोबर अधावत अभिरुची, समजूती आणि सवयी घेऊन जात असतो. धार्मिक चिंतन आणि भक्ती एकांतवासातही साधता असतील तरीही जनतेत जागृती आणण्याच्या दृष्टीने देखावा आणि थाटमाट यांनाही महत्व असतेच". असे त्यांचे मत होते.[३९]

गणेशोत्सव :

हिंदूंना एकत्र आणण्यासाठी सर्वप्रथम सार्वजनिक गणपती उत्सव १८९३ च्या हिन्दु मुस्लीम दंग्यानंतर सहा आठवड्यांनीच पुण्यात साजरा करण्यात आला. "राष्ट्रीय महोत्सवाची आवश्यकता" या १ सप्टे. १८९६ केसरीच्या अंकात आमच्याकडे धर्म हा नेहमीच श्रेष्ठ पदावर राहणार, तेव्हा आमचे महोत्सव पुष्कळ अंशी धर्मकृत्य असणार ------ जुने असलेले राष्ट्रीय उत्सव जागृत राखणे व नसल्यास नवे प्रचारात आणणे हा राष्ट्रीयत्व कायम ठेवण्याचा उत्तम मार्ग होय आहे."[४०] असे सांगून टिळकांनी ग्रीक रोमन देशांच्या उत्सवाचे उदाहरण दिले आहे.

---

३८ केळकर : टिळक चरित्र, पूर्वार्ध, पृ. ४३९
३९. डॉ. करंदीकर : आ.भा. शिल्पकार, पृ. ४८
४०. केसरीतील लेख : राजकीय खंड १, पृ.५६३–६५

गणपती उत्सवाचा दिवस जवळ आला की लोकांचे लक्ष त्याकडे वळविण्यासाठी "केसरीत" लेख लिहिण्याचा प्रघात टिळकांनी सुरु केला होता. "यंदा गणपती पोहचविण्याचा समारंभ सालाबादापेक्षा निराळ्या त-हेने होऊन त्यास बरेच सार्वजनिक स्वरुप आलेले आहे." असा अभिप्राय २६ सप्टे. १८९३ च्या अंकात व्यक्त केला होता. दुस-या वर्षी उत्सवाची संघटना व तिचा देखावा पाहून टिळकांच्या मनावर जो परिणाम झाला तो केसरीच्या १८ सप्टें. १८९४ च्या अग्रलेखात टिळकांनी प्रकट केला.[४१] आणि ३ सप्टे. १८९५ च्या "यंदाचा गणपत्युत्सव" या अग्रलेखात उत्सव वाढत्या प्रमाणात असल्याचा आनंद व्यक्त केला आहे" एक धर्म, एक राजा, एक भाषा ही राष्ट्रीयत्वाची प्रधान अंगे आहेत."[४२] या सिध्दान्ताला आधार देताना टिळक म्हणतात की, "राजकीय उपास्य दैवत एक असल्यामुळे जितका फायदा व्हावयाचा तितका फायदा सध्या होत आहे. आणि धार्मिक दैवत एक असल्याने तोच फायदा दुप्पट होण्याचा संभव आहे.

उत्सवाची फलश्रुती काय? यावर उत्तर देताना टिळक लिहितात की, वर्षातून दहा दिवस का होईना पण एका प्रांतातील सर्व हिन्दु लोकांनी एका देवतेच्या उपासनेत लीन झालेले असावे, ही काही लहान सहान गोष्ट नव्हे आणि ही जर गोष्ट साध्य झाली तर आपल्या भावी अभ्युदयाचा आपण पाया घातल्यासारखे होईल[४३]

गणपती उत्सव संबंधाने ८ सप्टे.१८९६ च्या "राष्ट्रीय महोत्सवाचे वेळी सुशिक्षितानी काय केले पाहिजे" या मथळ्याखाली लेखात प्रतिपक्षावर टिका करताना टिळक लिहीतात की, "धर्मबुध्दी ज्याच्या मनाला शिवत

---

४१. पूर्वोक्त "गणपति उत्सव" हा अग्रलेख, पृ. ३३४-३९ पानावर आहे.

४२. पूर्वोक्त, पृ. ४८४-८७

४३. फाटक : लोकमान्य पृ. ९७-९८

देखील नाही. जडाच्या पलीकडे ज्यांची बुध्दी जावू शकत नाही त्या अभागी व्यक्तिंची कीव करण्यापलीकडे आम्हास त्या संबंधाने काहीच म्हणावयाचे नाही" आणि पुढे सुशिक्षित लोकांना सुचविले की "सुशिक्षितांनी उत्सवाचा फायदा घेवून दुसऱ्या लोकाशी एक जीव होवून आपले शिक्षण व सु नव्या कल्पना यांचा फायदा सामान्य लोकास करुन द्यावा."[४४] कृष्णाजी खाडीलकरांनी उत्सवाला अनुसरुन लिहिलेला १ सप्टे. १८९६ चा "राष्ट्रीय महोत्सवाची आवश्यकता"[४५] हा लेख वाचनीय आहे यात धार्मिक उत्सव राष्ट्रीयत्वाच्या एकात्मतेसाठी असा आवश्यक आहे हे प्रतिपादित केले आहे.

<u>शिवाजी उत्सव</u> :

राष्ट्रीय महोत्सवाचे महत्व विशद करताना मोडे म्हणतात की, ज्या शुर पुरुषांनी देशाचे नाव इतिहासात अजरामर केले. त्यांच्याविषयी कृतज्ञता बुध्दी व्यक्त करणे ही त्यामागील एक भावना असली तरी त्यापेक्षा एका महत्वाचा हेतु होता तो म्हणजे "राष्ट्रातील महापुरुषांचे स्मरण हे राष्ट्रीयत्व कायम राखण्यास एक चांगले साधन आहे."[४६]

डग्लस या एका इंग्रज गृहस्थाने २० एप्रिल १८८३ मध्ये "शिवाजी महाराजांच्या छत्रीची दैना" या विषयावर मुंबई आणि पश्चिम हिंदुस्थान या पुस्तकात लेख लिहीला डग्लसच्या लेखाने उद्भवलेल्या खळबळीचा फायदा घेवून १८८६ मध्ये पुण्यात टिळकांनी एक जाहीर सभा भरवून तेथे "शिव समाधीच्या जीर्णोध्दाराचा प्रश्न उपस्थित केला. डग्लसने लिहिलेल्या

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

४४. केसरीतील लेख : राजकीय खंड १, पृ. ५६६-६९

४५. पूर्वोक्त : पृ. ५६१-६५

४६. मोडे : आ.भा. रा. विचार, पृ. २३५

रायगडावरील शिवसमाधीच्या शोचनिय स्थितीची हकीकत वाचून टिळकांच्या मनात प्रथमतः शिवाजी उत्सव साजरा करण्याची कल्पना आली. शिवाजी उत्सवाद्वारे राजकीय चळवळी सुरु करण्याचा संकल्प त्यांनी केला आणि १८९५ ला महाराष्ट्रात मुख्यतः सर्व ठिकाणी शिवाजी जन्मनिमित्त उत्सव साजरा करण्यात आला. महाराष्ट्रे निमित्त घेवून टिळकांनी शिवाजी उत्सवाची कल्पना केसरीत लेख लिहून आणि तिला बाहेरील राजकीय चळवळीची जोड देऊन थोडयाच काळात अतिशय लोकप्रिय करुन चिरस्थायी करुन सोडली.

१५ डिसें. १८८५ च्या केसरीत लॉर्ड रे यांनी समाधीच्या जीर्णोध्दाराचे काम सरकारकडून व्हावे अशी शिफारस केल्याची बातमी दिली याबद्दल केसरीतून त्यांना धन्यवाद दिल्याचे आढळते.[४७]

२८ एप्रिलपासून केसरीतून शिवाजी स्मारकावर लेख येण्यास सुरुवात झाली. एका विद्यार्थ्याने दोन आण्याची रक्कम पाठवून स्मारकाच्या फंडाची कल्पना अमलात आणल्याचा उल्लेख ३० एप्रिलच्या केसरीत आढळतो. "टिळकांनी भरविलेल्या ३० मे १८९५ च्या सभेत सयाजीराव गायकवाडांनी हजार रुपयांची देणगी देवून जिर्णोध्दाराच्या कार्याला प्रोत्साहित केले. १८९५ ला टिळकांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात शिवाजी स्मारक उत्सवाच्या कल्पनेला अखिल भारतीय स्वरूप देण्याची संधी पुण्यात साधली."४८

---

४७. केळकर, टिळक चरित्र, पूर्वार्ध, पृ. ४२५-२७

४८. फाटक : लोकमान्य पृ. १०३

"श्री शिवाजी महाराजांच्या स्मारकाबद्दल सूचना" या २ जुलै १८९५ च्या अग्रलेखात टिळक लिहितात की, राष्ट्रामध्ये आपले पणाची भावना टिकविण्यास त्या राष्ट्रातील पराक्रमी पुरुषांचे लोकांना नेहमी आठवण असली पाहिजे किंवा ती जागीच दिली पाहिजे हे तत्व सर्व राष्ट्रात मान्य झालेले आहे. आम्ही ते जर विसरलो तर ते आमच्या निद्रावस्थेचे किंवा दुर्दैवाचे लक्षण होय. भारतीयात ज्यांच्या अंगात माणुसकी आहे त्यांना शिवाजींच्या स्मारकाबद्दल आस्था वाटेलच.[४९] असे मत टिळकांनी केसरीत व्यक्त केले होते.

१५ एप्रिल १८९६ ला शिवाजी उत्सव साजरा करण्यात आला हा समारंभ दोन दिवस चालू होता. उत्सवाची कल्पना जुनी असली तरी टिळकांच्या नेतृत्वाने तिचा उठाव होताच उत्सवाच्या स्वरूपाविषयी आणि परिणामाविषयी जे आक्षेप उत्सवाच्या विरोधकांनी काढले त्याला प्रत्युत्तर म्हणून २८ एप्रिल १८९६ चा "शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव" हा अग्रलेख लिहिला.[५०] जोपर्यंत मराठी राज्याचा इतिहास मुलांना शाळेत शिकविला जात आहे आणि शिवाजीचे कर्तृत्व आमच्या डोळ्यासमोर आहे तोपर्यंत शिवजयंतीचा उत्सव केवळ दैविक पुरुषांच्या उत्सवाप्रमाणे होईल. अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. चांगल्या गोष्टी सदैव जागृत ठेवण्यासाठी असे उत्सव आवश्यक आहेत. महाराष्ट्रातील निरनिराळ्या जातींचे प्रेम शिवचरित्रामध्ये एकत्रित होऊ शकते म्हणून हा उत्सव करण्यात येतो हे लोकांनी लक्षात ठेवावे" असा त्या लेखाचा आशय आहे.

---

४९. केसरीतील लेख : पृ. ४६३-६४

५०. पूर्वोक्त पृ. ५३०-३३

टिळकांनी आपली "मराठा" ह्या पत्रकात शिवाजी उत्सवाचे महत्व विशद करताना लिहीले की,[51] आपल्या राजकीय महत्वाकांक्षा पूर्तीच्या दृष्टीने भारतीय विभूतीच्या पुजनाने अंतःकरणात निर्माण होणाऱ्या शक्तींची गरज आहे. म्हणून शिवाजी उत्सव करण्यात येत आहे. प्रत्येक विभूती त्या त्या वेळच्या युगधर्मानुसार वागत असते. हे तत्व मान्य केल्यावर शिवाजींच्या चरित्रात अपेवाई काहीच आढळत नाही. अकबर किंवा इतर कोणत्याही थोर पुरुषाच्या सन्मानासाठी उत्सव सुरु करण्याच्या विरोधात आम्ही नाही. पण शिवाजी उत्सवाला राष्ट्राच्या दृष्टीने विशेष महत्व आहे. म्हणून तो आम्ही हा उत्सव सुरु केला आहे. याच आशयाचा लेख केसरीमध्ये टिळकांनी २६ मे १८९६ च्या अंकात "थोर पुरुषांची चरित्रे" या मथळ्याखाली लिहिलेला आढळतो.[52]

पुढे या उत्सवाची लोकप्रियता आ इतकी वाढली की जपानमध्ये १ मे १९०५ ला हिन्दी विद्यार्थ्यांनी शिवाजी उत्सव मोठया प्रमाणात साजरा केला. १९०६ ला सुध्दा हा उत्सव टोकीयोत करण्यात आला. एप्रील १९०६ ला रायगडावर शिवाजी उत्सव तिसरा मोठा समारंभ करण्यात आला. पण या उत्सवासाठी शिवाजींच्या वंशजानी हातभार लावला नाही हे विशेष होय.

शिवाजी उत्सवाचा हेतू हिन्दूंना मुस्लीम विरोधी भडकविण्याचा आहे हा आंग्ल भारतीय पत्रकांचा आरोप खोडून काढण्याची दक्षता टिळकांनी बाळगली होती. मुस्लीम धर्माविषयी शिवाजींना आदर, आस्था होती. कित्येक मुस्लीम मोगलाविरुध्द शिवाजींना येवून मिळाले होते हे त्यांनी

---

५१. डॉ. करंदीकर : आ.भा. शिल्पकार , पृ. ५०-५१

५२. केसरीतील लेख : पृ. ७४५-५९

निदर्शनास आणून दिले. टिळकांनी मुस्लीम लोकांना सांगितले की, तुमच्याशी वैर करण्यासाठी किंवा तुम्हाला चिडविण्यासाठी शिवाजी उत्सव साजरा करीत नसून आजच्या राजकीय परिस्थिती हिन्दु मुस्लीम स्थिती एकच आहे. तेव्हा अशा वेळी दोघांनाही शिवचरित्रातून प्रेरणा घेता येणार नाही का? असे आव्हान केले. अशा मुठभर मुस्लीमांनी या उत्सवाला साथ दिली असली तरी बहुसंख्य मुस्लीम समाज शासक वृत्तीने विरोधच करीत राहिला त्यांच्या मनात रुजलेल्या या धास्तीला आंग्ल भारतीय वृत्तपत्रांनी अप्रत्यक्षपणे खतपाणी घातले. सरकारचे धोरण पक्षपाती असल्यामुळे केवळ स्वाभीमान व आत्मरक्षणासाठी स्वतःची संघटना करणे हिन्दूंना भाग पडत आहे हे टिळकांच्या हिन्दु आक्षेपकांना मान्य असले तरी ते आंग्ल भारतीय पत्रकाराशीच सहकार्य करीत होते.[५३]

शिवाजी उत्सवाच्या प्रसाराबरोबरच याच काळात शिवाजीवर इतिहास संशोधन व साहित्यनिर्मिती इंग्रजी मराठी, हिन्दी, बंगाली प्रभावाने भारतातील राजस्थानमध्ये राणाप्रताप आणि बंगालमध्ये प्रतापादित्य या वीरांचे स्मरणोत्सव होवू लागले आणि याला प्रतिरोध म्हणून औरंगजेबाचेही संस्मरण उत्सव मुस्लीम लोकांनी एकदोनदा केल्याचे समकालीन एखाद्या वृत्तपत्रात लिहील्याचे सापडते.[५४]

## <u>दुष्काळ प्लेग आणि टिळकांचे कार्य :</u>

टिळक गणेश आणि शिवाजी उत्सवाच्या कार्यात मग्न असतानाच १८९६ मध्ये पडलेला दुष्काळ टिळकांच्या विचारांना जहाल होण्यास कारणीभूत ठरला. [१८९६ च्या दुष्काळाने टिळकांच्या राजकीय आकृत्याला

---

५३. डॉ. करंदीकर : आ.भा.शि. पृ. ५९

५४. फाटक : लोकमान्य, पृ. ११९-२०

एक नवी दिशा लाभली. त्यानंतर केवळ राजकीय राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्तीच्या मर्यादेतच त्यांच्या कार्याची व्याप्ती राहिली नाही. तर शेतकरी वर्गाच्या प्रश्नाकडे ते आपुलकीने पाहू लागले"[५५] हिन्दुस्थानातील शेतकरी हा राष्ट्राचा आत्मा आहे. त्यांच्या आर्थिक प्रश्नाकडे जर लक्ष दिले तर भारताचा उध्दार होईल आणि याकरिता शेतकरी आपला व आपण त्याचे असे आपणास वाटावयास पाहिजे अशी टिळकांची धारणा होती.

१९ व्या शतकाच्या शेवटी २५ वर्षात १८ दुष्काळ पडले होते. त्यामुळे १ कोटी ९० लाख मानवाचे बळी घेतले होते. या ब्रिटिश काळात व दुष्काळ भारतीयांच्या अंगवळणी पडला होता. पण १८९६ च्या नोव्हें. डिसेंबरच्या महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ भयानक होता. ह्या दुष्काळाचा पहिला तडाखाही इंग्रज अधिकाऱ्यांनी नगण्य मानला या वेळेच्या दुष्काळाचे स्वरूप १८७६-७७ सालच्या दुष्काळाप्रमाणेच भयंकर असले तरी यावेळच्या आणि त्यावेळच्या दुष्काळाच्या परिस्थितीत फार मोठे अंतर होते. १८७६ च्या दुष्काळानंतर ब्रिटिश सरकारने "फॅमिन रिलिफ कोड" तयार करून "फॅमिन रिलिफ फंड" दुष्काळ ग्रस्तांच्या मदतीसाठी तयार केलेला होता. फॅमिन रिलिफ कोडनुसार दुष्काळग्रस्त लोकांना कशी मदत द्यावी केव्हा व कोठे सारासूट द्यावी व तहकूबी द्यावी वगैरे नियम यात केलेले होते.[५६]

टिळकांनी दुष्काळावर "केसरी" आणि "मराठा" मध्ये अनेक लेख २१ सप्टें. १८९६ ते २५ मे १८९७ च्या काळात लिहीले २९ सप्टें.च्या केसरीत

---

५५. ताम्हणकर : लो. टिळक, पृ. ६८

५६. आचार्य जावडेकर, आधुनिक भारत, पृ. २४१

दुष्काळ पडत आला असल्याचा पहिल्यांदा उल्लेख टिळकांनी केला. आणि २० आक्टो. १८९६ च्या केसरीत लिहिलेली. दुष्काळात लोकांनी सरकारने केलेल्या फॅमिन कोडच्या कायद्याच्या आधारे आपले अधिकार अमलात आणावे. सरकारने सुध्दा श्रीमंत व्यापाऱ्यांच्या लुबाडण्याला आळा घालावा लोकांनी यासाठी सरकारला मदत करावी असे जनतेला आव्हान केले होते.[५७]

दुष्काळाची इत्थंभूत माहिती गोळा करुन ती सरकारपुढे वेळोवेळी ठेवायची, माहिती जमविण्याकरिता व दुष्काळ ग्रस्तांना सरकारी कायद्यातील सवलती समजावून देण्याकरिता आपले अनुयायी दुष्काळी भागात पाठवायचे, दुष्काळ पीडित हे निरनिराळ्या समाजातील आणि व्यवसायातील लोक असल्यामुळे त्यांच्या व्यवसायाला जुळेल काम द्यावे, अशा स्वरूपाच्या सुचना सरकारला देण्याचे कार्य सार्वजनिक सभा करु लागली.[५८] सार्वजनिक सभा पूर्णपणे टिळकांच्या हातात असल्यामुळे त्यांना आपल्या इच्छेनुसार सभेकडून कामे करुन घेणे अवघड गेले नाही. १८९६ च्या नोव्हें. डिसें. च्या दुष्काळाने टिळकांना शेतक-यापर्यंत पोहचविले असे म्हटले तर वावगे होणार नाही. टिळक स्वतः कायदे कौन्सीलचे सदस्य होतेच आणि सार्वजनिक सभाही त्यांच्या नियंत्रणात असल्यामुळे त्यांना देशभर दुष्काळाचे स्वरुप मांडण्यास वाव मिळाला.

टिळकांनी थोडा देखील विलंब न लावता जनतेची गा-हाणी वेशीवर टांगली दुष्काळ निवारला कायद्यानुसार मिळालेल्या सवलतींची जाणीव लोकांना करुन दिली. "यापैकी शेतकरी लोकांना शक्य तितकी सारा तहकुबी आणि माफी मिळवून देण्याबद्दल शेतकरी वर्गात जागृती

५७. पवते, लोकमान्य टिळक, पृ. ७४-७५
५८. फाटक, लोकमान्य, पृ. १३२

करायची असा निर्धार टिळकांनी केला. एक प्रकारे रयतेचा विमा उतरवून दुष्काळामुळे रयतेवर उपाशी मरण्याची पाळी येवू नये[59] हे पाहण्याची जबाबदारी टिळकांनी स्वतःवर घेतली होती. फॅमिन कोड चे मराठी ,भाषान्तर लोकांच्या जवळ असावे अशी मागणी टिळकांनी प्रथम सरकारकडे केली. त्यात सरकारने फॅमिन कोडची पुस्तके छापून प्रत्येक मामलेदारांना १०० प्रति पाठवून प्रत्येक जिल्ह्यातील कलेक्टरकडे पाठवून जनतेला द्यावी. पण सरकारने ही मागणी धिक्कारली सार्वजनिक सभेने छापलेली पुस्तके छापून कलेक्टर    पाठविली असता त्यांनी एकतर पुस्तके जाळली आणि काहींनी पुस्तकाच्या प्रती वापस पाठविल्या.[60]

दुष्काळाचे स्वरूप कानपूर- आग्रा नंतर नागपूर पर्यंत पोहचल्या-नंतर टिळकांनी केसरीत २० आक्टोंबरच्या केसरीतून जनतेला फॅमिन कोडचा आधार घेवून लोकांनी आपल्या हक्कास जागृत राहून दुष्काळ निवारण्याचे उपाय सरकारकडून घेतले पाहिजेत अशी शिकवण देण्यास केसरीने सुरुवात केली होती. सरकारी रिपोर्ट मधून दुष्काळाचा उल्लेख नाही हे पाहून इतर वर्तमान पत्रेही चिडून लिहू लागली. दुष्काळाचा फायदा घेणाऱ्या व्यापा-ऱ्यांनाही टिळकांनी सणसणीत इशारा दिला होता.

सरकारने पुस्तकाव्दारे फॅमिन कोड प्रसाराची मागणी फेटाळल्याने टिळकांनी स्वतःच केसरीमधून लोकांना त्या कोडाचे भाषांतर करून क्रमशः छापले. दुष्काळाविषयी सरकारकडून जे ठराव, खुलासे नियम इ. विषयी जे साहित्य बाहेर पडेल ते ताबडतोब लोकांपुढे ठेवण्याचा टिळकांचा उद्देश होता.

---

५९. जावडेकर : आधुनिक भारत, पृ. २४१

६०. पर्वते : बा.ग. टिळक, पृ. ७६

८ नोव्हें. १८९६ ला सार्वजनिक सभेने सरकारकडे एक सविस्तर अर्ज पाठविला. अध्यक्ष अण्णासाहेब पटवर्धन आणि चिटणिस शिवरामपंत परांजपे, जालापूरकर यांच्या सहीने पाठविला गेला. परंतु तो बहुतांशी टिळकांनीच तयार केलेला होता. सभेचे काम पूर्वी रानडे करीत असता त्याबद्दल सरकारमध्ये असंतोष होताच पण टिळक सरकारचे उघड उघड टिकाकार असल्यामुळे त्यांच्याविषयी सरकारमध्ये व्देषभावना होती. त्यामुळे सभेच्या अर्जांना आणि पत्रांना कधीच सरळ उत्तरे सरकारने दिली नाहीत. १८९७, २१ मार्चच्या "मराठा" मध्ये टिळकांनी लिहीले की "सरकारने अर्जाचा विचार त्याच्या मताशी सहमत किंवा विरोधी पाठविला तरी पण सरकार लोकाविषयी धोरणाचा विरोध करु शकत नाही."[61]

सार्वजनिक सभेशी सरकारने संबंध तोडल्यावर टिळकांनी जी टिका के सरकारवर केली त्यात टिळकांची भावना व्यक्त झालेली आहे. "सभेसारख्या ज्या सार्वजनिक संस्था आहेत त्या सरकारी ठरावाने उत्पन्न होत नाही आणि लयासही जात नाहीत. त्यांचे जनन मरण लोकाश्रयावर अवलंबून असते. "हम करे सो कायदा" हया धोरणावर चाललेल्या राज्यव्यवस्थेत या संस्थेच्या उद्योगामुळे व्यत्यय येतो. सभेच्या खटपटीमुळे सरकारी अधिकारी संतापले आहेत पण सभेचे प्रयत्न कायद्यानुसार असल्यामुळे ते बंद करता येत नाही. म्हणून काहीतरी सबब काढून सभेवर तुटून पडणे हे सरकारच्या बुध्दीचे द्योतक आहे."

शेतकऱ्याच्या समस्या सरकारपुढे आणण्यासाठी टिळकांसारखा नेता प्रथमच शेतकऱ्यांना लाभला होता. दुष्काळ निवारक योजना त्वरीत लागू करावी एवढीच त्यांची मागणी होती तरीपण सरकारने त्याकडे लक्ष दिले नाही. उलट सार्वजनिक सभेच्या स्वयंसेवकांना त्रास देण्यास सुरुवात केली.

---

६१. पूर्वोक्त, पृ. ७८-७९

सार्वजनिक सभा भरविणे, किंवा ग्रामीण विभागात संचार करणे ह्या सारख्या क्षुल्लक गोष्टी करू दिल्या नाहीत. उलट "शेतसारा भरणे असह्य असल्यास शेतक-यांनी तो भरू नये" असा प्रचार करणा-यांना गंभीर धमक्या दिल्या गेल्या. तरीपण कार्यकर्त्यांनी आपला प्रचार चालूच ठेवलेला होता.[६२]

१७ नोव्हें. १८९६ च्या केसरीत टिळकांनी "दुष्काळ" या मथळ्याखाली लेख लिहिला की, दुष्काळ संबंधाने जे विशेष वाटले ते लिहीलेच आहे व खरा दुष्काळही पडलेलाच आहे. गुरे कवडयाच्या किंमतीत विकली जात आहे. खेडयातून लोक शहरात कामासाठी येत आहेत अशा परिस्थितीत सरकारने, लोकांनी आणि पुढा-यांनी काय करावे याबद्दल लिहीलेलेच आहे. या बाबतीत सरकारशी भांडून उपयोग नाही सरकारने आपले धोरण प्रसिध्द केले आहे तेव्हा या संबंधाने ठिकठिकाणच्या पुढा-यांनी जिल्हा तालुक्यात कमेटी नेमून आपल्या हद्दीतील लोकांची स्थिती सरकारला कळविली पाहिजे."[६३] असा ह्या लेखाचा आशय आहे.

टिळकांचे म्हणणे होते की "सरकार जे जे करील त्यांचा लोकांनी पूर्ण फायदा घेतला पाहिजे. सामान्य लोकांना ह्या गोष्टी कळत नाही म्हणून पुढा-यांनी त्या त्यांना समजावून सांगितल्या पाहिजेत. "सरकारी तिजोरीतील पैसे पुरले नाही तर आम्ही कर्ज काढून लोकांचे जीव वाचवू"[६४] असे स्टेट सेक्रेटरी पार्लमेंटमध्ये एकदा बोलले होते याचा आधार घेऊन टिळक लिहितात की, सरकारची इतकी तयारी असताना असताना लोकांनी का भुकेने मरावे. दाता खरा असल्यास टिकेल नाहीतर त्याचा फोलपणा अनुभवास येईल.

---

६२. डॉ. करंदीकर : आ.भा.शि. पृ. ५८
६३. केसरीतील राजकीय लेख : पृ. ५७८-८१
६४. केळकर : चरित्र, पूर्वार्ध : पृ. ५११-१२

अधून मधून केसरीतून लेख प्रकाशित करणे हे टिळकांचे कार्य मुख्य होते. "दुष्काळ निवारण्याची तयारी" हा २४ नोव्हें. १८९६ या लेख आणि "दुष्काळाचे स्वरूप" हा दुसरा १ डिसें. १८९६ या लेख टिळकांच्या राजकीय लेख खंडात आढळतो.[६५] या लेखामध्ये दुष्काळात कोणीही मरु नये, सरकार काय करणार आहे, लोकांचे कर्तव्य, दुष्काळाचे, सार्वजनिक सभेचा अर्ज, सरकारी अधिका-यास विनंती, मोघोस सूचना इ. बद्दल विस्तृत माहिती लिहिलेली आहे.

टिळकांनी लोकांना सरकारकडे निर्भयपणे दाद मागायला प्रवृत्त केले. "मृत्यू आ वासून समोर उभा असतांना देखील तुम्ही धिटाई नाही का दाखवू शकणार? आपण वाटेल तितक्या दुष्काळांना तोंड देवू शकु, पण असा दुष्काळ इंग्लंडमध्ये पडला असता आणि मुख्य प्रधान आपल्या व्हाईस रॉय सारखे उदासिन असते तर सरकार बडगडायला वेळ लागला असता काय?" असा सवाल टिळकांनी जनतेला केलेला आहे.

"जमिनीच्या सा-याची तहकुबी व सूट" या मथळ्याखालील अग्रलेखात २९ डिसें. १८९६ ला टिळक केसरीच्या अंकात लिहितात की, "एका हातात फॅमिन रिलीफ कोड आणि दुस-या हातात अर्ज मनात त्याप्रमाणे मागण्याचा निश्चय अशी जेव्हा रयतेची स्थिती होईल त्यांची या दुष्काळात दाद लागेल नाहीपेक्षा दुष्काळ निवारणार्थ चांगला कायदा केल्याचे श्रेय सरकार घेईल आणि आम्ही उपाशी मरू. कायदा करण्याचे काम सरकारचे आहे पण त्याची अंमलबजावणी करून घेणे, ही आमच्या हातातील गोष्ट आहे. आणि ह्याकरिता शंभरदा नव्हे हजारदा ओरडावयास लागले अथवा अर्ज करावयास लागले तरी ते आम्ही केले

---

६५. केसरीतील लेख : पृ. ५८२ आणि ५८५

पाहिजेत."[६६] १९ जाने. १८९७ च्या सा-याच्या सहकुबीबद्दल सरकारचा ठराव" हा लेख प्रसिध्द केला होता.[६७] यात जनतेला स्वत:च्या सामर्थ्याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न टिळकांनी केला होता.

२२ डिसें. १८९६ च्या "ह्यावेळी तालुक्यातील पुढा-यांचे कर्तव्य" या केसरीच्या लेखातही बराच आशय प्रगट केला होता "शेतकरी किंवा मजूर लोक अज्ञानी व गरीब असतात. त्यांच्याकरीता खरा उद्योग सुशिक्षित लोकांनीच केला पाहिजे व जोवर तालुक्यातील पुढारी हे करणार नाही तोवर आमच्या देशाचे दुर्दैव अद्याप संपले नाही असेच म्हणावे लागेल."[६८] या निवडक लेखावरून टिळकांच्या लोकाभिमुख राजकारणाचे स्वरूप लक्षात येते.

अशाप्रकारे टिळकांनी सरकारने दिलेल्या अभिवचनाच्या आणि कायद्याने घेतलेल्या जबाबदारीच्या आधारावरच शेतकरी लोकांमध्ये आपल्या हक्काची जाणीव उत्पन्न करून सरकारशी कायदेशीर रितीने कसे भांडावे आणि कायद्याने दिलेले हक्क आपल्या पदरात कसे पाडून घ्यावे याचे शिक्षण देण्याचे कार्य सुरु होतेच. त्यासाठी सार्वजनिक सभेचे प्रचारक कार्य करीत होते. खेडोपाडी जाऊन "भरपूर पिक नसेल तर सारा भरू नका" असे सांगू लागल्याने आणि केसरीने त्यांना पाठिंबा दिल्यामुळे सरकारी अधिका-यांची झोप उडाली आणि ॲंग्लो इंडियन पत्रकारांनी "टिळकांनी आर्यलंड मधील पाटीलप्रमाणे हिंदी शेतक-यात बंडबंदीची चळवळ सुरु केली

---

६६. केसरीतील लेख : पृ. ५९७-६००
६७. पूर्वोक्त : पृ. ६०१ ते ६०४
६८. पूर्वोक्त : पृ. ५९२-९६

आहे."[६९] अशी ओरड सुरू केली.

शेतकरी लोकांना स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव करून देणा-या शब्दांना यश आले नसले तरी इंग्रज अधिका-यांना मात्र ते झोंबल्यावाचून राहिले नाही. १८९७ जानेवारीत "शेतक-यांची तहकुबी व माफी" या विषयावरील केलेल्या अर्जात १८९७ चे सरकारी धोरण १८७६ च्या धोरणाहून कमी उदार आहे हा मुख्य मुद्दा असल्यामुळे चिडलेल्या इंग्रजी अधिका-यांनी सार्वजनिक सभेच्या प्रचारकांवर व इतर लोकांवर खटले भरले गेले तेव्हा टिळकांनी १५ डिसें. १८९६ च्या केसरीच्या अंकात "पोलीसांच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्प्यात भरलेली रयतेची चंगी सभा" या शिर्षकाखाली अग्रलेख लिहिला.[७०] त्यात ते म्हणतात की, "हे राज्य कायद्याचे आहे दांडगाईचे नव्हे —— तुमची पीके बुडली असतो तर तुम्ही सारा देवू नका —— योग्य रीतीने रयतेच्या पोटाकरिता भांडत असता एखादास तुरुंगात जाण्याचा प्रसंग आला तरी हरकत नाही हे कायद्याचे व ओरडण्याचे राज्य आहे. कायदा सरकारने केला आहे, ओरडण्याचे काम आमचे आहे —— आम्ही ते निमूटपणे केले नाही तर त्याचा सर्व दोष आमच्या माथी येणार आहे". यावरून टिळकांच्या कार्याचे स्वरूप किती प्रखर होते हे दिसून येते.

यावेळी टिळक कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनाला जात असता त्यांच्या काही सहकार्यावर खटला भरला गेल्याचे वृत्त कळताच ते परतले परांजपे, आपटे, साठे व इतर तत्कालीन निवारक स्वयंसेवकांना अटक झाली होती. खटल्याची सुनावणी पेठाला करण्यात आली. टिळक स्वतः तिथे उपस्थित होते. तेथील परिस्थितीचे वर्णन रामभाऊ मांडलीक चे स्वतः

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

६९. डॉ. करंदीकर : आ.भा. शिल्पकार, पृ. ५८
७०. केसरीतील लेख : पृ. ५८८-९२

उपस्थित होते त्यांच्या शब्दात "खटल्याच्या पहिल्या दिवशी कलेक्टरच्या तंबूला हजारो लोकांचा गराडा पडला होता आणि "टिळक महाराज की जय" असा जयघोष सुरु होता पोलिसांनी लोक शांत होत नाही पाहून कलेक्टरने टिळकांना लोकास शांत करायला सांगितले. टिळक बोलू लागताच एकदम शांतता पसरली आणि खटल्याचे काम पाच मिनिटात आटोपले. प्रो. पराँजप्यांना निरपराध ठरवून इतरांचे खटले पुढे ढकलले त्यानंतर भारत वा इंग्लंड मध्येही अशा प्रकारच्या खटल्यासाठी निरक्षर शेत-क-यांची इतकी गर्दी मला कधीच दिसली नाही हे आपल्या लोकप्रियतेचे प्रत्यक्ष प्रमाण्य आहे" असे कलेक्टरने टिळकांना भेटून म्हटल्याचे स्मरते.

या चळवळीमुळे सरकारला लवकरच दुष्काळ निवारण कायद्याची अंमलबजावणी करणे भाग पडले. यासाठी ब्रिटन मध्येही निधी उभारला गेला. परंतु अहमदनगर आणि सोलापूर येथील विणकरांच्या दुष्काळी मदतीवर हक्क असताना सुध्दा ती त्यांना देण्याविषयीची टिळकांनी केलेली विनंती सरकारने नाकारली आणि सार्वजनिक सभेला दिलेली मान्यताही काढून घेतली त्यानंतर १८९७ पासून सार्वजनिक सभा निस्तेज झाली.[७१]

१८९६-९७ या काळात टिळकांनी सतत लेख लिहून दुष्काळाच्या प्रश्नाला जीवंत ठेवले पत्रकार या नात्याने ही दुष्काळी राजकीय चळवळ टिळकांनी अविस्मरणीय करून दाखविली आता सरकारचा एक शत्रू म्हणून उघड उघड इंग्रज अधिका-यांनी टिळकांवर नजर ठेवण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या प्रत्येक हालचालींवर सरकारचे बारीक लक्ष होते. प्लेगच्या संदर्भात त्यांनी लिहिले-ल्या लेखावरून त्यांच्यावर खटला भरला.

---

७१. डॉ. करंदीकर : आ. भा. शिल्पकार : पृ. ५९-६०

<u>पुण्यातील प्लेग :</u>

दुष्काळी कार्यामध्ये पूर्णपणे गुंतले असतानाच १८९७ च्या प्रारंभी प्लेगने आणि नंतर प्लेगला आळा घालणाऱ्या सरकारने योजलेल्या उपायांनी पुण्यात उठविलेल्या कहराकडे टिळकांना लक्ष पुरवावे लागले. प्लेगची साथ पहिल्यांदा मुंबईला आणि नंतर पुण्यात पसरली.

ऑक्टो.च्या १८९६ च्या सुरुवातीला मुंबईतील मांडवी भागात पहिल्यांदा प्लेग रोग पसरण्यात सुरुवात झाली. एका महिन्यामध्ये ४०० लोक मेल्याचे रजिस्टर मध्ये नोंदविले गेले. प्लेगने इतके लोक मारले गेले होते की स्मशानात आणि दफन भूमिमध्ये रांगा लावाव्या लागत होत्या असे त्यावेळचे वृत्त आहे. भितीने गांगरून गेलेले लोक घरातून पळून जात आणि त्यामुळे साथ अधिक पसरण्यास मदत होई. प्लेगची साथ कोंच आणि गुजरातमध्ये थोडी पसरली होती पण त्याला जवकरच आळा बसला.आक्टो. १८९६ ला पुण्याला पहिली प्लेगची केस आल्याचा रिपोर्ट आहे. ६ आक्टो. च्या केसरी अंकात लिहीले होते की, "येथील काही डॉक्टर लोकांच्या पाहण्यात मुंबईहून आलेल्या मंडळीपैकी एक दोन इसमामध्ये तेथील ज्वर काही सौम्य रुपाने आल्याविषयी त्यांनी आम्हास कळविले आहे."[७२] प्लेगच्या उद्भवाचा हाच पहिला जाहीर उल्लेख होता.

हा रोग इंग्लंड अधिकाऱ्याच्या परिचयाचा असल्यामुळे प्लेग निवारण्याचे उपाय ताबडतोब योजले जाण्याविषयी ब्रिटिनकडून भारत सरकारला निकडीच्या तारा येवू लागल्या टिळकांनी केसरीतून सर्व प्रथम प्लेगसंबंधी सर्वसाधारण माहिती देण्याकरिता २ व ९ फेब्रुला दोन लेख तज्ञ डॉक्टराकडून लिहून प्रसिध्द केला.[७३] या लेखामध्ये प्रत्येक घरवाल्यांनी प्लेग विषाचा कणनकण आपल्या घरात येवू न देण्याची खबरदारी घ्यावी

---

७२. पर्वते : बा. ग. टिळक : पृ. ८३-८४
७३. कोळक : टिळक चरित्र पृ. ५१८-१९

असा सल्ला देऊन बिनसाधनांच्या माणसांनी घरचे रोगी प्लेगच्या दवाखान्यात ठेवण्याची काळजी घ्यावी असे लिहीले. "मराठा"मधूनही हे लेख इंग्लिशमधून प्रकाशित करण्यात आले होते.

४ फेब्रु. १८९७ ला स्टेट सेक्रेटरीने दबाव आणल्याने कायदे कौन्सिलात प्लेगविषयी एक सर्वव्यापक कायदा मंजूर करुन लष्करी थाटाचे अधिकार आपल्या नोकरवर्गाला सरकारने दिले ते उपाय करण्यास अडथळा आणणाऱ्यांना शिक्षा दिल्या. हा कायदा लोकमताला धरुन नाही व त्याची अंमलबजावणी त्रासदायक होईल अशी तक्रार नामदार आनंदा चार्लु आणि दरभंग्याच्या महाराज इ. वरिष्ठ गृहस्थानी केली पण त्यामुळे काहीच झाले नाही.[७४]

टिळकांनी १६ फेब्रुला केसरीत "ग्रंथिक सन्निपात व सरकार" हा अग्रलेख[७५] लिहून त्यात सरकारने केलेल्या कायद्याचे विवेचन केले आहे. प्लेग रोगाचा प्रसार न होऊ देण्याची काळजी घेण्याची लोकांना विनंती केली आहे आणि सरकारला सुध्दा रोगासंबंधीच्या अंमलबजावणीबद्दल काही सुचना केलेल्या आहेत. लोकस्थितीकडे पाहून कायद्याची अंमलबजावणी करावी असा सरकारला आग्रह केला आहे.

कायद्यानुसार १७ फेब्रु ला साथीच्या रोगाला सामना देण्यासाठी सरकारने एक समिती नेमली. त्याचे अध्यक्ष रँड हे सिव्हील सर्व्हंट होते. प्लेग दैवी प्रलय होता पण त्याला आवर घालण्याकरिता सरकारने योजलेले उपाय मानवी असूनही त्यामुळे पुण्याच्या लोकांना इतके हैराण केले की, एक वेळ रोगाने मरणे परवडेल पण सरकारी उपायांचा जुलूम नको असी

---

७४. केळकर : पूर्वार्ध : पृ. ५२०-२१
७५. टिळकांचे केसरीतील लेख : राजकीय खंड १ पृ. ६०८-१२

लोकांची भावना होवू लागली. स्वत: गर्व्हनरने पुण्यास जाऊन लोकांना त्रास यामुळे होणार नाही असे आश्वासन दिले होते त्याला काहीच अर्थ राहिलेला नव्हता.[७६]

कोणत्याही घराची पूर्वसूचनेशिवाय झडती घेतली जाई आणि कोणत्याही व्यक्तीला जबरदस्तीने इस्पितळात ठेवले जाई. या दोन उपायांची अंमलबजावणी ब्रिटिश सैनिकांच्या हाती सोपविल्याने पुण्यात पराकाष्ठेचा क्षोभ उसळला. सुरुवातीला टिळकांनी सरकारशी सहकार्य करण्याचे धोरण अवलंबिले होते तसे त्यांनी केसरीतून लोकांना सरकारला साथ समूळ नष्ट होण्यास मदत करा" असे आव्हानही केले होते. प्लेग जेथे उद्भवेल त्या घरांची तपासणी साफसफाई इत्यादी कामे जुलमाने करून घेतल्याचा अनुभव आल्याने "विनाकारण त्रास व जुलूम यास रोगापेक्षा-ही लोक जास्त भित आहे" असा इशारा सरकारला केला लोकांनी घाबरून न जाता गर्व्हनरने दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवावा" असा दिलासा दिला आणि बंदोबस्ताच्या सुरुवातीला जे लोक गाव सोडून पळाले त्यांचीही टिळकांनी कानउघाडणी केली. "बंदोबस्ताबद्दल नुसत्या शंका घेणे हे असंमजसपणाचे लक्षण आहे" असा त्यांचा लेखाचा अभिप्राय २ मार्च १८९७ च्या केसरी अंकात" साथीच्या तापाच्या निवारणार्थ मुंबई सरकारने केलेले नियम"[७७] या अग्रलेखात आलेला आहे.

फेब्रुवारीमध्ये दररोज १२५ रोगी दवाखान्यात दाखल होत. ह्या संसर्गजन्य रोगाबद्दल टिळकांनी सतत केसरी, मराठा मधून लेख लिहून लोकांना रोगापासून बचाव करण्याच्या उपायांचा अवलंब करायला सांगितले.

---

७६. फाटक : लोकमान्य, पृ. १३७-१३८
७७. केसरीतील लेख पृ. ६१३-१६

९ मार्च १८९७ च्या केसरीतील "साथीच्या तापाचा प्रसार बंद करण्या-करिता नवी योजना" [७८] या लेखात अशाच प्रकारचा आशय असल्याचे दिसून येते.

टिळकांना गर्व्हनरने दिलेल्या आश्वासनाचा फोलपणा प्रत्ययाला येवू लागल्याने आणि रँण्ड च्या नेतृत्वाखालील प्लेग निवारक कार्यातील छळवाद आणि मुर्खपणा वाढतच चालला तेव्हा मात्र टिळकांनी आपले धोरण बदलले. गर्व्हनर लॉर्ड सँलर्ड श यी इच्छा लोकांना त्रास होवू देण्याच्या अभिप्रायाबद्दल टिळकांनी केसरीतून त्यांचे आभार मानले पण सैनिकांच्या गैरवर्तनाबाबत टिळकांनी टिका केल्याचे आढळते. १६ मार्च १८९७ च्या लेखात "पुण्यात सध्या चालू असलेला धुमाकूळ" या मथळ्याखालील अग्रलेखात लिहिले की "साथीच्या रोगामुळे यंदा सिमगा आठवडा दिवस आधीच झाला असे हल्ली ठिकठिकाणी घरातील कापडयांच्या होळया होत आहे त्यावरून वाटण्याचा संभव आहे." [७९] आणि लोकांना अधिक त्रास न देण्या-बद्दल सरकारला सुचविले त्यांचे लेख वाचले म्हणजे त्यांची लोकाविषयी कळकळ लक्षात येते.

फेब्रु. ते मे १८९७ पर्यंत पुण्यात प्लेग निवारण्यासाठी गोऱ्या सोजिराकडून लोकांची घरे तपासणे, लोकांना सक्तीने हॉस्पीटलमध्ये व सेग्रिगेशन कँप मध्ये नेवून ठेवणे, लोकांची घरे साफ करणे, घरांना धुरी देऊन सफेदी करणे इत्यादी कामे होती. काही दिवस सैनिकांनी व्यवस्थित काळजीपूर्वक कामे केली. [८०] पण तपासणीच्या नादाने जे लष्करी अधिकार

---

७८ पूर्वोक्त, पृ. ४१७-२१

७९. केसरीतील लेख ४१४६२१-२४

८०. जावडेकर : आधुनिक भारत पृ. २४९

माजविले धाई, लोकांच्या खाजगी संपत्ती, मालमत्तेचा ध्वंस पाहून टिळकांनी त्याचा निषेध "पुण्यावर आलेला तथ्याचा प्रसंग" या ६ एप्रिल १८९७ च्या अग्रलेखात केला आहे.[८१] जालीम रोगावर जालीम उपाय पाहिजे असा आशय असला तरी रॅण्डच्या उपायांनी भयभीत झालेल्या जनतेत पुन्हा विश्वास निर्माण व्हावा म्हणून टिळकांनी स्वतः मार्च मध्ये "हिन्दू प्लेग हॉस्पिटल" उघडले आणि त्यासाठी सहाय्यनिधी जमा केला. या हॉस्पीटल मध्ये लोकांना घरगुती वातावरण मिळाल्याने लवकरच त्या हॉस्पिटलचे नाव गाजले. इंग्रज सरकारने ही या हॉस्पिटल उघडण्याला कोणतीच हरकत घेतली नव्हती या दवाखान्याची व्यवस्था गावातील विभिन्न वर्गाच्या पुढाऱ्यांच्या कमेटीकडे देण्यात आली आणि त्यांनी लोकांना चांगली वागणूक दिली होती.[८२]

मे अखेर प्लेगचा प्रादुर्भाव संपल्यानंतर हे हॉस्पिटल बंद करण्यात आले. आणि १६ मे १८९७ ला रॅण्ड च्या सहीने एक नोटीस प्रसिध्द करून प्लेगची तपासणी थांबविण्याचे जाहीर केले ही अधिकृत घोषणा होवूनही रॅण्डशाहीचा जुलूम व छळ सुरूच, पूर्ववत चालू होता. प्लेग पूर्णपणे ओसरला असला तरी सुरळक लागण सुरू होती. म्हणून रॅंडनी आपले कार्य चालूच ठेवले होते.[८३]

टिळकांनी सरकारने अवलंबिलेल्या रानटी उपायांची कडाडून टिका केली गोष्ट अप्रिय असली तरी टिळक ती स्पष्टपणे लिहीत असत. अधिकाऱ्यांच्या अपमानकारक छळाबद्दल लिहिले की "आम्ही गरीब असे झालो म्हणून या सर्व गोष्टी चालल्या आहेत" २७ एप्रिलच्या अंकात इंग्रज सैनिकांच्या जमावाबद्दल लिहिले की, "पुण्यात लष्कर इतके जमविले होते की, पेशवाई गेली तेव्हा सुध्दा एलफिस्टन जवळ इतके नसतील". प्लेगच्या

---

८१. केसरीतील लेख : पृ. ६३१-३६
८२. फाटक लोकमान्य, पृ. १३९
८३. पवते : टिळक पृ. ८७-८८

कायद्याने झुलूम करण्याचा जणू परवानाचा इंग्रज अधिकाऱ्यांना मिळाला होता. सुधारक पत्राने सुध्दा सरकारच्या झुलुमाविरुध्द लेख लिहीले होते.[८४]

पुण्यातील ह्या घडामोडींचे पडसाद लंडनमध्येही उमटले होते. प्लेग प्रतिबंधक योजनेची अंमलबजावणी गोखल्यांनी स्वत: पाहिलेली होती. ते वेल्बी कमीशन पुढे साक्ष देण्यासाठी लंडनला गेले असता मित्रांच्या आग्रहामुळे गोखल्यांनी पुण्यातील नागरिकांवर झालेल्या अत्याचाराचे वृत्तांत सांगणारे पत्र मन्चेस्टो गार्डीयनकडे रवाना केले. पण भारतमंत्र्यांनी हे आरोप व्देषामुळे केले म्हणून फेटाळून लावले. आणि ब्रिटिश पार्लमेंटचे सदस्य डे मंचरजी भावनगरी यांनी तर "घृणास्पद खोटारडे" म्हणून गोखल्यांची संभावना केली.[८५]

खुन खटला प्रकरण :

मध्यंतरीच्या काळात प्लेग कालीन अत्याचाराचे पर्यवसान भीषण हत्येत झाले. १८९७ ला व्हिक्टोरिया राणीच्या राजपदाला ६० वर्ष पूर्ण झाली होती या साठ वर्षाचा जुबली महोत्सव २२ जुन १८९७ ला पुण्याच्या गव्हर्नमेंट हाऊसवर साजरा करण्यात आला. या समारंभाच्या निमित्त मेजवाणीहून परत येताना गणेश खिंड रस्त्यावर पुण्यातील प्लेगचे मुख्याधिकारी रॅण्डचा खून करण्यात आला व त्यांच्या समोरिल गाडीत असलेले स्टेट गव्हर्नर आयर्स्ट यांचाही खुन त्याचवेळी करण्यात आला. ते जागेवर मरण पावले. मि. रॅण्ड यांना हॉस्पिटलमध्ये दहा दिवसान्तंर मृत्यु झाला.

---

८४. केळकर : चरित्र, पृ. ५२९-३३
८५. डॉ. करंदीकर : आ. भा. शिल्पकार, पृ. ६४

या काळात पुण्यातील प्लेग संसर्ग संपून पुणे शहर पूर्ववत झाले होते आणि अशावेळी असला काही भयंकर प्रकार होईल असे कोणासही वाटले नव्हते. पण हे खून झाल्यामुळे संपूर्ण ब्रिटिश साम्राज्य हादरुन गेले त्यामुळे ब्रिटन पासून पुण्यापर्यंत सर्वत्र भारतातील वाढत्या असंतोषाची आणि राजद्रोहाची चर्चा सुरु झाली.[८६]

टिळक स्वतः त्या समारंभात उपस्थित होते. खुनाइतकेच त्या मागून उसळलेल्या दडपशाहीने ते हादरुन गेले. "टाईम्स ऑफ इंडिया" या वृत्तपत्राने व्देषबुध्दीने या भयंकर कृत्यावर जी टिका केली आणि कलेक्टरने शहरातील पुढा-यासमोर जे भाषण केले त्याला प्रत्युत्तर देताना टिळकांनी २९ जून १८९७ च्या केसरीच्या अग्रलेखात "गेल्या मंगळवारी रात्री घडलेल्या भयंकर प्रकार" या मथळयाखाली लेख लिहीला. त्यात खुनाच्या घटनेबद्दल विस्तृत माहिती लिहिल्यानंतर युरोपियांनी केलेले खोटे आरोप खोडून काढले. "कलेक्टरच्या भाषणातुन वडयाचे तेल वांग्यावर पडू पाहत आहे" आणि चौकशी होण्यापूर्वीच टाईम्सने केलेला आरोप गैरशिस्तीचा आहे. याची जाणीव करुन दिली. आणि शेवटी लिहिले की, "आपणा सर्वांनाच ज्याचा विशाद वाटेल अशा प्रकारचे अनन्वित कृत्य करण्याचे एखाद्या माथेफिरुच्या डोक्यात आले एवढयामुळेच त्यांनी केलेले सहकार्य आणि त्या जातीत आढळणारी सद्भावना व धीरगंभीरता याकडे डोळेझाक करणे मुर्खपणाचे होय".[८७]

पुण्याच्या ब्राम्हणाविरुध्द आंग्ल भारतीयांनी "ब्रिटिश सरकार उलथून पाडण्याचा कट ही जात रचीत आहे" या हाकाटीला ब्रिटिश पुत्रेही एका सुराने साथ देत असल्याची "डेलीमेल" च्या पुढील उता-या-वरुन दिसुन येते. "पुण्यातील खुनामागे कोणताही माथेफिरुपणा नाही.

---

८६. जावडेकर : आ. भारत, पृ. २४८
८७ केसरीतील लेख, पृ. ६६८-६७२

उभ्या देशात झिमत असलेल्या राजद्रोहाचे आणि बंडखोरीचे पुणे हे केंद्रच आहे. सा-या भारतभर पुण्याचे ब्राम्हण, विशेषत: त्यातले सुशिक्षित सुप्रसिध्द आहेत. स्वत:ची वृत्तपत्रे तसेच स्वत:चे गुप्त वार्ताहर आणि गूढ संकेत यांच्या सहाय्याने ब्रिटिश सत्तेविरुध्द बंड उभारण्याचा त्यांचा खटाटोप चालू आहे आणि रॅण्ड साहेबांचा खून ही त्या बंडाची पहिली सलामी होय"[८८]

२८ जूनला कलेक्टर मि. लॅंब यांनी म्युन्सिपल टेक्निकल स्कूलच्या इमारतीत लोकांची सभा बोलावून त्यांना बजावले की, "राजद्रोह, कट-कारस्थाने आणि खून या गोष्टी फैलावत जातील तर ज्याला आळा घालायला आपण स्वत: असमर्थ असल्याचे तुम्ही सिध्द कराल त्याला तुमच्या वतीने आळा घालण्याच्या दृष्टीने सरकार कडक उपाय योजना करील, असा गंभीर इशारा देण्यासाठीच मी या ठिकाणी उपस्थित झालेला आहो."[८९] अशा भयग्रस्त वातावरणामध्ये कलेक्टरचे भाषण लोकांवर दडपण आणण्यात यशस्वी झाले. व्यक्तिश: टिळकांना प्रत्यक्ष खुनाच्या कटात अडकविण्याचे प्रयत्न झाले. "टिळकांचे लेख आणि भाषणे राजद्रोहाला चिथावणी देतात असे सरकारला नाही का वाटत?" अशा आशयाचे प्रश्न ब्रिटिश पार्लमेंट मध्ये मसरंजी भावनगरींनी विचारले असता "ही कायद्याची बाब असून मुंबई सरकारला अजून त्या संबंधी अंतिम निष्कर्ष काढता आले नाही" असे सूचक उत्तर त्यांच्या प्रश्नांना मिळाले होते.[९०]

---

८८. डॉ. करंदीकर : पृ. ६६-६७
८९. केळकर : चरित्र पूर्वार्ध, पृ. ५४३-४४
९०. डॉ. करंदीकर : पृ. ६८

टिळकांवर इंग्रज अधिका-यांना संशय होताच टिळकांच्या जहाल राजकारणामुळे लोकांमध्ये प्रतिकार बुध्दी जागृत होते. आणि लोक जागृत झाले म्हणजे असले खून प्रकार होतात. असा बादनारायण संबंध टिळकांशी लावून पुण्यातील वृत्तपत्रावर आग पाखडण्यास सरकारी अधिकारी आणि ॲंग्लो इंडियन वृत्तपत्राने सुरुवात केली.[११] तेव्हा टिळकांनी केसरीत ६ जुले १८९७ ला "सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?" या मथळ्याखाली लेख लिहीला. त्यात जादा पोलीस ठरावाचा उल्लेख करून "एखादा मोठा हत्ती पिसाळला असता ज्या प्रमाणे जो वाटेल त्यास तुडवीत सुटतो तद्वत आमच्या सरकारची स्थिती झाली आहे, व खुन्यास जो खून पचवायाचा तो आमच्या सरकारात पडून सरकारची नजर अगदी फिरून गेली आहे". मि. लॅबच्या भाषणावरही टिळकांनी स्पष्टीकरण दिलेले आहे. आणि "पायोनिर" या वृत्तपत्राच्या ओरडयावरही त्यांनी टिका केली आहे. वरून सरकारला विनंती केली की, "त्यांनी निरपराधी लोकांवर जे विनाकारण शस्त्र धरले आहे ते बंद ठेवावे". ब्राम्हण लोकांनी खुनाचा कट केला ही समजुत चुकीची असल्याचे सांगून शांततेच्या मार्गांनी खुनाचा शोध घ्यावा असे आपल्या लेखात म्हटले आहे.[१२]

पण दिवसेंदिवस राज्यकर्त्यांचा पवित्रा आक्रमक होत असल्याचे आढळून टिळकांनी १३ जुले १८९७ च्या केसरी अंकात "राज्य करणे म्हणजे सुड उगविणे नव्हे" हा अ अग्रलेख लिहीला "राज्य करणे म्हणजे जेथे तेथे आपली तलवार काढून "मानवा तु काय समजलास, तुला सुपारीच्या खांडासारखा खाऊन टाकीन, मारीन, जाळीन, पोळीन,"[१३] अशा त-हेने

---

११. जावडेकर : आ. भारत पृ. २४९

१२. केसरीतील लेख : पृ. ६७२-७८

१३. केसरीतील लेख पृ. ६७८-८१

लोकास एकसारखे भिववित सुटणे नव्हे. सरकारला ह्या खुनाने जितके चकीत केले आहे तितकीच जनता ही चकीत झाली असता सुशिक्षित लोकांचा दोष पूर्ण पुरावा नसतानाही त्यांच्या दोषारोपण करणे चुकीचे आहे असे लेखाचा शेवट करताना टिळकांनी लिहीले आहे.

त्यानंतर २० जुलै १८९७ ला राजद्रोहाचे विश्लेषण करतांना टिळक केसरीच्या अंकात राजद्रोह कशाला म्हणतात."[२४] या अग्रलेखात लिहीतात की, पुण्यातील ब्राम्हणांनी जर खरोखरच बंड करण्याचा इरादा केला असेल तर त्यास शोधून काढून शिक्षा करा तितकी साधने सरकारजवळ आहेत राजद्रोहाचा अर्थ सांगताना म्हणतात की, सरकारबद्दल जनक आहेत राजद्रोहाचा लोकांच्या मनात "अप्रिती" किंवा व्देष निर्माण करणे याला राजद्रोह म्हणतात पिनलकोडमधील कलमात बदल केल्याशिवाय वृत्तपत्रे राजद्रोही आहेत हे सिध्द होणार नाहीत. आणि केसरीतील लेख कायदेशीर रीत्या आपले हक्क बजावीत आहेत. कायदेशीर रित्या सरकारला न्याय मागणे वृत्तपत्राचे कर्तव्य आहे" असा टिळकांच्या लेखांचा आशय आहे. या अग्रलेखातून त्यांनी गर्भित आरोपांना सडेतोड उत्तरे दिली होती.

संशय आणि भीतीच्या वातावरणात असे परखड उद्गार काढल्याबद्दल टिळकांच्या मित्राने त्यांना विचारले असता टिळक म्हणाले की" मी कडक भाषा लिहितो हे मी मान्य करतो पण अधिका-यांनी चालविलेल्या अन्यायामुळे माझ्या मनात संतापाचे कढ येत आहे बाहेर पडणारे हे उद्गार म्हणजे माझ्या अंतकरणात असलेल्या भावना प्रक्षोभाचा स्वाभाविक उत्स्फूर्त आविष्कार आहे, पण मी भाषा कितीही कडक वापरीत असलो तरी सरकारवर टिकेची झोड उठवताना मी कायद्याच्या मर्यादा मात्र पाळीत

---

२४. पूर्वोक्त, पृ. ४८२-८७
२५.

असतो, अशी माझी खात्री आहे."[९५] असे म्हटल्याचे त्यांच्या मित्रांनी आपल्या पुस्तकात नमूद केले आहे. केसरीच्या पंजाची तीव्र नखे प्रथम जरी सरकारला झोंबली नाहीत तरी १८९३ पासून व नंतरच्या काळात केसरीने काढलेल्या ओरखडयांनी सरकारच्या अंगाला बरीच आग होवू लागली.[९६]

टिळकांवर खटला :

टिळक प्लेगसंबंधी झालेल्या अन्यायावरील प्रसंग पुस्तकरूपाने सादर करून सरकारी उत्तरे खोटी असल्याचे सिध्द करावे या हेतूने मुंबईला गेले असता २७ जुलै १८९७ ला ९ वाजता १२४ अ अन्वयावाला टिळकांना अटक करण्यात आली. २८ जुलैला चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्टेट स्लॅटर पुढे जामिन देण्याचा प्रयत्न केला गेला पण स्लॅटरने नकार दर्शविला. पुन्हा २ ऑगस्टला जामीनाचा अर्ज हायकोर्टात करण्यात आला तेव्हा ४ ऑगस्टला टिळक जामीनावर सुटले.[९७] टिळकांच्या बचावासाठी सर्व पैसा जनतेने जमविला एकटया इंग्लंडमध्ये ५० हजार रू. जमा करून मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयात टिळकांचा बचाव करण्यासाठी दोन बॅरिस्टर पाठविले. टिळकांच्या जामीनासाठी बद्रुद्दीन तय्यबजी आणि दावर यांनी प्रयत्न केले होते आणि ५० हजाराचा जामीन व्दारकादास धरमसी आणि यशवंतराव नेने यांनी दिला होता.[९८]

---

९५. डॉ. करंदीकर, आ.मा. वि. पृ. ८७
९६. खापर्डे बा.ग. व बाबासाहेब: दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र पृ. १९
९७. पर्वते : बा. ग. टिळक, पृ. १९५-९६
९८. फाटक : लोकमान्य, पृ. १५२-५३

टिळकांवरील खटल्याची सुनावणी ८ सप्टें. १८९७ ला १२ वाजता न्यायमूर्ती स्ट्रॅची समोर सुरु झाली. सर्वप्रथम टिळकांना "क्लार्क ऑफ दी कोर्ट ने" आरोप वाचून दाखविल्यानंतर ज्युरीकरिता सहा युरोपिय आणि तीन भारतीय ठेवण्यात आले आरोपीने गुन्हयाची नाकबुली दिल्यानंतर फिर्यादीतर्फे ॲड ज. मि. लँग यांनी खटल्याची सुनावणी सुरु केली.[९९] त्यात शेवटी ते म्हणाले की, टिळकांनी कुन्याला सहाय्य केले असेल असे सरकारला वाटत असेल तर त्यांच्यावर तसा उघड आरोप ठेवायला हवा होता. तसे न करता १२४ अ कलमाखाली खटला भरला. ही वस्तुस्थितीच सरकारची बाजू लंगडी असल्याचे स्पष्ट केले.

दोन्ही बाजूचे वक्तव्य झाल्यानंतर संध्याकाळी ५ वाजता ज्युरीतील मंडळींनी विचार विनिमय करुन नऊ सभासदापैकी सहा युरोपियन १६ लोकांनी टिळकांविरुद्ध निकाल दिला. न्यायाधिशाने बहुमत मान्य करुन टिळकांना तुम्हाला काही सांगायचे आहे असे विचारले असता टिळक म्हणाले की, "ज्युरीला मी दोषी वाटत असेल पण मला स्वतःला मी निर्दोष आहे असेच वाटते. लेखातील शब्दांच्या अर्थाविषयी जाणत्या विव्दानांची साक्ष सरकारतर्फे व्हावयास पाहिजे होती ती घेण्यात आली नाही येवढेच मला म्हणायचे आहे."[१००]

टिळकांनी सांगितलेली कारणे न्यायाधिशांना पटण्यासारखीच नसल्यामुळे त्यांनी आपला निर्णय घोषीत केला की, "प्लेगच्या बाबतीत तुम्ही सरकारची व लोकांची मोठीच कामगिरी बजावली आहे. तरी पण तुमची बुध्दीमत्ता आणि विव्दत्ता लक्षात घेता तुम्ही लिहिलेले लेख

---

९९. पर्वते : टिळक, पृ. १९८

१००. डॉ. करंदीकर, आ. भा. शि. पृ. ७०-७१

राजद्रोहात प्रवृत्त करतात तुम्ही पुढेही असेच लेख लिहिले असते तर लोकांवर संकटे गुदरली असती. या सर्व गोष्टी लक्षात घेता मी फक्त अठरा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा देतो" कोर्टाचे काम साडे सहा वाजेपर्यंत झाल्यानंतर टिळकांची रवानगी तुरुंगात करण्यात आली.[१०१]

टिळकांना शिक्षा झाल्यामुळे देशात असीम खेदापासून सात्त्विक संतापापर्यंत सर्व स्वरूपाच्या प्रतिक्रिया जनतेने प्रगट केल्या फक्त आंग्ल भारतीय आणि सरकारी गोटात या वार्तेचे सहर्ष स्वागत करण्यात आले. अमरावती येथे झालेल्या १८८७ च्या अधिवेशनात सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी वक्तव्य केले की, "एक समग्र राष्ट्र अश्रु ढाळत आहे. माझ्या हृदयी टिळकांविषयी सहानुभूती आहे. टिळकांवर ठेवलेल्या आरोपाबाबत ते निर्दोष आहे अशी आमची खात्री आहे, असे भारतीय वृत्तपत्रांच्या वतीने सांगताना मला मुळीच संकोच वाटत नाही.

ब्रिटनमध्ये दादाभाई नौरोजी म्हणाले की, "वृत्तपत्रांची मुस्कर-दाबी करणे निव्वळ आत्मघातकी पणाचे होय. "टिळकांवर खटला भरण्या-इतकी घोडचूक कधीच घडली नव्हती. ब्रिटिश शासन ज्या तत्वानुसार चालते ती डावलण्याचा हा एक नविन प्रकार आहे." "डेलिक्रॉनीकल" या ब्रिटिश वृत्तपत्राने लिहीले की, "खराखुरा राजद्रोह सिध्द करा, स्ट्रेची यांनी लावलेला अर्थ इंग्लंडमध्ये सहनच केला गेला नसता अशी आमची खात्री असून तो त्वरेने रद्द न केल्यास भारतात गंभीर स्वरूपाच्या कटकटी उद्भवतील."[१०२] या शिक्षेमुळे टिळक एका रात्रीत राष्ट्रपुरुषाच्या पदवीला पोहचले. आणि नव्या राष्ट्रवादी युगाचा प्रारंभ झाला. केवळ वक्तृत्व नव्हे तर धाडसी वृत्तीने कार्य करण्याची वृत्ती हीच देशभक्तीची खरी कसोटी ठरली.

---

१०१केळकर, लोक. टिळकांचे चरित्र पूर्वार्ध पृ. ५७२

१०२. डॉ. करंदीकर. आ. भा. शिल्पकार, पृ. ७१-७२

राजद्रोहाची शिक्षा टिळकांना झाल्यानंतर दोनदा प्रिव्ही कौन्सिलमध्ये केलेला अपिल अर्ज नाकारण्यात आला. इकडे १४ मार्चला केसरीच्या छापखान्याला जो फडक्यांच्या वाड्यात होता. त्याला आग लागून सर्व छापखाना जळून बेचीराख झाला. यावेळी जगद्हितेच्छु छापखान्याने मदत देवून १५ मार्चचा केसरीचा अंक रात्री छापून दुसऱ्या दिवशी वाटण्यात आला. आगीची हकीकत वाचून जनतेने सहानुभूती व्यक्त केली पण नंतर छापखान्याचा प्रश्न टिळकांनी आपला मित्र नारायणराव फाटक यांच्याकडे मदत मागवून सोडविला. आणि १९ एप्रिल पासून आर्यभूषण छापखान्यातून "केसरी" व "मराठा" पत्रके निघु लागली.[103]

टिळक तुरुंगात असताना त्यांच्या सुटकेसाठी भारत व ब्रिटनमध्ये प्रयत्न सुरु झाले होते. वृत्तपत्रे सरकारवर टिका करुन टिळकांबद्दल सहानुभुती व्यक्त करीत होते. अँग्लो इंडियन वृत्तपत्रांनाही आपला सूर बदलावा लागला. प्रा. मॅक्समुलरांनी टिळकांबद्दल सहानुभूती व्यक्त करुन त्यांना ऋग्वेदाची प्रत पाठविली. "ऑर्यिटला होम इन वेदाज" हा पाच वर्षानंतर प्रसिध्द झालेला ग्रंथ याच पुस्तकाच्या अभ्यासावर आधारित होता. वि. हंटर, रिचर्ड गार्थ दा. नौरोजी, रमेशचंद्र दत्त, मॅक्स मुलर इ. च्या सह्यांचे टिळकांच्या सुटकेची मागणी करणारे, सात तर्कसिध्द मुद्याचे एक निवेदन महाराणीकडे रवाना केले हे दडपण सरकारला टाळता आले नाही.

१९ नोव्हे. १८९७ ला व्हॉईट हॉल मध्ये अपीलाची सुनावणी करुन "तुरुंगातून सुटल्यानंतर सत्कार समारंभात सामील न होणे आणि कुती भाषण वा लेखाव्दारे सरकारबद्दल अप्रिती फैलावण्याचा प्रयत्न न करणे"

---

१03. केळकर चरित्र पृ. ६१८-१९

या सरकारतर्फे आलेल्या अटींना एक पुस्ती जोडून "पीनल कोडप्रमाणे न्यायाच्या कोर्टात गुन्हा ठरेल, हा अर्थ कृती, भाषण लेख यांना लागू आहे, असे समजून मी अट मान्य करतो. ही अट माझ्याकडून पाळली केली नाही तर सरकारने दिलेली माफी रद्द करावी आणि पुन्हा शिक्षा भोगण्यास वारंट शिवाय पकडण्यात यावे" असे लिहून टिळकांनी त्यावर सही केली नंतर टिळकांना ६ सप्टें. १८९८ ला तुरुंगातून सोडण्यात आले.[१०४]

यावेळी टिळकांची तब्येत ढासळून गेली होती. १३५ पौंड वरून ११२ पौंड वजन झाले. त्यांच्या भाच्यांच्या शब्दात" घरी परतला तो टिळकांचा नुसता सांगाडा, त्यांना नीट चालताही येत नव्हते". त्यांच्या मुदतपूर्व सुटकेमुळे सर्वांनाच आनंद झालेला होता. टिळक घरी आल्यानंतर तासभरातच शेकडो लोक घरी येऊन पोहचले. देशाच्या सर्व भागातून अभिनंदनाच्या तारा आणि पत्रांचा अक्षरशः पाऊस पडला.

रमेशचंद्र दत्त यावेळी इंग्लंड मध्ये होते त्यांनी पत्रात लिहिले की, "आपल्याला काढाव्या लागलेल्या हालअपेष्टांच्या आठवणीने माझ्या अंतःकरणात असलेल्या भावना उफाळून येत आहे याचे वर्णन मला शब्दात करता येत नाही. तुम्ही दाखविलेले धैर्य आणि कष्ट सोसण्याची शक्ती निःसंशय प्रशंसनिय असून तुमच्या या आदर्शाचा जनतेवर चिरंतन परिणाम होईल. तुम्ही केलेले प्रयत्न कधीच वाया जाणार नाहीत, ते निश्चित फलद्रुप होतील. तुम्ही सोसलेल्या यातना राष्ट्राला विजय मिळवून देतील."[१०५]

---

१०४. फाटक : लोकमान्य, पृ. १६८-१७२

१०५ डॉ. करंदीकर : आ. भा. शि. पृ. ७६-७७

पण विजय अद्याप दूर होता. सप्टें. १८९८ ला पुण्यात राहून ऑक्टो. नोव्हें. मध्ये प्रकृती सुधारण्यासाठी सिंहगडावर राहिले. त्यानंतर डिसें. १८९८ च्या राष्ट्रीय अधिवेशनात मद्रास मध्ये टिळक कॉंग्रेस प्रतिनिधी या नात्याने उपस्थित झाले. पण कॉंग्रेसच्या उघडया अधिवेशनात, या विषयक नियामक मंडळाच्या कारभारात त्यांना स्थान मिळाले नाही.[१०४]

या कारावासानंतर टिळकांनी राजकारणापासून दूर राहावे अशी शासनाची मागणी होती पण प्रत्यक्षात घडले मात्र उलटे. त्या कारावासाने त्यांना राष्ट्रीय मान्यता मिळवून दिली व तोवर महाराष्ट्रापुरते मर्यादित असलेले कार्यक्षेत्र त्यांनी अधिक व्यापक बनविले. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून आपल्या जहाल विचारसरणीचा प्रचार अधिक हिरीरीने ते करू लागले. व राष्ट्रीय स्तरावर जहाल गट त्यांच्या भोवती संघटीत होऊ लागला. जहाल गटाचे प्रणेते म्हणून ते राष्ट्रीय स्तरावर पुढे आले ते १८९८ नंतरच्या

# प्रकरण ३ रे

# टिळकांच्या जहालवादाचा राष्ट्रीय आविष्कार

१८९८-१९०८.

पडणे या दोन गोष्टींना जनतेने दर्शविलेल्या अकृत्रिम सक्रिय सहानुभूतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर टिळकांनी लिहीले की, आम्हास ज्या काही गोष्टींशी कर्तव्य आहे, त्या शब्दाने कशा व्यक्त करावयाच्या एवढ्याबद्दलच काय तो वाद आहे. सरकार ही मर्यादा ठरविल तर त्यात आमचे हित आहे. मर्यादा कितीही संकुचित केली तरी त्याची आम्ही काळजी करीत नाही. उलट आमची अशी समजूत आहे की, संकुचित मर्यादेतच आपले सर्व विचार व्यक्त करणे यातच खास कसब आहे..... इंग्रजी राज्य उलथवण्याचे आम्ही मनात आणले तरी ते उलथावयाचे नाही अशी आमचीच काय पण ज्यांना हल्लीच्या वस्तुस्थितीचे थोडे बहुत ज्ञान आहे त्यांची पण पूर्ण खात्री झालेली आहे" शेवटी टिळकांनी आपला मानस व्यक्त करतांना "लोकमताची जागृती व आपल्या हक्काचे समर्थन हे काम निर्भयपणे चालविणे हा आपला बाणा यापुढेही कायम राहील." असे आपले विचार व्यक्त केले होते.[1]

याच वेळी म्हणजे जुलै १८९९ च्या सुमारास लॉर्ड कर्झन हे व्हाईसरॉय म्हणून भारतात आले. त्याच्या कतृत्वाबद्दल लोकांनी पूर्वीच अधिक ऐकल्यामुळे आपल्यासाठी नवा गत काही कार्य करतील अशी आशा होती. त्यानुसार कर्झनने पहिली दोन वर्षे संपूर्ण नोकरशाही आपल्या आज्ञेत राखून लोकप्रियता मिळविली. पण पिंड ब्रिटिश राज्यकर्त्याचा असल्यामुळे "ग्रीक पुराणातील योध्दा हरक्युलीसच्या बारा पराक्रमाचे उदाहरण समोर ठेवून आपणही भारतात बारा मोठी कृत्ये करणार"[2] असे जाहीर करून कर्झनने आपली अहंकारबुध्दी दाखविली

---

१. केसरीतील लेख खंड २. पृ १ ते ११
२. केळकर : टिळकांचे चरित्र : उत्तरार्ध, पृ २.३

होती. कर्झनने योजलेल्या कार्याला नाव ठेवण्यास काहीच कारण नसल्यामुळे टिळकांनी कर्झनविषयी गुणग्राहक बुध्दीनेच केसरीत लेख लिहिले पण त्यांचाही लवकरच भ्रमनिरास झाला.

सन १९०१ ला लॉर्ड कर्झनने अंदाजपत्रकावर भाषण केले. त्याला अनुसरून टिळकांनी केसरीत स्पष्ट लिहीले की "लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचा सूर्य मध्यान्ही आलेला असून पुढच्या वर्षी या वेळेस तो उतरत्या बाजूला थोडासा तरी गेलेला दृष्टीस पडणार. त्यांची हल्लीची प्रवृत्ती जर अशीच कायम राहील तर त्यांच्या कारकीर्दीत रयतेचे प्रत्यक्ष हित होण्याची आशा बाळगायला नको."[3] हे टिळकांचे २ एप्रिल १९०१ च्या "लॉर्ड कर्झन यांची बारा कृत्ये" या लेखातील भाष्य लवकरच खरे ठरले.

<u>ताई महाराज प्रकरण</u> :

याच मध्यंतरीच्या काळात टिळकांच्या आयुष्यातील बराचसा भाग ताई महाराजांच्या प्रकरणाने व्यापलेला होता. प्रस्तुत संदर्भात त्याचा तपशील अनावश्यक असला तरी राजकीय आघाडीवर एका पुरुषश्रेष्ठाचे चारित्र्य हनन हितसंबधीयांच्या करवी कसे घडू शकते याचा हे प्रकरण म्हणजे एक ठळक पुरावा आहे.[4] या प्रकरणात टिळकांवर गलिच्छ आरोप केले गेले परंतु ते पाहूनही टिळक डगमगले नाहीत. आपले सेवाकार्य त्यांनी अव्याहतपणे चालू ठेवले. पुढे या आरोपातून सहीसलामत सुटले.

१८९७ च्या राजद्रोहाच्या खटल्यातून ४ ऑगस्टला जामीन मिळाला असता पुण्याला गेले तेव्हा आजारी असलेल्या बाबा महाराज

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

३. केसरीतील लेख : २२३-२२८
४. मोडे : आ. भा. रा. विचार, पृ. २३६

या मित्राला भेटायला गेले असता त्यांनी टिळकांना इस्टेटीचे विश्वस्त नेमले होते. सप्टेंबरला त्यांनी तुरुंगात असतांना मृत्यूपत्राद्वारे इस्टेटीच्या देखरेखीचे प्रोबेट १८९८ फेब्रुवारीला मिळविले होते. ताई व ऑस्टनने ते प्रोबेट रद्द करण्याचा प्रयत्नही केला पण ते कायम राहीले. ताई महाराजांच्या निमित्ताने फौजदारी फिर्यादीची तलवार अडीच वर्षे टिळकांच्या छातीवर रोखलेली होती.[५] १९०१ जून पासून खटल्याचे काम सुरु होऊन २४ ऑगिष्ट १९०३ ला ताई महाराज प्रकरणाचा निकाल टिळकांच्या बाजुने लागला. त्यासाठी त्यांना ४-७ वाने. १९०४ पर्यंत जेलमध्ये जावे लागले होते.

<u>राजकीय क्षेत्रात टिळकांचा सहभाग :</u>

टिळकांचे ब्रिटिश राज्यकर्त्यांविषयीची मते काय होती हे त्यांच्या केसरीतील लेखांवरुन आपल्याला समजू शकतात. सुरवातीला टिळकांना इंग्रज राज्यकर्त्यांवर, त्यांच्या कार्यावर विश्वास होता त्यांनी इंग्रजामुळे भारतीय लोकांत राष्ट्रीयता निर्माण झाली याचे आभारही मानले. परंतु हळूहळू त्यांच्या मुत्सद्दी राजकारणाचे स्वरुप उघड झाल्यावर त्यांच्यावर टिका करण्यास सुरवात केली आणि इंग्रजांच्या प्रमुख शत्रूपैकी एक बनले. एवढे त्यांचे लिखाण जहाल होते.

इंग्रजी राजवट इष्ट की अनिष्ट हे लोकांना समजावून सांगतांना टिळक केसरीच्या अंकात "हिन्दुस्थानातील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावे लागेल काय"[६] या ६ डिसें. १८९९ च्या लेखात लिहितात की "वाढती लोकसंख्या, बुडता व्यापार, सरकारचा अवाढव्य

---

५. फाटक : लोकमान्य : पृ. १८२ - ९५

६. केसरीतील लेख : राजकीय खंड १ ला : पृ. १३३ - ३८

होत चाललेला खर्च आणि उत्तरोत्तर निःसत्व होत चाललेली जमीन यामुळे हिंदुस्थानची इंग्रजी राज्याखाली काय स्थिती होईल याची कोणाही विचारी मनुष्यास सहज भिती पडेल. भारतातून प्रतिवर्ष जास्तीत जास्त माल परदेशात जात असला तरी त्या मालाचा मोबदला मात्र आम्हास मिळत नाही त्याऐवजी युरोपियन लोकांची व सैनिकांची नोकरी हाच आम्हाला मोबदला मिळतो आहे. आम्ही आपल्या खुषीने अगर जुलमाने आमच्या पुढील वाढलेल्या ताटातील भाकरीचा जास्तीत जास्त भाग विलायतेत रवाना करतो असेच म्हटले पाहिजे.

राज्यकर्ते परकीय म्हणून भारतीय जनता त्यांना अप्रिय मानीत नाही. राज्यकर्ते कोणीही असोत त्यांचा कारभार लोकांच्या फायद्याचा असेल तर लोक त्यांचे पोवाडे गातील. इंग्रजी राज्यापासून आम्हाला काहीच फायदा झाला नाही असे टिळक मुळीच म्हणत नाही. त्यांची दृष्टी समतोल आहे. कुठल्याही पूर्वग्रहाने ते राज्यकर्त्यांकडे पाहत नसून त्यांच्या विचारात चोकस दृष्टी दिसते. टिळक आपल्या लेखांमध्ये उल्लेख करतात की, "इंग्रजी राज्यात आम्हाला झालेले फायदे म्हणजे शांतता, कायद्याची सर्वत्र व्यवस्था, गुन्ह्यांचा बंदोबस्त, सार्वजनिक आरोग्य, व्यापारवृद्धी, शेतकरी सुधारणा, विद्याज्ञानाच्या अनुपम सोयी, लेखनस्वातंत्र्य, यंत्रादी सुखसामुग्रीचा परिचय स्वातंत्र्याची अभिरुची इ. होत."[७] हा त्यांचा ९ ऑगष्ट १८९२ या "इंग्रजी राज्यात आम्हाला फायदा काय झाला" या मथळ्याखाली आलेला लेख आहे.

इंग्रजी राज्याविषयी सद्य:परिस्थितीतील महत्व विशद करतांना टिळक म्हणतात की, "इंग्रजी राज्य हिन्दुस्थानला सध्याच्या परिस्थितीत

---

७. केसरीतील लेख : राजकीय खंड १, पृष्ठ ७१ – ७३

तरी अत्यंत आवश्यक आहे." स्वदेशी राज्य जरी आता झाले तरी ते टिकणार नाही आणि हल्ली चालू असलेल्या युरोपिय प्रबळ राष्ट्रांच्या चढाओढीत आम्हास इंग्रजांच्या नाहीतर दुसऱ्या कोणाच्या तरी तडाख्यात जावे लागेल. म्हणून "सध्यातरी हे राज्य नाहीसे व्हावे, असे कोणाच्याही मनात नाही."[८]

टिळक जरी आपल्या लेखातून इंग्रजी राज्यकर्त्यांवर परिस्थितीवर टिका करीत असले तरी त्यांनी लोकांना राज्यकर्त्यांचे खरे स्वरूप दाखविण्याचा प्रयत्न केला. २ डिसें. १९०२ च्या "आमची मनेच फिरली पाहिजेत"[९] या अग्रलेखात लिहीतात की, "इंग्रज सरकारच्या सहवासापासून हिन्दुस्थानास किती जरी फायदा झाला असला तरी इंग्रज सरकार परके नव्हे असे कोणासही म्हणता यायचे नाही. परंतु तश्यातही न्याय व स्वातंत्र्य या दोहोंची आवड असणारे व सुधारणेच्या शिखरास पोहचल्याबद्दल अभिमान बाळगणारे राष्ट्र आज हिन्दुस्थानवर राज्य करीत असता केवळ त्यांच्या परकेपणामुळे आमच्या वाटाला चाललेल्या सांपत्तिक स्थितीस आळा पडणे कठीण झाले आहे." ही गोष्ट लोकांच्या नजरेपुढे असतांना इंग्रज परके नाहीत असे म्हणणे मुर्खपणाचे होय असे टिळकांना वाटले.

या परकेपणाचा अनुभव टिळकांना कर्झनच्या अरेरावी व उद्दाम वागणुकीमुळे तीव्रतेने भासू लागला. आतापर्यंत झालेले राज्यकर्तेही परकेपणाची भावना बाळगीत पण कर्झनमध्ये जी "इंग्रजांना हिन्दुस्थानवर राज्य करण्याचे दैवी अधिकार प्राप्त आहे" भावना होती त्यामुळे कर्झने भारतीयांना कधीच चांगली वागणूक दिली नाही. ह्यामुळे भारतीय जनता दुखावलेली होती.

---

८. पाध्ये : टिकेकर : आजकालचा महाराष्ट्र : पृ. १८२
९. केसरीतील लेख : पृष्ठ ३६६–७२

<u>राष्ट्रीय सभेतील टिळकांचे कार्य आणि ह्यूम :</u>

राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ह्यूम आणि डफरीन यांनी भारतीयांनी आपल्या मागण्या कायदेशीर रितीने शासनासमोर ठेवाव्या म्हणून केली असली तरी टिळकांना तिचे मर्यादित स्वरुप आवडणारे नव्हते. कारण राष्ट्रीय काँग्रेसच्या मागण्याकडे इंग्रज सरकार सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत होते. १८८९ पासून टिळकांनी राष्ट्रीय सभेत सहभाग घेतल्यापासून राष्ट्रीय काँग्रेसचे स्वरुप बदलण्यास सुरवात झाली. त्यांनी राष्ट्रीय सभेला भारताच्या राजकारणात जास्त सक्रिय केले. आणि ह्यावेळी त्यांना लाल-पाल सारखे समर्थन लाभले त्याचप्रमाणे मेहता, घोष सारखे विरोधकही मिळाले.

राष्ट्रीय कॉंग्रेसचे सेक्रेटरी ए. ओ. ह्यूमच्या विचारांविषयी टिळकांनी २४ मे १८९१ च्या "ह्यूम आणि काँग्रेस"[10] ह्या अग्रलेखात लिहीले की ह्यूम यांना भारतातील परिस्थिती बेच्याळीस वर्ष भारतात राहिले असतांना लक्षात आली. श्री.ह्यूमने म्हटले की. १८५७ चा प्रसंग पुन्हा पाहण्याची माझी इच्छा नाही. नोकरीच्या काळात भारतातील स्थितीचे अवलोकन केले असता मला लोकांना सांगावेसे वाटते की. "अन्नान्नगत, दारिद्र्य, असंतोष आणि दुष्काळ यांनी हिन्दुस्थानातील लोक इतके गांजून गेले आहेत की, त्यांच्या योग्य म्हणण्याचा जर सरकारने विचार केला नाही तर हिन्दुस्थानातील इंग्रजी राज्यावर लवकरच मोठा प्रसंग येवून गुजरेल" ह्यूमच्या या म्हणण्याचा परिणाम विलायतेतील लोकांच्या मनावर झाल्याशिवाय राहणार नाही.

लोकांनी आपल्या मागण्या कायदेशीररित्या सरकारकडे मागता याव्या म्हणून २८ डिसे. १८८५ ला राष्ट्रीय सभेची स्थापना केली.

---

१०. केसरीतील लेख : राजकीय खंड १, पृ. ५५-५८

टिळकांनी लोकांचे लक्ष "राष्ट्रीय सभे"कडे आकर्षीत करण्यासाठी केसरीमध्ये अधून मधून लेख लिहीत असत. राष्ट्रीय सभेचे महत्व पटवून देतांना टिळकांनी ८ जाने. १८९७ च्या "राष्ट्रीय सभा"[११] या अग्रलेखात लिहीतात की, "राष्ट्रीय सभा ही केवळ सरकारला शिव्या देण्याकरीता उत्पन्न झालेली नसून, हल्लीच्या राज्यव्यवस्थेतील दोष दूर होऊन सरकारचे व लोकांचे कल्याण व्हावे, अशी तिची खरोखर इच्छा आहे व तद्नुरूप उपाय सुचविण्याची ही तिची तयारी आहे, हे सरकारच्या लक्षात आले आहे. त्यामुळे अर्थात राष्ट्रीय सभेच्या ठरावांना अधिक वजन आले आहे."

२४ नोव्हें. १९०३ च्या "मलबारी आणि कॉंग्रेस" च्या[१२] केसरीतील अंकात राष्ट्रीय सभेमुळे राष्ट्रीय विचार एकत्रीत येण्याचे साधन मिळाल्याचे सांगतांना लिहीतात की, "राष्ट्रीय सभा निघाल्यापासून हिन्दुस्थानातील निरनिराळ्या प्रांतातील पुढाऱ्यामधील दळणवळण वाढून राष्ट्रीय गोष्टीसंबंधाने त्यांचे विचारऐक्य होण्यास एक मोठे साधन झाले आणि ही सभा निघाल्यापासून सामाजिक, औद्योगिक परिषद किंवा प्रांतिक सभेसारख्या चळवळीस ठिकठिकाणी सुरवात झाली" म्हणून समाधान व्यक्त करतात.

राष्ट्रीय काँ सभेचे संस्थापक श्री. ए. ओ. ह्यूम मायदेशी परत जाण्याची तयारी करीत असता टिळकांनी त्यांच्यावर केसरीत लेख लिहीले. २८ नोव्हें. १८९३ मध्ये "मे ह्यूमसाहेब यांची शेवटची भेट" या अग्रलेखात ह्यूम यांनी भारतीयांविषयी आस्था दाखवून त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्यामागे राष्ट्रीय सभा कशी चालवावी यासाठी विचारविनीमय करण्यास लाहोरला सर्व पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची विनंती

---

११. केसरीतील लेख : राजकीय खंड १, पृ. ३९६-४०१

१२. केसरीतील लेख पृ. ४७८-४८४

केली आणि ह्यूम साहेबांचा खरा निरोप त्यांच्या मागे "राष्ट्रीय सभेसारख्या संस्था हल्ली चालल्या आहेत त्यापेक्षा शतपट अधिक जोराने चालल्या पाहिजेत" इतकेच नव्हेतर ठिकठिकाणी अशा संस्था निर्माण व्हाव्या ह्यूम यांनी उपदेश केल्याप्रमाणे निर्भीडपणे चालवाव्या अशी आशा लोकांकडून केली आहे.

श्री. ह्यूम इंग्लंडला परतत असतांना टिळकांनी त्यांच्यावर एक अग्रलेख लिहून ह्यूम यांची राष्ट्रीय सभेबद्दलची कळकळ व्यक्त केली. २९ डिसें. १९०३ च्या ह्यूम साहेबांचा "कॉंग्रेस भक्तांचा अखेरचा निरोप"[१३] या शिर्षकाखालील लेखात म्हणतात की. ह्यूमने राष्ट्रीय सभेचे उत्पादक या नात्याने केलेले कार्य सर्वप्रसिध्द आहे. आपल्या आयुष्यातील शेवटचे दिवस एकांतात घालविण्यासाठी जात असता त्यांचे मित्र सर. वेडरबर्न, दा. नौरोजी व डब्ल्यू सी. बॅनर्जी यांनी केलेल्या आग्रहावरुन त्यांनी निरोपा-दाखल एक लेख लिहीलेला आहे. त्यात ते म्हणतात की. "बाबांनो तुम्हास माझा हा शेवटचा निरोप आहे.... तुमची चळवळ योग्य दिशेने चालली आहे एवढे जरी माझ्या नजरेस पडले तरी मी सुखाने मरेन. कॉंग्रेसला फळ आलेले पाहीन असे १८ वर्षापूर्वी मला वाटत होते पण तसाह योग आला नाही. तेव्हा आता निदान ही चळवळ यशास येण्याच्या मार्गास लागली आहे एवढे तरी मला पाहू द्या म्हणजे झाले." ह्यूम यांनी काढलेले हे उद्गार कोणाही ख-या राष्ट्रप्रेमी पुरुषाच्या अंत:करणास लागल्याशिवाय राहणार नाही. ज्यांनी आपल्याकरिता कॉंग्रेस उभारण्यास आपले आयुष्य खर्च केले त्याला १८ वर्षानंतर अशा प्रकारचे उद्गार काढण्याचा प्रसंग यावा ही केवळ दुर्दैवाची गोष्ट आहे. कॉंग्रेसच्या पुढा-यांनी जर याचा विचार केला नाही तर लोकांचा त्यांच्यावरील विश्वास नाहीसा

---

१३. केसरीतील लेख – ४८४-४९०

होण्यास वेळ लागणार नाही. राजकीय हक्क मिळविणे किंवा राजकीय उन्नती करणे म्हणजे थट्टा नव्हे" असे टिळकांनी आपल्या लेखात लिहीले.

राष्ट्रीय सभेचे खरे महत्व टिळकांनी जाणले होते. म्हणूनच त्यांनी राष्ट्रीय सभेला राष्ट्रीय स्तरावर आणण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी लोकांमध्ये जागृती यावी म्हणून वेळोवेळी "केसरी" "मराठा" मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसवर लेख लिहून लोकांचे लक्ष तिकडे आकर्षित केले. आणि स्वतः अधिवेशनाला हजर असत. १७ व्या अखिल भारतीय राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्ष दिनशा वाच्छा हे होते. कलकत्त्यामधील या अधिवेशनात शिक्षण कमिशन संबंधी ठराव व्ही. आर. पंडीत यांनी मांडला. त्यात कमीशनवर भारतीय व्यक्ती नेमावी अशी सूचना होती. या ठरावाला टिळकांनी अनुमोदन दिले होते.[१४]

१९०२-०३ या काळात टिळक ताई महाराज प्रकरणात गुंतल्यामुळे राष्ट्रीय अधिवेशनात सहभागी होवू शकले नाही. राष्ट्रीय कॉंग्रेसने आपले पुढील धोरण कसे ठेवावे याबद्दल टिळकांनी २० डिसें. १९०४ च्या केसरीतील अंकात "वेळ तर हीच आहे"[१५] या मथळ्याखाली अग्रलेख लिहीला. त्याचे म्हणणे होते की. "सनदशीर चळवळ करायची असेल तर ती कळकळीने. करून करा विलायतेत चळवळ असावी असे जर तुम्हाला वाटत असेल तर ठीक. पण ती करण्यास तुम्ही योग्य पुढारी निवडून विलायतेस पाठवा. ब्रिटन-मधील लिबरल पक्षाची मदत घेऊन आपले म्हणणे पार्लमेंटमध्ये मांडायचे असेल तर पार्लमेंटच्या निवडणूकीत स्वतः भाग घेऊन त्या पक्षाच्या तत्वाबरोबर हिन्दुस्थानचेही घोडे दामटाण्याचा प्रयत्न करा." अशी टिळकांनी इतर

---

१४. पर्वते : बा. ग. टिळक : पृ. १४२

१५. केसरीतील लेख : ५६३-५६८

पुढाऱ्यांना कळकळीची विनंती केली. त्यांना वर्षातून केवळ एकवेळ एकत्र होऊन ठराव पास करणे हे फिरोजशहा मेहतांचे धोरण पसंत नव्हते. यावरच त्यांचा सगळा हल्ला होता.

२० राष्ट्रीय सभा मुंबईला २४ डिसें. १९०४ ला मुंबई येथे सर हेन्री कॉटन यांच्या अध्यक्षतेत भरली. टिळक या अधिवेशनाला गेले तेव्हा जनतेने त्यांचे उत्साहाने स्वागत केले. सर वि. वेडरबर्नने कॉंग्रेसच्या धोरणाला गतीमानता देण्यासाठी इंग्लंडला आपला प्रतिनिधी पाठवून "सेल्फ गव्हर्नमेंटच्या हक्कासाठी मतप्रचार करावा असा ठराव मांडला. या ठरावाला सर कॉटन प्रमाणे टिळकही सहमत होते. ठराव पास झाल्यानंतर गोखले आणि लाला लजपतराय यांना पाठविण्यात आले.[१६] टिळकांना गोखल्यांबद्दल विश्वास होता. इंग्लंडमध्ये गोखल्यांनी स्पष्टपणे भारताच्या सद्य:परिस्थिती आणि कर्झनच्या कुटील राजनितीचे चित्र लोकांसमोर मांडले. याबद्दल टिळकांनी गोखल्यांचे केसरीतून उघडपणे अभिनंदन केले.[१७]

परंतु नंतर हळूहळू गोखल्यांबद्दल टिळकांचा असणारा विश्वास संपुष्टात येवू लागला. कारण गोखल्यांना टिळकांची जहाल विचारसरणी पटत नव्हती. त्यांचा नेमस्त राजकारणावर विश्वास होता.

---

१६. पर्वते : टिळक : पृ. १४३
१७. केळकर : चरित्र : उत्तरार्ध : भाग १, पृ. ३१-३२

<u>बंगालची फाळणी</u> :

"हिन्दुस्थानातील प्रगतिक पक्षाच्या राजकारणाचा पाया खणून काढणे" हे कर्झनचे मुख्य धोरण होते. आणि राणीचा जाहीरनामा म्हणजे काही राजा व प्रजा यांच्यामध्ये झालेला कायदेशीर करार नव्हे" हे कर्झनने स्पष्टपणे बोलून दाखविले होते व इंग्लिश नोकरशाहीच्या अंगी असलेली कार्यक्षमता हिन्दी सुशिक्षितांच्या अंगी येणे अशक्य असल्यामुळे देशातील सर्व वरिष्ठ अधिकार नेहमीच इंग्रजांच्या हाती ठेवले पाहिजे.[१८] हा कर्झनचा आग्रह होता.

लॉर्ड कर्झनचे मत खोटे सिद्ध करण्यासाठी सुशिक्षित लोकांनी आपली पात्रता सिद्ध करण्यासाठी कितीही युक्तिवाद लढविले तरी ते निष्फळ ठरणार होते. म्हणून नोकरशाही समजते त्याप्रमाणे सामान्य जनता तिच्याशी राजनिष्ठ नाही व लोकांवर राज्य करण्याची घमेंड इंग्रज सरकारने कितीही मारली तरी ब्रिटिश राज्यघटनेचा गाडा ती त्यांना चालवू देत नाही. हे प्रत्यक्ष प्रत्ययाला आणून देणे हाच एक मार्ग कर्झनसाठी योग्य आहे, हे ओळखून आपल्या अडवणुकीच्या धोरणाची आखणी करणे सुशिक्षित पुढाऱ्यांना क्रमप्राप्त होते. पण हे कार्य ना. गोखले यांच्या पक्षाकडून होण्याची शक्यता नव्हती ते कार्य राष्ट्रसभेने आपल्या धोरणानुसार केले पाहिजे असा निष्कर्ष टिळकांनी काढून राष्ट्रसभा हस्तगत करण्याचा निश्चय केला.

---

१८. आ. जावडेकर : आ. भारत, पृ. २६३-६४

५ जुलै १९०४ च्या केसरी अंकात "राजकीय चळवळीची नवी दिशा"[१९] या अग्रलेखात लिहीले की, भारताची राज्यव्यवस्था जोपर्यंत सिव्हिल सर्व्हिसच्या हातात आहे तोपर्यंत निरनिराळ्या बाबीतील निरनिराळ्या तक्रारी किंवा गाऱ्हाणी इंग्लंडमध्ये मांडून काहीच उपयोग नाही. कर्झनसारखे मुत्सदी सेनानायक असतांना त्यांच्या हाताखालील इंग्रज अधिकारी जोपर्यंत आमच्यावर राज्य करीत आहे, तोपर्यंत आमचे कल्याण व्हायचे नाही. आणि जी चळवळ करायची आहे ती लंडनच्या पार्लमेंन्टमध्ये आम्हाला प्रतिनिधीत्व देवून विलायतेतील लोकांपुढे प्रश्न मांडून त्यांच्याकडून आमच्यातर्फे निकाल घेतला पाहिजे.

लॉर्ड कर्झनने बंगभंगाची योजना १९०३ मध्ये शासनाच्या सोयी-साठी करण्यात येईल, पूर्व व पश्चिम बंगाल असे दोन प्रान्त करुन पूर्व बंगालमध्ये आसामचा समावेश करण्यात आला. या योजनेमुळे बंगालचे दोन तुकडे करुन पूर्व बंगाल हा मुसलमानांचा प्रांत बनवून या फाळणीस मुस्लीम लोकांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न कर्झनने उघडपणे केला.

फेब्रु. १९०५ ला ही योजना भारत मंत्र्याकडे पाठविण्यात आली व तिला मंजुरी मिळेपर्यंत गुप्तता पाळण्यात आली.[२०] मोर्लेनी लोक-मताची चौकशी न करताच योजना मंजूर केली आणि २० जुलै १९०५ ला बंगालची फाळणी जाहीर करण्यात आली आणि तिची अंमलबजावणी १६ ऑक्टो. १९०५ ला सुरु झाली.[२१] कर्झनचा या फाळणीमागील खरा

---

१९. केसरीतील लेख : खंड २ रा, पृ. ५२९-३३
२०. आ. जावडेकर : आ. भारत, पृ. २७८
२१. ताम्हणकर : लो. टिळक, पृ. १०७

उद्देश बंगालमधील राष्ट्रवादी भावना जमीनदोस्त करण्याचा होता. पण झाले उलटे या फाळणीने बंगालमधील क्रांतिकारक राष्ट्रवाद पसरविण्यात मदत केली. क्रांतिकारी संघटना निर्माण होण्यास कर्झनचे धोरण कारणीभूत ठरले. फाळणी जाहीर झाल्याबरोबर बंगालमध्ये त्याच्या निषेधार्थ चळवळी सतत प्रयत्नशील राहील्या.

बंगभंग चळवळ :

बंगालच्या फाळणीने भारतात धार्मिक आधारावरही ब्रिटिश साम्राज्याला हादरून सोडणारा तेजस्वी राष्ट्रवाद निर्माण होऊ शकतो आणि मवाळ लोकही राजकीय क्रांतिकारक बनू शकतात हे पाहून ब्रिटिश मुत्सदी आश्चर्यचकित झाले.

बंगभंग विरोधी चळवळीचा प्रारंभ ७ ऑगस्ट १९०७ ला कलकत्ता व बंगालमधील इतर मोठमोठ्या शहरातून जाहीर सभा भरवून करण्यात आला. कलकत्याच्या वृत्तपत्रानेही निषेध व्यक्त केला. कलकत्याच्या टाऊन हॉलच्या सभेत इंग्लिश मालावर बहिष्कार घालण्याच्या शपथा घेण्यात आल्या. टिळकांनी बंगभंग विरोधी बहिष्काराला आपला पाठिंबा जाहीर केला.

टिळकांनी हीच वेळ योग्य समजून आपल्या जहाल राजकारणांच्या चळवळी देशव्यापी करण्याचे ठरविले. खेड्यापर्यंत या चळवळीचे वारे पोहचले होते. येथूनच टिळकांच्या जहाल प्रचाराला विशेष धार चढली.

१५ ऑगस्ट १९०५ च्या केसरीमध्ये टिळकांनी "आणीबाणीची वेळ"[२२] या लेखात लिहीले की, कर्झनच्या बुध्दीवर अधिकार व वैभवाचा

---

२२. लो. टिळकांचे केसरीतील लेख भाग ४, पृ. १३२

इतका पगडा बसला की मदोन्मत्त हत्तीप्रमाणे बंगाली लोकमतास गवता-प्रमाणे तुडविले आहे. बंगालच्या सभेत ठराव झाला की, सरकार आपले म्हणणे ऐकत नाही तर आपण विलायती मालावर बहिष्कार टाकू. नाक दाबल्याखेरीज तोंड उघडत नाही या न्यायाने सरकारला अडविले नाही तर त्याची घमेंड जाणार नाही. लोकमताचे बळ निश्चयात आहे. आमच्या पुढाऱ्यांनी निश्चयाने पुढे येऊन एकतर आपली कार्यसिध्दी केली पाहिजे नाहीतर स्वस्थ बसावे. लेखाच्या शेवटी टिळक म्हणतात की, आजची वेळ अशी आहे की, एकतर हल्लीच्या पळपळींच्या पलिकडे आम्ही गेले पाहिजे, नाहीतर निरंतर दास्यात राहण्यास तयार झाले पाहिजे." असा पुढाऱ्यांना सल्ला दिला.

टिळकांनी २९ ऑगस्ट १९०५ च्या अग्रलेखात कर्झनशाहीवर टिका करतांना मार्मिकपणे लिहीले की, "कर्झनच्या कारकीर्दीची तुलना पुष्कळ अंशी औरंगजेबशी करता येईल. अखंडित साम्राज्य, अप्रबाहित आणि चिरस्थायी साम्राज्य, अर्थात साम्राज्यकालीन प्रजेचे चिरकालीन दास्य ही कर्झनच्या धोरणाची लक्षणे होत. भारतातील लोकांबद्दलची सहानुभूती जी थोडी आहे ती म्हणजे इंग्रजी राज्यकर्ते शारीरिक, मानसिक गुणांनी मोठे असून हिन्दुस्थानातील प्रजेने त्यांच्या हाताखालील पोरांप्रमाणे वागावे अशा अर्थाची आहे. इंग्रज राज्यकर्त्यांशी कधीही स्पर्धा करू नये" अशी कर्झनची समजूत आहे."[२३]

<u>बहिष्कार</u> :

बंगालची फाळणी रद्द करावी ही सर्व सामान्य जनतेची मागणी

---

२३. केसरीतील लेख भाग ३ रा, पृ. १२-१९

पाहून हीच वेळ देशातील जनतेला एकत्र आणून राष्ट्रीय चळवळ उभारण्यास अनुकूल आहे हे टिळकांनी जाणले आणि त्यांनी स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण ह्या चतु:सूत्री महामंत्राचा उच्चार केला. स्वदेशी मालाचा पुरस्कार व सरकारच्या जुलमी कायद्याचा विरोध करणे किती आवश्यक झाले आहे हे केसरीमधून लोकांना पटवू लागले. राष्ट्रीय बहिष्कार हा केसरीतील लेख इतका लोकप्रिय झाला की त्याचे भाषांतर कलकत्ता, पाटणा, मद्रास, अलाहाबाद, बनारस इ. शहरातील वृत्तपत्रांनी छापले होते.[२४]

२२ ऑगिष्ट १९०७ च्या केसरीतील "राष्ट्रीय बहिष्कार" या लेखात म्हणतात की, "सरकारच्या हातून राष्ट्रीयत्वास धक्का आणणारी जेव्हा कोणतीही गोष्ट घडेल तेव्हा अशाच प्रकारची चळवळ सर्वत्र सर्वांनी केली पाहिजे..... राज्यकर्ते जेव्हा प्रजेचे ऐकत नाही तेव्हा प्रजा क्षुब्ध होऊन राजास शासन करण्यास प्रवृत्त होते.... करीता जो उद्योग करायचा तो निश्चयाने केल्याशिवाय गत्यंतर नाही. अरेरावी अधिकाऱ्यांचे डोळे उघडण्यास तीव्र उपाय योजला पाहिजे. "राष्ट्रीय बहिष्कार" हा त्यापैकी एक उपाय आहे."

बंगालच्या फाळणीतून उद्भवलेला संताप राष्ट्रकार्यार्थ राबवून घ्यावा अशी टिळकांची व इतर जहाल नेत्यांची इच्छा होती. ते कॉंग्रेसचे रुपांतर लढावू संघटनेत करु पाहात होते. ब्रिटिश सरकार उलथून पाडायचे नसले तरी राजकीय हक्कांसाठी सरकारवर जोरदार दडपण आणून ते मिळवावे अशी त्यांची इच्छा होती.

---

२४. केसरीतील लेख भाग ३ रा, पृ. ६ ते ११

३१ डिसें. १९०५ मध्ये बनारसला राष्ट्रीय अधिवेशनात अध्यक्ष ना. गोखलेंनी आपल्या भाषणात वंगभंग चळवळीचे समर्थन केले आणि "ही चळवळ राष्ट्रीय इतिहासाला वेगळे स्वरूप देणारी गोष्ट असून बंगाली लोकांची बेअब्रू ती आमचीच होय या भावनेने आपण सर्व मदत करू . . . स्वदेशीकरीता बीज सोसली पाहीजे" असे भाषण करून स्वदेशी चळवळ व बहिष्कार यांचा संम्मतीदर्शक उच्चार झाला. कर्झनने बंगालवर केलेल्या अन्यायाचा धिक्कार केला गेला.[२५]

१९०५ – १९०८ हा काळ भारताच्या इतिहासातील महत्वपूर्ण टप्पा मानला जातो. ह्या काळात टिळकांचे संपूर्ण राजकीय जीवन रोमांचकारी घटनांनी भरलेले दिसून येईल. या चार वर्षात त्यांच्या कीर्तीने प्रांतीय मर्यादा ओलांडून संपूर्ण देश व्यापला त्यांच्या व्यक्ति-मत्वाने आता मुर्तिमंत राष्ट्रीय चळवळीचे रूप घेतले होते. राष्ट्रीय वृत्तीला पोषक अशी चेतना टिळकांकडून जनतेला मिळत राहीली. बंगालची फाळणी होईपर्यंत टिळक व नेमस्तांमध्ये फरक नव्हता. वंगभंगाच्या संतापाने देशातील राजकारण बदलून टिळकांच्या राजकीय कार्याची दिशा बदलली.[२६] आणि त्यांच्या कार्याला महाराष्ट्राप्रमाणेच बंगालमधून जोरदार प्रतिसाद मिळाला.

टिळकांनी ५ सप्टें. १९०५ ला केसरीत "बहिष्कार योग"[२७] ह्या मथळ्याखाली लेख लिहीला. इंग्रजी राज्यकर्त्यांचा दुराभिमान उतरवि-ण्याकरिता राष्ट्रीय बहिष्कार प्रभावी आहे. देशी माल वापरण्याचा निश्चय केला तर पुढील २५ वर्षात याबाबतीत अनेक सुधारणा होऊन

---

२५. केळकर : लो. टिळकांचे चरित्र, उत्तरार्ध : ४२-४३
२६. भोळे : आ. भा. रा. विचार : पृ. २३६
२७. केसरीतील लेख राजकीय खंड ३ रा. पृ. २०-२५

अनेक प्रकारच्या वस्तु येथे तयार होईल. . . . राज्यकर्त्यांनी जी बेपर्वाई चालविली त्याला प्रतिकार म्हणून देशी व्यापार चालविणे आपले कर्तव्य आहे" बहिष्काराला सोबत विधायक रूप म्हणून टिळकांनी स्वदेशीची चळवळ सुरु करण्यास प्रेरित केले.

स्वदेशी :

टिळकांनी केसरीतून स्वदेशीवर अग्रलेख लिहून स्वदेशीची चळवळ सुरु करण्यास लोकांना प्रवृत्त केले. त्यासाठी लोकांना घरगुती उद्योग-धंदे करण्यास प्रोत्साहन दिले. १४ नोव्हें. २१ नोव्हें. १९०५ च्या केसरीत "सुताचा व विणकामाचा धंदा"[२८] या मथळ्याखाली लेख लिहून स्वदेशी चळवळीचा प्रसार पाहून आनंद व्यक्त केला. आणि सुतकताई व विणकामाचा धंदा करण्यास लोकांना प्रेरित केले. त्याचे महत्व लोकांना पटवून दिले.

स्वदेशीची चळवळ महाराष्ट्र आणि बंगालमध्ये सुरु करण्यास इतर नेत्यांना प्रोत्साहित केले. बिपीनचंद्र घोष आणि लजपतरायांनी आपल्या प्रांतात स्वदेशीचा प्रचार केला. बंकीमचंद्रच्या "वंदेमातरम्" ने या चळवळीला यशाच्या शिखरावर पोहचविले.

स्वदेशीची चळवळ ही एक दुष्काळ निवारण मात्रा होय. कारण या चळवळीमुळे खेडे जीवनातील उद्योगधंद्यास उत्तेजन येवून शेतीवर उदर-निर्वाह करणाऱ्यांची संख्या कमी होईल आणि तसे झाल्यास फेमिन कमिशनने म्हटल्याप्रमाणे वारंवार दुष्काळ पडण्याचा संभव कमी होईल.

---

२८. केसरीतील लेख : भाग ३ : पृ. ४५-५०

स्वदेशीची चळवळ नैतिकदृष्ट्याही ग्राह्य होती.[२९] हा एक स्वावलंबनाचा मार्ग होय असे टिळकांना वाटत होते. त्याचबरोबर स्वदेशीच्या संदर्भात सुशिक्षित वर्गाची मोठी जबाबदारी आहे असे टिळकांचे मत होते.

बंगालमधील वंगभंगाची चळवळ सुरु होण्याला आणि कर्झनचा एका सरकारी कारवाईच्या युध्दात पराभव होऊन त्यास राजीनामा द्यावयास एकच गाठ पडली. या दोन्ही गोष्टींचा प्रत्यक्ष संबंध नव्हता. पण त्या राजीनाम्याचा उपयोग चळवळीला झाल्यावाचून राहीला नाही. टिळकांनी या संधीचा फायदा घेऊन राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्यास स्वदेशीस हातभार लावला.

महाराष्ट्रामध्ये प्रत्येक गावामध्ये स्वदेशी संबंधात सभा घेण्यात आल्या. टिळक नुसते सभा घेऊन किंवा लेख लिहून थांबले नाही तर मे १९०६ ला त्यांनी "स्वदेशी को ऑपरेटिव्ह स्टोअर्स" नावाची कंपनी काढली. १९०६ ला कलकत्यात स्वदेशीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.[30]

स्वदेशी बहिष्कार या चळवळीला प्रेरित करण्यास मिळालेली संधी टिळक कधीच घालवित नसत. त्यांचे मत होते की, "सत्तेचा उपभोग घेता येत असल्यामुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांमध्ये शास्त्रांविषयी संपूर्ण उपेक्षेची वृत्ती बोकाळलेली आहे. भारतीय व ब्रिटिशेतर माला-विषयी माहीती गोळा करण्यासाठी जनतेच्या प्रत्यक्ष मन:स्थितीचा लाभ घेऊन आपण औद्योगिक महामंडळाची स्थापना करायला हवी.या मंडळाच्या शाखा देशभर स्थापन करुन व्याख्याने, सभा आणि नव्या उद्योगधंद्याची स्थापना या मार्गांनी स्वदेशीची चळवळ फोफावत जावी म्हणून अविश्रांत खटपट चालू ठेवावी."[३१]

---

२९. मोळे : आ. भा. इ. विचार : पृ. २५२
30. केळकर : चरित्र : उत्तरार्ध : पृ. ५४-६३
3१. डॉ. करंदीकर : आ. भा. शिल्पकार : पृ. १०७

टिळकांनी स्वतःच्या वैयक्तिक, कौटुंबिक गरजा स्वदेशी माल वापरूनच पूर्ण करीत. होतकरू तरुणांना घरगुती उद्योगधंदे काढायला ही सक्रिय मदत करीत. सर रतन टाटा व मोहनदास रामजी प्रमाणे तेही व्यवस्थापक मंडळात होते.

* टिळकांनी १२ डिसें. १९०५ ला केसरीच्या अंकात "स्वदेशी-वरील आक्षेप"[32] हा अग्रलेख लिहून काही प्रतिगामी लोकांनी घेतलेल्या आक्षेपाला त्यांनी उत्तरे दिली आहेत. "दर आठवड्यात स्वदेशी चळवळीचे स्वरूप बदलत जाऊन त्यामुळे निरनिराळे प्रश्न उद्भवत आहेत... पण थोडीशी झीज सोसून स्वदेशीच्या चळवळीस सर्वांना मदत करता येणार आहे" असे म्हणून लोकांना नाउमेद होण्यापासून परावृत्त केले होते.

<u>राष्ट्रीय शिक्षण</u> :

"राष्ट्रीय वृत्ती ज्याने निर्माण होईल ते राष्ट्रीय शिक्षण" ही टिळकांची राजकीय शिक्षणाची व्याख्या होती. टिळक राष्ट्रीय शिक्षणाचे प्रत्यक्ष कार्यकर्ते नसले तरी त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळी-साठी लोकमत जागृत करून त्या कार्याला लोकप्रियता मिळवून दिलेली दिसून येते. समर्थ विद्यालयाच्या पैशांसाठी दौरे काढून सभा घेतल्या. आणि केसरीतून लेख लिहून राष्ट्रीय शिक्षणाला चालना देण्याचे कार्य टिळकांनी केले.

"राष्ट्रीय शिक्षण व खाजगी शाळांची जबाबदारी"[33] ह्या केसरी अंकातील २७ नोव्हें. १९०६ च्या लेखात त्यांनी राष्ट्रीय

---

३२. केसरीतील लेख : खंड ३ : पृ. ६३-६७

३३. पूर्वोक्त : पृ. ११३-११७

शिक्षणाचे महत्व सुशिक्षितांना पटवून दिले. "शिक्षण म्हणजे काही लिहीणे वाचणे नव्हे. देशातील तरूण पिढी देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास सर्व समर्थ होईल अशा प्रकारचे शिक्षण म्हणजे राष्ट्रीय शिक्षण होय." असे विवेचन करून इंग्रज सरकारच्या शिक्षणातील दोष दाखविले आहेत आणि खाजगी शाळांना राजकीय शिक्षण देण्यास विनंती केलेली आहे.

विद्यार्थ्यांच्या मनस्वातंत्र्याला धक्का लागू नये हे टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षणाचे मर्म होते. १४ सप्टें. १९०७ च्या पुण्यातील व्याख्यानात ते म्हणतात की, आम्हाला पाहिजे तसे शिक्षण परकीय राज्यकर्ते देवू शकत नाही, त्यांची तशी इच्छाही नाही. बुध्दी कमी जास्त असली तरी सर्वांवर राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटला पाहिजे." त्याचप्रमाणे २७ फ्रेबु. १९०८ च्या सोलापूरच्या भाषणात म्हटले की, "देश ओळखण्याला शिकणे याला राष्ट्रीय शिक्षण म्हणतात, आणि समर्थ विद्यालयाचा उल्लेख करतांना "महाराष्ट्रात शिक्षणाचे एक देऊळ बांधायचे आहे. आणि ते जनतेच्या सहाय्याने होईल अशी मला खात्री आहे." वर्षी येथील ३ मार्च १९०८ च्या व्याख्यानात टिळक बोलतांना "आम्हाला ज्या गोष्टी २५ वर्ष झाल्यावर समजू लागल्या त्या पुढील पिढीत तरूणपणीच समजायला पाहिजे." विद्यार्थी दशेतच देशाची स्थिती मुलांना सांगायला पाहिजे. आणि यासाठी प्रो. विजापूरकरांसारखी मंडळी या कार्यात वाहून घेण्यास तयार आहेत."[३४]

१७,२४ ऑक्टो. व ७ नोव्हे. १९०५ च्या केसरीतील "हे आमचे गुरू नव्हेत" ह्या लेखांमध्ये टिळक लिहितात की, "राजकीय

---

३४. केळकर : चरित्र : उत्तरार्ध : पृ. ८-११

सिध्दांताचे व सामाजिक प्रमेयाचे विद्यार्थ्यांत लहानपणापासून बाळकडू देणे हेच राष्ट्रीय शिक्षणाचे बीज होय. जातीभेद, जातीव्देष, जाती-मत्सराने आपला देश कसा भाजून निघत आहे याचेही मुलांना ज्ञान मिळाले पाहिजे आणि राष्ट्राच्या उन्नतीकरीता ज्या चळवळी चालू आहेत त्यात पडून वा त्या पाहून त्यांचा उठाव करण्याचा विचार विद्यार्थीदशेतच केला पाहिजे. "खाजगी शिक्षणावरील सरकारची करडी नजर" या लेखात म्हणतात की, "लोकांना खरे राष्ट्रीय शिक्षण दयायचे असल्यास ते स्वतंत्र खाजगी शाळेतून देणे शक्य आहे."[३५]

देशात बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षणाची जी सरकारला खडखडून सोडणारी चळवळ फोफावली ती नेस्तनाबूत करण्यासाठी राज्य-कर्त्यांनी दडपशाही सुरु केली. बंगालच्या पूर्व भागात दडपशाहीचे थैमान भयानक होते.[३६] आणि सरकार कॉंग्रेसपेक्षा सशस्त्र क्रांतीवाद्यांना जास्त घाबरत असल्यामुळे त्यांनी आपले धोरण दुराग्रही ठेवले होते. या ओढाताणीत लोकांची उमेद खचू नये अशा धोरणाचे विचार टिळक केसरीमधून मांडत होते. राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार एकीकडे चालू असतांना टिळक व नेमस्तांमध्ये वाद चालूच होता.

<u>स्वराज्य</u> :

स्वराज्य हा राष्ट्रीय जहाल पक्षाचा अंतिम हेतू होता. डेन्मार्कमधील ऑगष्ट १९०४ च्या सोशॉलिस्ट वर्ल्ड कॉन्फरन्समध्ये "स्वराज्याचा" उच्चार दादाभाई नौरोजींनी केला होता. याला

---

३५. केसरीतील लेख : राजकीय खंड ३ : पृ. ३५-४५
३६. फाटक : लोकमान्य /: पृ. २४३

लाल-बाल-पालने आपला पाठिंबा जाहीर केला होता. १८ डिसें. १९०६ च्या "दादाभाई मागणार तरी काय?"[३७] या अग्रलेखामध्ये टिळकांनी मोर्लेंच्या विचाराचे स्वागत केले होते. पण तुम्ही आपली दुःखे विलायतेच्या लोकांपुढे नेटाने मांडा म्हणजे उदार बुध्दीने ते तुम्हास स्वराज्याचे हक्क देतील" हा विचार टिळकांना पटण्यासारखा नव्हता. कलकत्ता काँग्रेसमध्ये स्वराज्याचा उच्चार करण्यात आला होता.

टिळकांनी ९ एप्रिल १९०७ च्या केसरीतील "स्वराज्य आणि सुराज्य" या अग्रलेखात लिहीले की "जेव्हा राजा प्रजा यांचे हितसंबंध एक असून राजा प्रजेच्या हिताबद्दल नेहमी तत्पर व दक्ष असतो तेव्हा प्रजेला ते राज्य स्वराज्य वाटते..... नियमाने चालेले राज्य म्हणजे सुराज्य असा जर अर्थ घेतला तर इंग्रजांचे भारतातील राज्य सुराज्य होईल . . . आपल्या मताप्रमाणे जे आपल्यास आपले हित वाटते त्या धोरणाने राज्यव्यवस्था चालविण्याचा आपणासही अधिकार असला तर ह्याला स्वराज्य व सुराज्य म्हणता येईल." असे टिळकांचे मत होते.

१९०६ मध्ये मोर्ले भारतात आले त्यांनी पार्लमेंटमधील भाषणात "चंद्रमा मागला तो मिळविता येत नाही" असे म्हटले तेव्हा जनतेने त्याच्या निषेधार्थ सशस्त्र राजकारण घडवून आणले होते. टिळकांनी १८ सप्टें. १९०६ च्या केसरीत "तत्ववेत्ता व मुत्सद्दी"[३९] या मथळ्याखालील लेखात म्हटले की "मोर्लेनी बंगालची फाळणी लोकमताविरुध्द असली तरी ती कायम राहील" असे उद्गार काढले तेव्हा विलायतेतील व येथील इंग्रजास

---

३७. केसरीतील लेख खंड ३ पृ. १२३-३०
३८. केसरी रा. खंड ३ रा. पृ. १७२-७३
३९. पूर्वोक्त, पृ. १०७-११२

कळून चुकले की, "चेटा तत्ववेत्तावर खराच, पण गुत्ताम्दीही आहे." पण भारतीय जनतेने स्वदेशी बहिष्कार धोरण अवलंबून सरकारच्या राज्य-कारभारास अडथळे आणले आणि लोकमत जागृत झाल्यामुळे इंग्रजांना १९११ मध्ये बंगालची फाळणी रद्द करावी लागली. हा भारतीय लोकमताचा विजय ठरला.

<u>१९०६ ची कॉंग्रेस</u> :

देशातील वातावरण अशा रितीने बहिष्कार योगाने भरून गेल्यामुळे टिळकांसारखा जहाल नेता कॉंग्रेसचा अध्यक्ष होईल या भीतीने नेमस्तांनी १९०६ च्या कलकत्ता राष्ट्रीय अधिवेशनासाठी दादाभाई नौरोजींची निवड करण्यात आली होती. कलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्षपद टिळकांनी भुषवावे असे लाला लजपतराय, पाल आणि इतर बंगाली नेत्यांचा आग्रह होता. पण नेमस्तांनी आपला प्रभाव नष्ट होईल की काय या भीतीने समन्वयवादी ज्येष्ठ नेते दादाभाई नौरोजींना स्वागत समितीच्या औपचारिक संमतीवाचून निमंत्रण दिले.[४०]

टिळकांनी नौरोजींच्या अध्यक्षतेचे स्वागतच केले. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी १८ डिसें. १९०६ च्या केसरीत "दादाभाई सांगणार तरी काय?[४१] या अग्रलेखात लिहीले होते की "भारतातील ब्रिटिश राज्य म्हणजे राष्ट्रातील सा-या जीवनशक्ती फस्त करणारा भारतात लागलेला भयानक रोग आहे, असे दादांचेच म्हणणे आहे. तेव्हा बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य इ. विषय यंदाच्या राष्ट्रीय सभेत येणार आहे. त्यास नौरोजींकडूनच येतील. नवीन राष्ट्रीय चळवळ हे राष्ट्राच्या जीवंतपणाचे लक्षण आहे असे त्यांचेच मत आहे.

---

४०. डॉ. करंदीकर : आ. भा. शिल्पकार , पृ. ७४
४१. केसरी, खंड ३ , पृ. १२३-२९

कलकत्त्याचे हे अधिवेशन त्या काळातील भरलेल्या अधिवेशनापैकी सर्वात महत्वाचे अधिवेशन ठरले. काँग्रेसच्या व्यासपीठावरून अध्यक्षांनी बहिष्काराचे जोरदार समर्थन केले आणि चळवळ अखंड ठेवण्याचा संदेश दिला. स्वराज्याची मागणी प्रथमच करण्यात आली. बीज सोसून स्वदेशी मालास उत्तेजन द्यावे हा ठराव पास झाला. दादाभाईंनी राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार हे स्वावलंबनाचे मार्ग यापुढे राष्ट्राने अंगिकारावे असेही सांगितले. दादाभाईंच्या भाषणाचे बंगाल मध्ये स्वागत झालेच पण देशातील जहाल पक्षानेही उत्साहाने स्वागत केले.[४२]

८ जाने. १९०७ च्या केसरीत "गेल्या राष्ट्रीय सभेत विशेष काय झाले?"[४३] हा अग्रलेख लिहिला. त्यात टिळक म्हणतात, "स्वराज्य आम्हास साध्य आहे व स्वदेशी चळवळ, बहिष्कार योग आणि राष्ट्रीय शिक्षण ही स्वावलंबनाची सदर हेतू सिध्दीस नेण्यास तीन मोठी साधने आहेत. असा कायमचा सिध्दांत राष्ट्रीय सभेच्या बावीसाव्या बैठकीत झाला आहे. नौरोजींनी सांगितल्याप्रमाणे त्याची कार्यसिध्दी करुन घेतली पाहिजे." असे लिहून राष्ट्रीय सभेवर जहालांचा पूर्ण पगडा बसला आहे आणि राष्ट्रीय सभा केसरीच्या मताकडे झुकल्याचा आनंद व्यक्त केला आहे.

१९०६ ला टिळक कलकत्याला अधिवेशनासाठी गेले असता तेथे दुसऱ्या दिवशी सत्कार करण्यात आला. २ जाने. १९०७ च्या प्रचंड सभेत बोलतांना टिळकांनी म्हटले की, "आमच्या राजकारणात अलीकडे मवाळ व जहाल शब्द आलेले आहेत. . . व्यवहारीक राजकारणाचे

---

४२. गो. तळवलकर : नौरोजी ते नेहरु : पृ. १३७-३८

४३. केसरी खंड ३ : पृ. १३०-३७

क्षेत्र अमर्याद आहे. नोकरशाहीकडे दाद मागणे व्यर्थ आहे ह्या मुद्यावर दोन्ही पक्षाचे एकमत आहे. जुन्या पक्षाचा ब्रिटीश राष्ट्राकडे दाद मागण्यावर विश्वास आहे आणि स्वतःच्या प्रयत्नांनी आपले ध्येय गाठण्याची आशा आहे म्हणून नविन पक्ष उदयास आला आहे. बहिष्कार हे आमचे राजकीय शस्त्र आहे. स्वराज्य हे आमचे ध्येय आहे. तुमचे भविष्य पुर्णपणे तुमच्याच हातात आहे या जाणीव व्हावी हाच नव्या पक्षाचा हेतू आहे."[४४]

सुरत काँग्रेसला तडा :

१९०७ च्या सुरत काँग्रेस अधिवेशनाचे पडसाद अनेक वर्ष उमटत राहीले. दोन्ही पक्षाची लांबलचक निवेदने आणि विदेशी निरीक्षकांनी लिहून ठेवलेला पक्षवैसल्य" वृत्तांत उपलब्ध असल्यामुळे त्यांच्या आधारे सुरतची फूट आणि त्यातील टिळकांची भूमिका याचे निःपक्षपणे मूल्यमापन आज करता येणे शक्य झाले.[४५]

सुरताच्या राष्ट्रीय सभेच्या फुटीचे बीजारोपण कलकत्याच्या अधिवेशनातच झाले होते तेथे चतुःसूत्रीला मिळालेली मान्यता हा जसा राष्ट्रीय पक्षाचा विजय होता तसाच तो मेहता, गोखले पक्षाला आपला पराजय वाटला. २७ ऑगष्ट १९०७ ला टिळकांनी केसरीत "राष्ट्रीय सभा कोणाची"[४६] हा अग्रलेख लिहितांना ते म्हणतात की, लोकमताच्या ओघाबरोबर राष्ट्रीय सभेचे धोरणही बदलत जाणार आणि गेले पाहिजे नेमस्तांच्या बानदारीने किंवा जहालांच्या म्हणण्याप्रमाणे हा परिणाम

---

४४. आ. जावडेकर : आ. भारत : पृ. ३०७-१०

४५. केळकर : उत्तरार्ध : भाग ५ पृ. ३९

४६. केसरी : राजकीय खंड ३, पृ. २०२-२०७

टळणार नाही. गेल्या वर्षी दादाभाई नौरोजींनी राष्ट्रीय सभेस नवीन वळण दिले हाच उपक्रम पुढे चालला पाहिजे. एका धोरणाने कार्यसिध्दी झाली नाही तर दुसरे धोरण प्रतिनिधींच्या बहुमताने अंगिकारल्या पाहिजेत. हल्लीच्या राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमातील नवीन गोष्टी दोन्ही गटास मान्य नसल्यास त्यांनी सभा मोडण्याचा प्रयत्न करणे गैर आहे. राष्ट्रीय सभा विशिष्ट पक्ष वा पंथाची नसून सर्वांची आहे. त्यात जे काही काम व्हायचे ते काळाने परिस्थितीत झालेला फरक, बहुमत आणि तडजोड याकडे लक्ष देऊनच झाले पाहिजे."

१९०६ कलकत्यापासूनच जहाल, मवाळ मतभेद वाढले होते. पण दादाभाईंच्या प्रभावशाली नेतृत्वामुळे ते मतभेद विकोपाला गेले नाहीत. पण १९०७ ला नेत्यांमधील मतभेद तीव्र झाले. राष्ट्रीय सभा नागपूरहून सुरतला नेण्याचे हेच कारण होते. जहाल गटांची इच्छा लालाजींना अधिवेशनाचे अध्यक्ष करण्याची होती पण मवाळ या विरोधी होते तेव्हा जहालांनी स्पष्ट म्हटले की, सुरत मवाळ नेत्यांनी मुद्दाम निवडले कारण त्यामुळे ते स्थानिक लोकांच्या सहाय्याने आपले वर्चस्व कायम टेवू शकतील. मवाळांनी डॉ. रासबिहारी बोसला अध्यक्ष निवडले.[४७]

८ ऑक्टो १९०७ च्या केसरीत टिळकांनी लिहिले की "वाद अध्यक्षाच्या निवडणूकीचा असला तरी मुख्य प्रश्न दादाभाईंनी घेतलेले नवीन वळण बंगाल पुरतेच की सर्व देशाकरीता मंजूर करावे हा वादाचा मुख्य हेतु आहे." १० डिसें. १९०७ च्या "लाला लजपतराय अध्यक्ष पाहिजेत" ह्या लेखात टिळकांनी लिहिले की, "स्वार्थत्याग व देशहितासाठी कष्ट सोसणे

---

४७. पट्टाभि सितारामय्या : कॉंग्रेस का इतिहास : पृ. ८७

या दृष्टीने डॉ. घोष पेक्षा लालाजींची योग्यता अधिक आहे. लालाजींचा सन्मान करायचा असल्यास त्यांना अध्यक्ष करा. प्रतिनिधी म्हणून येण्याचा त्यांचा हक्क आहे. ठरावाचे मसुदे मेहता- गोखले कोणीही करोत याप्रसंगी नव्या पक्षाने सुरतेस हजर राहून शक्य तेवढी सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा. पण राष्ट्रीय सभा मोडेल असे गैरवर्तन नव्या गटाने करु नये."[४८] अशी विनंती टिळकांना आपल्या गटाला केली होती.

राष्ट्रीय सभा सुरु होण्यापूर्वी टिळकांनी ३ डिसें. १९०७ ला केसरीत "तेविसावी राष्ट्रीय सभा"[४९] ह्या अग्रलेखात लिहीले की, सुरत म्हणजे काही मवाळांचे आगर नव्हे. तेव्हा यंदाच्या सभेपुढे हद्दपारीचा कायदा, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार, स्वदेशी, मोर्लेसाहेबांच्या टोणग्याचे आंचळ, सभाबंदीचा कायदा. इ. महत्वाचे विषय वादावादी करीता येणार आहे तर आम्ही सुचविल्याप्रमाणे व्यवस्था करण्यास काहीच हरकत नाही व नव्या पक्षाची सभा भरविणे इष्ट वाटल्यास ती सभेच्या बैठकीपूर्वी एकदोन दिवस अगोदर भरवून विचार विनिमय करावा.

असे मतभेद पूर्ण वातावरण शांत ठेवण्यासाठी टिळकांनी आपल्या अनुयायांसाठी संपादकीय लेख लिहिले होते. २३ डिसें. ला टिळक व त्यांचे मित्र खापर्डे यांच्याबरोबर सुरतला पोहचले व दुसऱ्या दिवशी २४ ला लाला लजपतराय सुरतला गेले तेव्हा जनतेने त्यांचे प्रचंड उत्साहाने स्वागत केले.[५०] तेथे पाहुणे म्हणून आलेले डॉ. रुदरफर्ड यांच्या मध्यस्थीने

---

४८. केळकर : उत्तरार्ध : पृ. ४०-४५

४९. लो. टिळकांचे केसरीतील लेख खंड ४ : पृ. ३०८

५०. ताम्हणकर : लो. टिळक , पृ. १४२-४३

लालाजींनी दोन्ही गटात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला.[५१]

ठरल्याप्रमाणे २६ डिसें. १९०७ ला दुपारी अडीच वाजता अधिवेशन सुरु झाले. पट्टाभि सितारामय्यांच्या पुस्तकात मध्ये अधिवेशनाची तारीख २७ डिसें. आहे. या अधिवेशनाला १६०० पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित होते. गोखल्यांनी ठरावाचे मुद्दे अधिवेशनाच्या उद्घाटनापर्यंत तयार केलेले नव्हते. स्वागताध्यक्ष माळवी याचे भाषण झाले आणि दुसऱ्या क्रमांकाचे वक्ते म्हणून सुरेंद्रनाथ बॅनर्जी बोलायला उभे राहिले असता एकदम गोंधळ इतका झाला की अध्यक्षांना अधिवेशनाचे काम दुसऱ्या दिवशी करणे भाग पडले. ताम्हणकरांच्या पुस्तकात २७ आणि पट्टाभिंच्या पुस्तकात २८ डिसें. ला काँग्रेसचे काम पुन्हा सुरु झाल्याचा उल्लेख आहे. आणि जेव्हा अध्यक्षाचा जुलूस निघत होता तेव्हा टिळकांनी एक चिठ्ठी श्री. माळवी यांना पाठविली त्यात लिहिले होते की, "जेव्हा अध्यक्षाच्या निवडणुकीच्या प्रस्तावाचे समर्थन होईल त्यानंतर मला प्रतिनिधींना काही सांगायचे आहे" पण टिळकांच्या चिठ्ठीकडे दोनदा आठवण देऊनही लक्ष दिले गेले नाही. सुरेंद्रनाथांचे भाषण झाल्यानंतर टिळक बोलण्यासाठी व्यासपीठाकडे गेले असता त्यांना बोलण्यासाठी परवानगी दिली नाही.[५२]

तरीही टिळक बोलण्यासाठी उभे राहिले एवढयातच प्रतिनिधींमधून एक जोडा फेकला गेला जो बॅनर्जींना स्पर्श करुन मेहतांना लागला. मग एकच गोंगाट झाला. एकमेकांवर खुर्च्या फेकण्यात आल्या आणि काँग्रेसचे अधिवेशन उधळले गेले आणि पोलिसांनी मंडपाचा ताबा घेतला.[५३]

---

५१. डॉ. करंदीकर : आ. भा. शिल्पकार, पृ. ११९
५२. काँग्रेस का इतिहास पट्टाभि सितारामय्या, पृ. ८८
५३. फाळके : लोकमान्य : पृ. २५८-५९

या दंगलीचे दायित्व कोणावरही असो, तो दिवस काँग्रेसच्या इतिहासात काळाकुट्ट ठरला एवढे खरे पराकाष्ठेच्या अडचणींशी दोन हात करीत २२ वर्ष अविरत चालविलेल्या देशभक्तीच्या लढ्याने काँग्रेस प्राप्त झालेली सारी प्रतिष्ठा निमिषार्धात विरून गेली पण निदान नेमस्तांच्या पुरती तरीही फूट परिपूर्ण आणि अंतिम ठरली.[५४] राष्ट्रीय सभा दुभंगली तरी चालेल पण तरूण बंगालचे बहिष्कारवादी नवे राजकारण आम्ही तिच्यातुन खणून काढल्याखेरीज राहणार नाही ह्या फिरोजशहा मेहताच्या दुराग्रहाचा इथे विजय झाला आणि मालवीने त्यांना या कार्यात सहकार्य देवून वेगळ्या पक्षाची कल्पना अस्तित्वात आणली.[५५]

आकोल्याचे वकील अनंतराव माथ्गीलकर यांनी म्हटले होते की, "२६ डिसें. रोजी हा अपराध राष्ट्रीय पक्षाने केला खरा पण २७ रोजीचा दोष नेमस्त पक्षाकडे होता असे मला वाटते. टिळकांनी गोष्टी केल्या त्या आपल्या पक्षातील लोकांना समजावून सांगून सर्वांच्या अनुमतीने केल्या टिळकांशी तडजोडीचे बोलणे करण्याचे नेमस्तांनी टाळले" माथ्गीलकर स्वत: अधिवेशनात हजर होते. बाबासाहेब खापर्डे आपल्या आत्मचरित्रात लिहितात की १९०७ ची काँग्रेस भंग करण्याचे नेमस्तांनी आधीच निश्चित केले होते.[५६]

सुरतची सभा मोडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नेमस्त पक्षाने एक सभा भरवून आपल्या पक्षाचा जाहीरनामा प्रसिध्द केला. एक ठराविक प्रतिज्ञा पत्रकावर जो सही करून देईल त्यालाच आपल्या पक्षात घ्यायचे असे ठरले. या सभेचे नाव "कन्व्हेशन" ठेवले गेले.[५७]

---

५४. डॉ. करंदीकर आ. भा. शिल्पकार, पृ. १२४
५५. आ. जावडेकर: आ. भारत पृ. ३१२-१३
५६. खापर्डे बा.ग. बाबासाहेब, दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पृ.२०८
५७. केळकर : उत्तरार्ध भाग ६ पान २२-२३

नेव्हीनन्सने आपल्या पुस्तकात सुरत अधिवेशनाचे वर्णन केलेले आहे. त्यांनी "टिळक सुरतची काँग्रेस फूट होण्यास कारणीभूत नव्हते" असे आपल्या "दि न्यु स्पीरिट इन इंडिया" या पुस्तकात लिहीलेले आहे आणि बहुतेक समकालीन लोकांनी टिळकांना निर्दोष मानलेले आहे.

टिळकांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या दृष्टीने धार्मिक व सामाजिक क्रांतीवर राष्ट्रातील तरुणांनी इतकी शक्ती वाया घालविणे योग्य वाटत नव्हते. म्हणून त्यांनी आपल्या संस्कृतीच्या अभिमानाच्या परंपरागत आधारावर जहाल राजकारणाचा पाया घातला. लोकांमध्ये सांस्कृतिक अभिमान जागृत केला तर ते स्वराज्यासाठी लढायला तयार होतील आणि स्वराज्याच्या मार्गात येणारे सामाजिक, धार्मिक निर्बंध दूर करतील हा त्यांचा विश्वास होता.[५८] म्हणून त्यांनी राष्ट्रीय जनशक्तीला देशव्यापी बहिष्कार स्वदेशीच्या कार्याचा पायंडा घालून देश जागृती करण्याचा प्रयत्न केला आणि नेमस्तांना टिळकांचे हे जहाल राजकारण न आवडल्यामुळे त्यांनी आपली सभा वेगळे करण्याचे ठरविले होते आणि ते त्यांनी आपल्या मनाप्रमाणे घडवून आणले.

जहाल पक्षाचा जाहीरनामा :

२७ डिसें. १९०७ ला नेमस्तांच्या वेगळ्या पक्ष स्थापनेनंतर टिळकांनी आपल्या जहालवादी पक्षाचा जाहीरनामा काढला.

"नव्या पक्षाचा जाहीरनामा"

"तेविसाव्या राष्ट्रीय सभेचे काम दुर्दैवाने अर्धवट राहिले किंबहुना त्याला धड प्रारंभही झाला नाही म्हणून ते काम पुन्हा हाती घेवून पुढे चालू करणे इष्ट आहे. कामाची दिशा व सभेचे धोरण पूर्वीचेच राहावे

---

५८. जावडेकर, आ. भारत, पृ. २२९

म्हणजे कलकत्ता येथे दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्रीय सभेत अखेर निश्चित झाले तेच राहावे. या राष्ट्रीय सभेतील तत्त्वे व तिचे मार्ग सदर सभेतील ठरावामध्ये ग्रंथित झाले आहेत. विशेषत: स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चार विषयावरील ठरावात जे ग्रंथित झाले ते ज्यांना विशेषतः मान्य असतील आणि ज्यांना प्रामाणिकपणे त्याच मार्गांनी काम करण्याची इच्छा असेल त्यांनी शनिवार ता. २८ रोजी तिसरे प्रहरी ४ वाजता चिकारावाडी हीरापूर सुरत येथे जमावे अशी विनंती आहे वर दर्शविलेले कार्य पुढे कसे चालवावे याची व्यवस्था सदर सभेत करण्यात येणार आहे."

सहया – अरविंद घोष, गंगाधर टिळक, मोरेश्वर गोपाळ देशमुख गणेश श्रीकृष्ण खापर्डे, कल्याणजी देसाई व इतर अनेक.

राष्ट्रीय पक्ष यापुढे काय करणार यावर नेमस्त पक्षाची दृष्टी सुकीच नव्हती त्यांना वाटत होते की, "या नव्या पक्षाचे जहाज सुकाणू तुटून वादळात सापडून वाहावत चालले आहे ते लवकरच कुठे तरी आपटून फुटणार आपण केवळ वेगळे निघालो ही फार चांगली गोष्ट झाली" याउलट नवा पक्ष नेमस्त पक्षाच्या हालचालीवर पूर्णपणे दृष्टी ठेवूनच चालत होता त्यांना वाटे की, "फूट होणे ही गोष्ट विघातक आहे "राष्ट्रीय सभा हे एक मोठे आवरण आहे त्यात गुरफटलेल्या स्थितीतच सर्वांना आपला निर्वाह करून घेतला पाहिजे" अशा प्रकारची विचारसरणी नेमस्त पक्षाशी वागताना टिळकांची नेहमीच असे. तीच विचारसरणी सुरतेस राष्ट्रीय सभा दुभंगल्यावरही त्यांनी कायम ठेवली होती.[५९]

---

५९. केळकर चरित्र : उत्तरार्ध भाग ६, पृ. ३१-३४

सुरतेच्या वाद संबंधाने टिळकांनी केसरीत अनेक लेख लिहिले. त्यात सुरतच्या फुटी संबंधी दोष कोणाच्या माथी अधिक मारला पाहिजे आणि एखाद्या सभेच्या अध्यक्षाचे अधिकार काय? या विषयी चर्चा करण्यात पहिले पहिले लेख लिहिले असले तरी फेब्रुवारी महिन्यात राजकीय पक्षोपन्यासावर जे अग्रलेख लिहिले ते पुष्कळसे निर्विकार तात्वीक स्वरुपाचे आणि उत्कट युक्तीवादाने भरलेले होते.

१८ फेब्रु. १९०८ च्या "समेट कसा होईल?"[६०] अग्रलेखात लिहीले की, "अंतिम हेतु ठरविण्याकरिता सभा निर्माण झालेली नसून राष्ट्रीय सभेचे काम स्वराज्य ह्या अंतिम हेतुकडे क्रमशः कसे जावे हे ठरविण्याचे आहे. स्वप्रमाण विचार करण्याचा मक्ता ईश्वराने जहालांप्रमाणे मवाळांनाही दिला नाही राष्ट्राच्या अंतिम हेतुमधील मतभेद विसरला पाहिजे हे तत्व जर इतर प्रांतातील लोकांनी स्विकारले तर सर्व पक्षाचा समेट होवून राष्ट्रीय सभेचे काम खऱ्या राष्ट्रीय पध्दतीवर चालण्यास अडचण येणार नाही." राष्ट्रीय सभा ही केवळ राजकीय कार्याचे साधन बनल्यानंतर त्या कार्याला उठाव आणण्याच्या दृष्टीने टिळकांनी नवीन साधने हाताळण्यास प्रारंभ केला. "जहाल व मवाळ यांच्या केवळ विचारसरणीत मतभेद आहे असे स्पष्ट केले.[६१]

दारूबंदी चळवळ :

१९०७ च्या शेवटी सुरत काँग्रेस मोडल्यानंतर टिळकांनी सहा महिने जी तुफानी चळवळ सुरु केली तिचे एक अंग दारूबंदी हे होते. दारूबंदीवर त्यांनी लेख लिहीले, व्याख्याने दिली, एवढेच नव्हे तर दारूच्या दुकानापुढे पहिले पिकेटिंग करण्यापर्यंत त्यांनी मजल मारली.[६०] दारूबंदीची चळवळ

---

६०. केसरीतील लेख भाग ३ पृ. ३४६-५१
६१. गॉ. पारिख, भा.आ. शिल्पकार, पृ. ३३

राष्ट्रीय चळवळीत अंतर्भूत नसली तरी त्यात टिळक आघाडीवर होते. मुंबईच्या विधिमंडळाचे सदस्य झाल्यापासून टिळकांना या चळवळीविषयी आस्था होती.

मद्यपानाचे व्यसन लावण्यास सरकार सर्वस्वी जबाबदार आहे असे त्यांचे मत होते. धर्म व समाजाच्या चालीरीतीशी विसंगत असलेल्या मद्यपानाला सरकार जबाबदार आहे अशी टिळकांची खात्री असल्याने त्यांनी राजकीय अस्त्र म्हणून त्यांचा उपयोग होत आहे अशी सरकारला खात्री होतीश ब्रिटिश सरकारचे अबकारी उत्पन्न सहा लाख होते.[62] मुंबईच्या गर्व्हनरकडे अबकारी कमिशनर कडून आधीच भयप्रद रिपोर्ट गेले होते की, "पुण्यात इंग्रज सरकारचे राज्य संपून टिळकांचे राज्य सुरु झाले आहे. ही चळवळ थांबली नाही तर आज दारुची दुकाने बंद होतील, उद्या सरकारी कचेऱ्या बंद होतील. अशी भीती व्यक्त केली गेली.

१९०७ ला पुण्यास मद्यपान निषेध सभा स्थापन केली त्याचे अध्यक्ष गोखले व संचालक टिळक होते २३ एप्रिल १९०८ च्या रेमार्केटच्या मैदानातील डॉ. भांडारकरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत टिळक प्रमुख वक्ते होते यात दारुबंदी स्वदेशी दुःखे, साखर कारखाने या तीन ठरावावर टिळकांची भाषणे झाली.[63]

टिळकांनी दारुबंदीवर "सरकार दारु आणि लोक हा अग्रलेख १४ एप्रिलला आणि दुसरा लेख २८ एप्रिल १९०८ ला दारु आणि सरकारची अडवण" या मथळ्याखाली लिहीला त्यात त्यांनी इंग्रज सरकारच्या अबकारी

---

६२. फाटक : लोकमान्य पृ. २४९

६३. केळकर, उत्तरार्ध : भाग ४ पृ. १२-१३

धोरणावर टिका करून भारतातील दारूच्या परिणामाचे विश्लेषण केले आहे.[६४]

अबकारी उत्पन्नावर दारूबंदी अनिष्ट होतीच पण तिचे राजकीय परिणामही विघातक ठरणार होते. १९०८ जून मध्ये टिळकांना अटक झाली नसती तर ही चळवळ किती फोफावली असती हे सांगणे कठीण आहे त्यांच्या अनुपस्थितीत ही चळवळ मंदावली.[६५] अशा प्रकारे १९०० नंतरचा ६-७ वर्षाचा काळ हा टिळकांच्या जहाल विचारसरणीच्या उद्गमाचा व प्रचाराचा काळ ठरतो. जहालवादाला आकार व रूप आले ते याच काळात. जहालवादाची एक निश्चित विचारसरणी व कार्यपद्धती या काळात आकाराला आली, तिचा प्रचार करणारी काँग्रेसमध्ये अनेक समविचारी मंडळी त्यांना भेटली. लाल-बाल-पाल अशी त्रिमूर्ती या जहाल विचार प्रचार देशाच्या निरनिराळ्या भागात करू लागली. बंगालच्या फाळणीमुळे व सरकारच्या बेपर्वाईच्या व उन्मत्त धोरणामुळे जहालवादाला नैतिक पुष्टी मिळाली. आणि काँग्रेसमधील तरुण मंडळी मोठ्या संख्येने या विचारधारेकडे आकृष्ट झाली सुरतेला मवाळ जहालात फूट पडून काँग्रेस मवाळांच्या ताब्यात गेली असली तरी जहालांचा वाढता जोर परकीय राज्यकर्त्यांना सलू लागली व या जहाल नेत्यांना भारताच्या राजकीय प्रांगणातून दूर सारण्याच्या योजना ब्रिटिश सरकार आखू लागले.

१८९७ ला टिळकांना अटक झाल्यापासून सरकार त्यांच्याकडे संशयी नजरेने पाहू लागले होते आणि राष्ट्रीय पक्षाच्या स्थापनेमुळे त्यांची शंका अधिकच बळावत गेली. टिळक तर भारतीय असंतोषाचे केंद्र त्यांच्या

---

६४. केसरीतील लेख भाग ३ रा. पृ. २६६-८०

६५. डॉ. करंदीकर: आ.भा. शि. पृ. ११३

नजरेत बनले होते. दिवसेंदिवस इंग्रज सरकारचे धोरण उद्दाम होत असल्यामुळे याच काळात सशस्त्र क्रांतीकारी संघटना प्रबळ होऊन राज्यकर्त्यांच्या आधार स्तंभाला धक्का देत होते. याला महाराष्ट्रात बऱ्याच अंशी टिळकांचे लेख कारणीभूत असा ब्रिटिश सरकारला संशय होता. राजद्रोही लेख लिहिण्याचा आरोप ठेवून सरकारने पुन्हा टिळकांची रवानगी तुरुंगात केली त्यांच्या तुरुंगात जाण्याने जहाल गट मागे पडला आणि परकीय सत्ताधारी निःशस्त्र प्रतिकाराला दाद देत नाही हे पाहून क्रांतिकारकांनी इंग्रज अधिकाऱ्यांची हत्या करण्यास प्रारंभ केला.

**१९०८ मधील राजद्रोहाचा खटला :**

टिळक सुरत तडा नंतर ही सतत कार्यरत राहिलेले दिसून येतात त्यांनी लोकांना स्वावलंबनात्मक देशोन्नतीकडे आकृष्ट करण्याचा सतत प्रयत्न केला.[66] इंग्रज सरकार त्यांच्या कर्तृत्वामुळे चिडून जाऊन जहाल पुढाऱ्यांना त्यातील टिळकांनाच धडा शिकविण्याचा विडा उचलला होता. हे लॉर्ड मिन्टो भारतमंत्री आणि व्हाईसरॉय मोर्ले व मुंबईचे गव्हर्नर सिडेनहॅम यांच्या परस्पर पत्रे व कागदपत्रावरुन ही आता उजेडात आली आहे. त्यावरुन लक्षात येते. टिळकांच्या देशभक्ती या लोकांच्या मनात इतका द्वेष होता की मॅन्चेस्टर गार्डीयनने म्हटल्याप्रमाणे त्यांना शासन केले तै स्वतःचे विचार समजू शकणाऱ्या जनसंमर्दांच्या भावना ते उच्चतर करण्यासाठी उचंबळून आणू शकतात आणि तशा त्या आणतातही म्हणून."[67] १९०८ च्या इंग्रज सरकारच्या दडपशाहीने पुन्हा वर डोके काढले होते. "मवाळांना हाती धरा आणि राष्ट्रीय पक्षाला मारा" हे धोरण मोर्लेने स्वतः जाहीर केले होते. ३० एप्रिलला बंगालमध्ये जन्माला

---

६७. डॉ. करंदीकर : आ.भा.शि. पृ. १२९

आलेला बाँब टिळकांना दोन महिन्यांनी अटक करण्यास कारणीभूत ठरला खुदीरामबोस आणि प्रफुल्ल चाकी यांनी मुझफ्फर येथे बाँब टाकला त्यात दोन युरोपियन स्त्रिया मारल्या गेल्या. पण त्यामुळे उद्भवलेल्या भीती, विषाद या वातावरणामुळे देश हादरून गेला आणि सरकारने क्रांतिकारकांच्या भीतीने दडपशाही जोरदार सुरू केली.[६८]

२३ जुन १९०८ ला टिळकांना अटक करण्यास मुंबई गव्हर्नरने संमती दिली. मुंबई डेप्युटी पोलीस सुपरीटेंडेंटने प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट पुढे फिर्याद दाखल केला त्यात लिहिले होते की "१२ मे च्या अंकात टिळकांनी "देशाचे दुर्दैव" हा अग्रलेख लिहीला आणि त्या योगे सरकारबद्दल व्देष व अवमानबुध्दी लोकात उत्पन्न करण्याचा प्रयत्न त्यांनी केला हा राजद्रोहाचा गुन्हा होय तरी १२४ अ व १५३ अ या कलमानुसार टिळकांचा इन्साफ होवून योग्य ती शिक्षा व्हावी" म्हणून मॅजिस्ट्रेटने टिळकांना पकडण्यासाठी वारंट काढले. २४ जूनला टिळकांना सरदार गृहात पकडून त्यांच्यावर खटला भरला.

केसरी पत्राच्या फायली, कर्मचाऱ्यांची रजिस्टरे, हस्तलेख, मसुदे, छपाई इ. जप्त करण्यात येवून कोर्टापुढे आणण्यात आले. झडतीच्या दुसऱ्या दिवशी टिळकांवर आणखी एक खटला हे उपाय टिकावू नव्हेत" या अग्रलेखासाठी भरण्यात आला या लेखातील बाँब गोळ्याचे विवेचन आणि स्फोटक द्रव्यासंबंधी पुस्तकांचा टिळकांच्या हस्तलेखात उल्लेख होता त्यांचा संबंध बाँब फेकण्यासी लावला गेला.[६९]

---

६८. जावडेकर, आ भारत, पृ. ३४३

६९. केळकर, उत्तरार्ध भाग ८, पृ. ५६-५९

दि. १२ मे च्या "देशाचे दुर्दैव" या केसरीतील लेखात सरकारच्या "हम करे सो कायदा" या सरकारच्या "सुलतानी धोरणाच्या निषेधार्थ लेख लिहिला त्यानंतर प्रत्येक आठवडयात "दुहेरी इशारा" "बाँब गोळयाचा खरा अर्थ, बाँब गोळयाचे रहस्य" अशा मथळयाखाली लेख लिहीले होते आणि या आधारावर टिळकांना अटक झाली म्हणून २४ जूनला टिळकांना मोकळे सोडल्यास भलताच अनर्थ होईल या भीतीने त्यांचा जामिन नाकारण्यात आला.[७०] १३ जुलै सोमवारला हायकोर्टात क्रिमीनल सेशनमध्ये खटला सुरु झाला. सरकारतर्फे अॅड. जनरल इनसन सोबत इन्व्हेरॅरिटी व बिनींग होते. डिफेन्सतर्फे टिळक स्वतःचे काम स्वतःच चालवित होते. टिळकांनी बचावाचे वक्तव्य एकवीस तास केले. २२ जुलैला निर्णय देण्यापूर्वी तुम्हाला काही सांगायचे आहे काय? असा प्रश्न न्यायमूर्तींनी केला तेव्हा टिळक म्हणाले की, "ज्युरीने मला दोषी ठरविले तर खुशाल ठरवो. पण मी गुन्हेगार नाही. लौकिक गोष्टींचे नियंत्रण करणारी अशीही एक शक्ती न्यायपीठापेक्षाही वरिष्ठ आहे. कदाचित ईश्वराची इच्छाच अशी असेल की मला शिक्षा व्हावी आणि मी शिक्षा भोगल्या कारणानेच मी अंगिकारलेल्या कार्याला उर्जित दशा यावी" येवढे बोलणे झाल्यानंतर टिळकांना न्यायाधिशांनी शिक्षा सुनावली ती ६ वर्ष काळया पाण्याची सजा आणि १००० रु दंड भरणे.[७१]

बॅ. जिना आपल्या आठवणीमध्ये असा अभिप्राय व्यक्त केला की, टिळकांना कायदेशीर दृष्टया बचावाचे भाषण करायचे नव्हते "अँग्लो इंडियन वृत्तपत्रे ही खरी गुन्हेगारी असून सरकार त्यांची गय करुन त्यांना फूस देते आणि गुन्हेगारीच्या हिन्दी प्रक्रियेला मात्र चिडून पाहते" हे टिळकांना आपल्या २२ तास भाषणात सिध्द करायचे होते.[७२]

---

७०. फाटक : लोकमान्य, पृ. २६४–६६

७१. केळकर : चरित्र उत्तरार्ध पृ. ११ व ७३ भाग ८

७२. फाटक : लोकमान्य, पृ. २७९

महाराष्ट्र राज्य आयोजित. पुराभिलेख विभाग अभिलेख सप्ताह १९८४-८५ स्मरणिका ९ ते ५ डिसेंबरला नागपूरला आयोजित केली होती. तेथील प्रदर्शनातील निवडक कागदपत्रांमध्ये टिळकांच्या १९०८ च्या राजद्रोह खटल्याच्या निर्णयाचे कागदपत्र आढळले. या खटातील ब्रिटिश कालीन इंग्रजी कागदपत्रामध्ये ४३ वे कागदपत्र होते ते पुढीलप्रमाणे-

Commutation of the sentence of the transpartation for six year passed on Bal Gangadhar Tilak to one of the simple imprisonment for a like term.

Knx4796x

No 4796

Judical Department

Bombay Castle 9th Sept. 1908

Resolution of Government.

In the exercise of the power conferred by section 402 of the code of criminal procedure, the Governor in council is pleased to commute the sentence of transpartation for six years passed upon Bal Gangadhar Tilak at the Criminal sessions of the Bombay High Court on the 22nd July 1908 under section 124 A of the Indian Penal code to one of simple imprisonment for alike term.

Under Secretary of Govt.

Jud. 995

न्यायाधिशाने निर्णय जाहीर केल्यानंतर टिळकांना लागलीच मोटारीत बसवुन तुरुंगात नेले. दुसऱ्या दिवशी संपूर्ण मुंबईत हरताळ पाळण्यात आला. बहुतेक सर्व गिरण्या बंद होत्या देशभर टिळकांच्या तुरुंगात

याण्याने असंतोष पसरला. निषेधाच्या सभा घेण्यात आल्या. १० सप्टें. ला अहमदाबादच्या तुरुंगात टिळकांना नेले तेथून २३ सप्टें. ला मंडालेच्या तुरुंगात रवाना केले. ५ ऑक्टला टिळकांतर्फे अपील करण्यात आले. ८ सप्टें. ला सरकारने दंड कमी केला. प्रिव्ही कौन्सील मध्ये टिळकांच्या सुटकेसाठी प्रयत्न करण्यात आले पण ते सर्व प्रयत्न व्यर्थ गेले.[७३]

टिळकांच्या सहानुभूती व्यक्त करण्यासाठी निषेधाच्या सभेत वृत्तपत्रेही सामील झाली "मराठा" ने लिहिले की, "टिळक स्वदेशाची भक्ती करण्याचे ढोंग करीत असतात असे म्हणण्यासाठी न्यायमूर्तींनी स्वतःच्या अधिकाराचा दुरुपयोग केला आहे हे एक निष्ठूर सत्य आहे". सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी "बंगाली" मध्ये लिहीले की, "आम्ही या शिक्षेला राक्षसी - ज्ञे गुन्हेकेल्याचा आरोप होता त्यांच्या मानाने भरमसाठ मानतो. आमच्या देशबंधूप्रमाणे सर्वच सुविचारी व्यक्ती तिचा धिक्कार व्यक्त करतील अशी आमची पूर्ण खात्री आहे."

ब्रिटिश वृत्तपत्र "टाईम्स" ने लिहीले की, "शिक्षा ठोठावण्याच्या वेळी टिळक हा-या भारतीय नेत्यात उठून दिसत होते बहुसंख्य लोकात त्यांनी जी लोकप्रियता मिळविली आहे आणि जी छाप पाडली आहे, तिचे बरोबरी भारताच्या सार्वजनिक जीवनातील दुसरी कोणतीही व्यक्ती करु शकणार नाही." काही ब्रिटिश वृत्तपत्रांनीही याबाबतीत प्रतिकूल मत व्यक्त केले "स्टार" या वृत्तपत्राने म्हटले की, "टिळकांचे लेख बॉबच्या वापराला प्रत्यक्ष चिथावणी देणारे मुळीच नव्हते असे दिसते. राजकीय पुढाऱ्यांच्या उद्‌गारांचा शांततेच्या काळात जो अर्थ लावता येतो, त्यापेक्षा अधिक अनिष्ट अर्थ आणिबाणीच्या काळात लावणे यापेक्षा सोपे दुसरे काहीच नाही."

---

७३. केळकर "उत्तरार्ध : भाग ८, पृ. ५१-५२

मॅन्चेस्टर गार्डीयनने म्हटले की, "वंश विद्वेषाच्या प्रदर्शनाला आणि विश्वासाची भावना मनाने दृढमूल करण्याचा प्रतिबंध करणारी घटना या दृष्टीने टिळकांवरील खटल्याची आणि त्यांना ठोठावलेल्या शिक्षेची स्मृती प्रदीर्घ काळ राहील या दोन गोष्टी घडल्या नाही तर इंग्रजांना राज्यकारभार चांगल्या रीतीने चालविणे अशक्य होऊन बसेल आणि सुधारणाही व्यर्थ ठरतील."

या देशव्यापी निषेधाला घाबरून लॉर्ड मोर्लेनी २१ जुलै १९०८ ला मुंबईचे गव्हर्नर सिडेनहॅमला पत्र लिहिले की, "माझ्या आणि तुमच्या स्वतःच्या वकीलाचा सल्ला घेण्याची मेहेरबानी केली असती तर टिळकांच्या वाटेस जाण्याचा सल्ला मी तुम्हाला दिला नसता, एवढे सांगण्यापलिकडे मी टिळकप्रकरण पुन्हा फिरून आखू शकत नाही." टिळकांना झालेली शिक्षा आणि त्यामुळे झालेले मुंबईतील दंगे आणि संप याकडे भारत व इंग्लंड बाहेरील देशाचे लक्ष वेधले होते. लेनिनेने या दंग्याचे वर्णन करताना "भारतातील क्रांतिवादी चळवळीचा पहिला उठाव" या शब्दात वर्णन केले आहे.[७४]

यावरून टिळकांचे कार्य किती महत्त्वपूर्ण आणि देशव्यापी होते हे ध्यानात येते. त्यांचे राजकारण जहालवादी होण्यासाठी इंग्रसरकारने वेळोवेळी भारत विरोधी आखलेले धोरण कारणीभूत होते. पारतंत्र्यात अडकलेल्या देशाला स्वातंत्र्याची जाणीव करून देऊन पारतंत्र्याच्या शृंखला तोडण्यास प्रेरित केले जरी त्यांनी आपले कार्य महाराष्ट्रापासून सुरू केले असले तरी त्याचे पडसाद संपूर्ण देशात उमटलेले दिसून येतात. हाच त्यांच्या राजकीय कार्याचा हा विजय होता.

---

७४. डॉ. करंदीकर : आ. भा. शिल्पकार पृ. १३८-३९

समालोचन.

## प्रकरण ४ थे

## स मा लो च न

१९०८ चे वर्ष आधुनिक भारताच्या इतिहासातील महत्वाचे वर्ष ठरते. या वर्षापासून काही वर्षे जहाल राजकारणाला ओहोटी लागली. टिळकांची मंडालेला रवानगी झाली. १९०८ याच सुमारास देशातील इतरही जहाल नेत्यांना सरकारने गजाआड टाकले व जहाल नेत्यांच्या अनुपस्थितीत जहाल राष्ट्रीय चळवळ पुढील काही वर्षे बरीच मंदावली. महाराष्ट्रातही जहाल गटाच्या कार्याला सरकारने पायबंद घातल्याने जहाल राजकारणाचा भर १९०८ नंतर ओसरु लागला.

बाळ गंगाधर टिळकांच्या १८९० ते १९०८ ह्या राजकीय जीवनाच्या कालखंडात ब्रिटिश कालीन भारतातील राजकारणास एक नवीन दिशा मिळाली. त्यांचे राजकारण जहाल होण्यास इंग्रज सरकारचे धोरण मुख्यत: कारणीभूत ठरले आहे. टिळकांच्या आधीही महाराष्ट्रात विष्णुशास्त्री चिपळूणकर, न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, ज्योतिबा फुले इत्यादी समाज-सुधारक राजकारणात भाग घेत होते पण त्यांचे कार्य हे एक सीमित क्षेत्राच्या पलिकडे गेले नाही. अगद सुशिक्षित अल्पसंख्याकांच्या पलिकडे पोहचले नाही.

१८८५ च्या राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतर भारतीय राजकारणाला प्रेरणा मिळाली. राष्ट्रीय काँग्रेसचे वर्षातून एकदा भरणारे सम्मेलन सुरु झाले. पूर्वीही सभा होत होत्या. पण त्या प्रांतापुरत्या मर्यादित होत्या. रानडे, फुले, लोकहितवादी यांनी प्रथम सामाजिक सुधारणेला सुरुवात केली. नंतर हळूहळू राजकीय क्षेत्रात शिरु लागले, पण तेही एका मर्यादेपर्यंत.

टिळकांचे राजकीय विचार बहुतेक वृत्तपत्र लेखनातून व्यक्त झालेले आहेत. टिळकांच्या पूर्वी राजकीय विषयावरील विस्तृत लेखन लोकहितवादी

आणि विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केलेले आहे. स्वभाषा, स्वधर्म, या विषयी अभिमान, गतइतिहासाची स्मृती, भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेची भावना इत्यादी गोष्टीवर विष्णुशास्त्रींनी भर दिला होता, आणि नव्या राष्ट्रवादी भावनेचे आधार म्हणून हेच घटक टिळकांच्या आरंभीच्या लेखनात आढळतात.[१]

टिळकांच्या सार्वजनिक जीवनाचा आरंभ वृत्तपत्रीय क्षेत्रात पदार्पण केल्यानंतर बर्वे प्रकरणाच्या तुरुंगवासाने सुरु झाला. त्यानंतर महत्वाचा वाद झाला तो म्हणजे आधी राजकीय की आधी सामाजिक? टिळक आगरकर डेक्कन कॉलेजात असताना ह्या वादाला सुरुवात झाली आणि हा वाद १९०१ पर्यंत टिकला. सामाजिक सुधारणेच्या मूल तत्वांना टिळकांचा विरोध नव्हता. पण राजकीय सत्ता संपादण्याच्या दृष्टीने तरी असल्या सुधारणांचा उपयोग नाही, असे टिळकांना वाटत होते. राजकीय सत्ता हाती आल्यानंतर त्या सत्तेच्या बळावर आपणास हव्या त्या सुधारणा करता येतील असे त्यांचे म्हणणे होते. त्यासाठी त्यांनी शिक्षणावर लक्ष केन्द्रीत केले. शिक्षणाच्या माध्यमाने समाजाला बाधक वाटणाऱ्या गोष्टी आपोआप नाहीशा होत जातील असे त्यांना वाटत होते. १८८६ च्या केसरीत "आधी कोण? राजकीय की सामाजिक?" या अग्रलेखात त्यांनी आपले विचार मांडले आहेत.[२]

सामाजिक क्षेत्रात इंग्रज सरकारने केलेला हस्तक्षेप टिळकांच्या सामाजिक सुधारणा विरोधी होण्यास कारणीभूत ठरलेले दिसून येते. भारतीय संस्कृती

---

१. गोवर्धन पारिख : भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार पृ. ५

२. लक्ष्मणशास्त्री जोशी : लो. टिळक लेखन संग्रह : भाग ४ पृ. ३२

ज्यांना अज्ञात आहे त्यांनी भारतीय समाजात आपल्या अधिकाराने सुधारणा घडवून आणण्याला टिळकांचा विरोध होता.

भारतीय समाज जीवनाचा रानड्यांनी केलेला सर्वव्यापी विचार टिळकांना आदरणीय वाटत होता. पण सामाजिक सुधारणा स्वतःपासून सुरु करुन लोकांसमोर आदर्श ठेवल्यास त्याचा परिणाम समाजजीवनावर घडू शकतो, यावर त्यांचा विश्वास होता. तेलंग, रानडे, आगरकर या बाबतीत मागे पडलेले दिसून येतात. त्यानंतर राजकीय हेतूला प्राधान्य दिले गेले.

लोकमान्य टिळकांचे राजकारण अंतिम दृष्टया क्रांतीवादी होते पण त्याचबरोबर ते कायदेशीर होते. त्यांचे प्रयत्न राष्ट्रसभा ही जनतेची ख-या अर्थाने प्रतिनिधीत्व करणारी सभा कशी होईल? आणि तिचे राजकारण पुरोगामी कसे बनेल यासाठी चालू असत. ज्याला राष्ट्राचे राजकीय नेतृत्व करावये त्याने एकसारखे पुढे जावे पण आपल्या मागून राष्ट्र येत आहे. किंवा नाही याकडे लक्ष द्यावे असे टिळकांचे मत होते. देशातील राजकीय संस्था बहुमताने आपल्या पक्षाच्या हाती आणण्याचा प्रयत्न करणे हा नव्या तरुण पक्षाचा नैसर्गिक हक्क आहे व तो श्रेष्ठ नेत्यांनी आनंदाने मान्य केला पाहिजे, हे ज्यांना आवडणार नाही त्यांनी आपल्या राजकारणाचे दिवस संपले म्हणून स्वस्थ बसावे आणि नव्या पक्षाने आपल्या पक्षाचे राजकारण आपल्या जबाबदारीवर चालवावे शक्य झाल्यास जुन्या लोकांनी त्यास सहाय्य करावे असे त्यांना वाटे पण जेव्हा रानडेंनी नवीन संस्था स्थापन करुन बहुमताला न रुचणा-या आपल्या राजकारणात चिरंतन करण्याचा प्रयत्न केला तेव्हा टिळकांनी त्यांच्यावर टिका करण्यास सुरुवात केली आणि म्हातारचळ की चोर खेळ? असा सवाल केसरीतून टिळकांनी केला.

टिळकांनी रानड्यांवर जी टिका केली ती कितीही कठोर असली तरी त्या तत्वांचा त्यांनी पुरस्कार केला ते तत्व वर हिन्दी राजकारणात पाळले गेले असते. रानडे देखील देशभक्त होते पण त्यांच्या देशभक्तीचा मार्ग चुकीचा आहे व त्यामुळे राष्ट्रात दुहीचे बीज पेरले जात आहे अशी टिळकांची समजूत असल्याने रानडेवरील टिका तत्वप्रेरित होती.[3]

टिळकांनी गुलामगिरीत होणा-या मानहानीवर आणि बौध्दिक मानसिक कुचंबनेवर तसेच आर्थिक पिळवणूकीवर प्रकाश टाकून त्यांनी राज्यकर्त्यांबद्दल जनमानसात व्देष निर्माण केला. त्यांचे राजकारण नकारात्मक आणि रचनात्मक होते म्हणून इतकी टिका टिळक रानडेवर करीत असले तरी रानडे त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना म्हणतात की, "बळवंतरावजीच्या मनगटात सामर्थ्य आहे..... सरकारशी आम्ही कारणापेक्षा जास्त संबंध ठेवतो याचाच त्यांना जास्त राग येतो त्यास हे स्वाभाविक आवडत नाही तेव्हा त्याने आम्हास नावे ठेविल्यास, नव्हे मनापासून शिव्याही दिल्यास ते त्यास शोभण्यासारखे आहे.[4]

टिळक-आगरकरांच्या विचारसरणीत "आधी सामाजिक की राजकीय वादात गुरफटल्यामुळे डेक्कन ऐज्युकेशन सोसायटी सोडल्यापासून मार्ग भिन्न झालेले दिसतात. आगरकर सामाजिक व धार्मिक प्रश्न सोडविण्यास वातावरण अनुकूल आहे या दृष्टीने पाहता उलट राजकीय प्रश्न सोडविणे अधिक सोपे आहे, असे टिळकांना तेलंगप्रमाणे वाटत होते यामुळे एका दृष्टीने हा वाद ध्येयप्राप्तीसाठी कोणता मार्ग स्वीकारावा याबद्दल होता. राज्यकर्त्यांची सांस्कृतिक व वैचारिक पार्श्वभूमी लक्षात घेता सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी

---

३. आ. जावडेकर. आ. भारत. पृ. २३७-३८

४. गो. तळवलकर : लो. टिळक दर्शन पृ. १५

त्यांचे सहकार्य मिळेल, कायद्याने सुधारणा लवकर घडून येतील, ही आगरकरांची, विचारसरणी होती. तर उलट टिळकांना इंग्रज भारतात परोपकारासाठी आलेले नसून स्वतःच्या फायद्यासाठी आलेले आहेत त्यामुळे आमच्या समस्या सोडविण्यास ते सहाय्यभूत ठरतील ही कल्पनाच टिळकांना मान्य नव्हती.

पारतंत्र्यामुळे राजकीय प्रश्न राष्ट्रवादी भूमिकेच्या आधाराने सोडविले पाहिजे. त्यासाठी लोकांचे पाठबळ आवश्यक आहे. आणि तत्कालीन समाज रुढीप्रिय असल्यामुळे सामाजिक सुधारणेमुळे तो डिवचला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आमचे ध्येय साध्य होण्यासाठी ह्या सुधारणा हळूहळू घडवून प्रथम राजकीय प्रश्न सोडविणे आवश्यक आहे असे टिळकांना वाटत होते आणि हाच त्यांच्या जहालवादी राजकारणाचा आधारभूत पाया होता "सामाजिक सुधारणा हा कधी न संपणारा प्रवास होय आणि राजकीय सुधारणा हा त्याचाच एक भाग आहे म्हणून राजकीय स्वातंत्र्य लवकर गाठता येणारे ध्येय आहे."[5]

टिळक- आगरकर यांचे कितीही मतभेद असले तरी ते परस्पराबद्दल आदरभावना बाळगीत. स्वार्थो यस्य परार्थ एवं स पुमानेकः सतामग्रणीः हे भर्तृहरिचे वचन आगरकरांच्या बाबतीत यथार्थाने उद्धृत करुन "आगरकर पक्के स्वराज्यवादी"[6] असल्याचा उल्लेख करतात आणि व्यक्तिस्वातंत्र्य हा त्यांच्या सुधारणेचा पाया होता असे टिळक म्हणतात तर उलट आगरकर सुन्यांनी टिळकांना धरले असता "हे तुमचे पुढारी नव्हेत."[7] असा खणखणीत इशारा

---

५. गोवर्धन पारिख : आ.रा.वि. पृ. १५-१८

६. लो. टिळकांचे केसरीतील लेख भाग ४: पृ. ५३१-३६

देतात त्याचबरोबर त्यांच्या रचनात्मक राजकारणाची प्रशंसाही करतात.

**टिळकांच्या जहालवाद :**

सुरुवातीला टिळकांना काँग्रेसबद्दल विश्वास होता. पण जेव्हा इंग्रज भारतीय सामाजिक प्रश्नाकडे अधिक लक्ष देऊन राष्ट्रीय सभेच्या सामान्य मागण्याकडे दुर्लक्ष करतात हे लक्षात आल्यानंतर त्यांच्या राष्ट्रीय सभेच्या सनदशील मार्गावरील विश्वासाला तडा गेला म्हणून १८९०-९१ च्या संमती वयाच्या वादात टिळकांनी विरोधकाची भूमिका स्विकारली. भारतीय संस्कृती आणि पाश्चात्य संस्कृती यात जमीन अस्मानाचा फरक असताना भारतीय समाजासाठी काय योग्य नि काय अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार इंग्रजांना नाही. पुढच्या सुधारणा कागदोपत्रीच राहतात हा विश्वास असल्याने परकीय सरकार राष्ट्रीय सभेच्या नेत्यांना सामाजिक प्रश्नात गुतवून राष्ट्राची दयनीय स्थिती करण्याच्या विचारात आहे असे टिळकांचे स्पष्ट मत होते. "हम करे सो कायदा" ही इंग्रज सरकारची वृत्ती आणि राजकीय हक्कांना "तुम्ही लायक नाही" ह्या अपमान जनक वागणुकीचा टिळकांना राग होता.

परकीय राज्यकर्त्यांनी आमच्या चालीरितीत ढवळाढवळ करू नये हा मुद्दा राजकीय दृष्टया लोकप्रिय होण्यास कारणीभुत असल्याने टिळकांनी त्यावर जोर देवून परंपरावादाचा व राष्ट्रीय आन्दोलनातील एक महत्त्वपूर्ण विचारसरणीचा संबंध जोडला. संमतीकायदावादाची घटना टिळकांच्या भावी कार्याची आणि भारतीय राष्ट्रवादाची दिशा ठरविण्याच्या दृष्टीने बरीच निर्णायक स्वरुपाची ठरली. त्यांची परंपरावादी भूमिका राजकीय कार्याच्या गरजेसाठी महत्त्वपूर्ण ठरल्याचे आढळून येते.[८]

---

८. गो. पारिख: भा.रा. शिल्पकार : पृ. २३

राजकीय ध्येय प्राप्तीसाठी सशस्त्र बंडाचा मार्ग अव्यवहार्य असल्यामुळे लोकमत जागृत करूनच राजकीय क्रांती घडवून आणणे टिळकांचे ध्येय होते. सनदशीर राजकारणावर त्यांचा विश्वास नव्हताच. शिक्षणामुळे लोकजागृती होऊ शकते, टिळकांचा विश्वास असल्याने त्यांनी शिक्षण संस्था स्थापन केली. पण प्रस्थापित व्यवस्थेकडून सरकारी अनुदान स्वीकारून आपणास अपेक्षित असलेले कार्य शिक्षणसंस्थेकडून होणे शक्य नाही हे कळताच टिळक शिक्षण संस्थेतून बाहेर पडले. "लेखणी हत्यार तलवारीपेक्षा प्रभावी आहे," हे लक्षात येताच त्यांनी लोकजागृती साठी वृत्तपत्रांचा आधार घेतला आणि आपल्या राजकीय ध्येयाची पूर्ण भिस्त "केसरी" व मराठावर केन्द्रीत केली. त्यात त्यांना पुष्कळ प्रमाणात यशही प्राप्त झाले. पण येवढ्याने त्यांचे कार्य संपणारे नव्हते. अधिवेशनात सक्रिय भाग घेऊन देशाच्या तत्कालीन ज्वलंत प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरु केला. आणि संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करून तरुण पिढीला स्फूर्ती दिली. सामान्य जनतेच्या सामुदायिक प्रतिकाराची आवश्यकता प्रतिपादीत करून लोकमत संघटित करण्याचा पायंडा घातला". [१]

१८९३-९४ चे हिंदु- मुस्लिम दंगे इंग्रजी राज्यकर्त्यांच्या पक्षपाती धोरणामुळे उद्भवले असे टिळकांनी केसरीत स्पष्ट पणे जाहीर केल्यानंतर राष्ट्रीय जागृतीसाठी राष्ट्रीय उत्सव साजरा करण्याचा प्रघात सुरु केला. पण या उत्सवाकडे मुस्लीम समाज साशंक नजरेने पाहत राहीला टिळकांनी जरी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने उत्सवाकडे पाहिले असले तरी सरकारच्या "फोडा आणि झोडा" "नीती हिन्दु मुस्लीम दंग्यात यशस्वी झाल्याचे दिसून येते.

---

१. नलिनी पंडित : महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास: पृ. ११०

राजकीय सामाजिक घडामोडीप्रमाणे टिळकांचे लक्ष आर्थिक प्रश्नाकडेही होतेच. केसरीतील अनेक लेखाव्दारे शेतक-यांची स्थिती, दुष्काळाचे स्वरुप, हुंडाणावळीचे दर, हिन्दुस्थानचे दारिद्र्य, आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले, ११० कोट रुपया कसा उडतो. लष्करी खर्चाचे ओझे, कंपनी व इंग्रज सरकार इ.[१०] विषयांची टिळकांनी चर्चा केली. हिंन्दी लोकांच्या अवन्नतीला मुख्यतः ब्रिटिशांची साम्राज्यशाही जबाबदार असल्यामुळे टिळकांनी सरकारला दोष दिला. नोकरशाहीच्या जुलमी कारभारावर कडक टिका केली. आपत्तीच्या काळात केवळ सरकारवरच अवलंबून राहू नये, आपली सामाजिक जबाबदारी ओळखून लोकांनी स्वतः कार्यप्रवृत्त व्हावे म्हणून पुण्यामध्ये स्वस्त धान्याची दुकाने उघडण्यासाठी व सोलापूरमधील शिक्षणासाठी अतोनात श्रम घेतले.

दुष्काळाच्या काळात सरकारचे लक्ष दुष्काळी भागाकडे जावे म्हणून फेमिन कोड कायदा लागु करण्यास सरकारला प्रवृत्त केले. शेतकरी लोकांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन दिली सरकारकडे निर्भयपणे दाद मागण्यास प्रवृत्त केले. "मृत्यु आ वासून समोर असताना देखील तुम्ही धिटाई दाखवू शकणार नाही काय?" असा सवाल त्यांनी लोकांना केला आहे. केसरीमधून "दुष्काळ, दुष्काळाचे स्वरुप दुष्काळ निवारणाची तयारी, ह्यावेळी तालुक्यातील लोकांचे कर्तव्य, फॅमिन कोड, [११] इ. लेख लिहून दुष्काळाच्या प्रश्नाला देशव्यापी स्वरुप आणले. १८९७ च्या प्लेगने मुंबई पुण्याला हवालदिल करुन सोडले तेव्हा टिळकांनी त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ४ फेब्रु. १८९० ला साथीच्या रोग प्रतिकारक कायदा सम्मंत करण्यात सरकारला भाग पाडले. पण ह्या कायद्यामुळे रॅण्डच्या अनिर्बंध अधिकारामुळे "यापेक्षा प्लेगने मेलेले बरे" असे

---

१०. टिळकांचे केसरीतील लेख : केसरी प्रकाशन, पृ. ५८०-५८५

११. पूर्वोक्त ५७८ - ६००

लोकांना वाटू लागले तेव्हा टिळकांनी स्वत: "हिन्दू प्लेग हॉस्पिटल" उघडून लोकांच्या मनात विश्वास निर्माण करून प्लेगला घालविण्यात मदत केली. आणि सरकारने योजलेल्या रानटी उपायावर कडाडून टिका केली त्यामुळे त्यांना तुरुंगवासही पत्करावा लागला. रँडच्या खुनाला टिळकांचे लेख मुख्यत: कारणीभूत आहेत असा आरोप ठेवून टिळकांच्या राजकीय कार्याला आळा घालण्याचा प्रयत्न सरकारने केला होता पण याचा उलट प्रभाव पडून टिळकांच्या राजकारणाला उग्र स्वरूप प्राप्त झाले. १८९६-९७ च्या दुष्काळ, प्लेगने टिळकांच्या राजकीय आयुष्याला एक नवीन दिशा मिळाली होती. त्यानंतर त्यांचे कार्य महाराष्ट्रापुरतेच मर्यादित न राहता राष्ट्रव्यापी झालेले होते.

दुष्काळात शेतकरी वर्गाचे प्रतिनिधीत्व करताना "शेतकरी हा राष्ट्राचा आत्मा आहे त्याचे मालिन्य दूर केले तरच देशाचा उध्दार होईल" हा दृष्टीकोन समोर ठेवून त्यांनी केसरीमधून शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले होते. १८९६ च्या दुष्काळाला केलेल्या जनजागृतीचा दुहेरी फायदा झाला. गोऱ्या इंग्रज राज्यकर्त्यांबद्दल सामान्य जनतेच्या मनावर जो भयग्रस्त पगडा बसला होता तो हळूहळू दूर होण्यास टिळकांचे निर्भय कार्य प्रेरक ठरले. जनजागृतीच्या उपक्रमाबरोबरच सनदशीर मार्गाचाही टिळकांनी अवलंब केला होता. सार्वजनिक सभेच्या वतीने त्यांनी अनेक कार्यक्रम त्यांनी आखले आणि अंमलातही आणले होते.

मराठा व केसरीच्या माध्यमातून अपूर्व कामगिरी बजावून परकीय सरकारच्या राज्यकारभारातील मूलदोष हाणून पाडण्यास जनतेने सहाय्य केल्यामुळे या जनजागृतीच्या उत्साहाला मर्यादेपलिकडे वाव मिळणार की काय?

आणि आपले भारतातील राज्यकारण त्यामुळे संपुष्टात येणार की काय? याची इंग्रज सरकारला भीती वाटली होती.[12] म्हणूनच टिळकांच्या कार्याला अडथळा आणण्याचे धोरण सरकारने योजले होते.

श्री. बाळशास्त्री हरदास यांनी टिळकांच्या राजकीय कार्यक्रमाची ची उद्दिष्टे सांगितली ती म्हणजे एकतर राष्ट्राचा विरोध करणाऱ्या सुधारणावादी नेतृत्वास दुर्बल करणे, दुसरे म्हणजे विविध मार्गांनी राजकीय असंतोष निर्माण करणे आणि तिसरे म्हणजे त्या असंतोषाला पूर्ण स्वातंत्र्याच्या एकाच ध्येयवादी सूत्रामध्ये गोवून एकसंध चळवळ निर्माण करणे. परंतु ह्या उद्दिष्टांची पूर्ती टिळक अंशत: करू शकले कारण टिळकांच्या अखेरीपर्यंत ही सुधारणावादी नेतृत्व पूर्णपणे दुर्बल झालेले नव्हते. टिळकांच्या शिकवणुकीला गांधींच्या द्वारे यश मिळाले, होते कारण त्या शिकवणुकीचा नेमस्तांच्या शिकवणुकीशी समन्वय गांधींनी घातला होता. काँग्रेसला टिळकांनी लोकाभिमुख केले हे विधान नेमस्तांच्या तुलनेत रास्त असले तरी टिळकांच्या हयातीत काँग्रेस "लोकांची सभा" होवू शकली नाही. हे मान्य करावे लागते[13] ती फक्त सुशिक्षित मध्यम वर्गापर्यंत मर्यादित राहिलेली आढळून येते.

१८५८ च्या जाहीरनाम्यानुसार इंग्लंडच्या राणीने इस्ट इंडिया कंपनीकडून भारताचा राज्यकारभार आपल्या हातात घेताना काही निश्चित आश्वासने दिली होती. कायद्याचे राज्य करताना जमिनीचे हक्क, प्राचीन हक्क, रूढी व परंपरा यांना योग्य मान देण्याची वचने दिली होती या आधारावर टिळकांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनावर टिकास्त्र सोडले होते. राज्याचे उद्देश कितीही चांगले असले तरी अधिकाऱ्यांनी जर त्यांचा योग्य अंमल केला नाही तर ते निष्फळ होतात असा टिळकांचा दृष्टिकोन

---

१२. भा.द.खेर, लो.टिळक दर्शन पृ. ३४-३९

१३. भा.ल.भोळे, आ.भा.रा.विचार, पृ. २६४

होता. जाहीरनाम्यातील आश्वासने प्रत्यक्ष घटनावरून फोल कशी ठरली हे दाखविणे ही त्यांच्या राजकीय कार्याची महत्त्वपूर्ण पूर्वतयारी होती.[१४]

[illegible]प्रमाणे टिळकांचीही प्रथम इंग्रजांच्या औदार्य आणि न्यायबुध्दी अशादायक-वात होता.[१४] इंग्रज जनतेमधील हिन्दू विषयीचे औदासिन्य व अज्ञान दूर केल्यास आपणास हवे असलेले राजकीय हक्क त्यांच्या कडून मिळविता येतील अशी टिळकांची अपेक्षा होती. म्हणून आरंभीच्या काळात ध्येय व धोरणाबाबत राष्ट्रसभेतील अधिकारारूढ पक्षाशी त्यांचा कोणताच मतभेद नव्हता. पण गुलामांची मुक्तता, अनिर्बंध व्यापार इ. संबंधी परकीय देशात ज्या चळवळी घडून आल्या त्यांचा इतिहास पाहता आणि जाहीरनाम्याचे धिंडवडे निघालेले पाहून सतत ओरड केल्याखेरीज ब्रिटिश पार्लमेंटकडून कुठलेही हक्क मिळणार नाही हे टिळकांना जाणवले होते. म्हणून सतत चळवळ चालू ठेवणे व तिचा उत्तरोत्तर विस्तार वाढवित नेणे" या गोष्टीकडे टिळकांनी विशेष लक्ष दिले.[१५]

टिळकांनी आपल्या जहालवादी राजकारणाला सर्वांगीण क्रांतीचे स्वरूप न देता भारतीय संस्कृतीच्या अभिमानाचा आधार दिला आणि भारतात राजकीय स्वातंत्र्य मिळेपर्यंत तरी या देशात धार्मिक व सामाजिक क्रांतीला प्राधान्य देवू नये, त्या विचाराचे नवीन राजकारण सुरु केले. टिळकांच्या जहाल राष्ट्रीय पक्ष हा धार्मिक व सामाजिक सुधारणेत नेमस्त आणि राजकीय क्षेत्रात जहाल असा ठरला. याबद्दल अनेकांना आश्चर्य वाटते. पारतंत्र्यात असताना राजकीय क्रांतीचे विचार सामाजिक क्रांतीमुळे

---

१४. गो. पारिख : भा.रा. शिल्पकार पृ. २४–२५

१५. नलिनी पंडित : म. रा. विकास पृ. ८०

उद्भवत नाही तर आपणावर होणारे परकीयांचे आक्रमण पाहून ची चीड येते त्यातून क्रांतीकारक राजकारण उदयास येते.

ही चीड येणाऱ्यास वर सामाजिक क्रांती झाल्याखेरीज परकीयांचे राष्ट्र नष्ट होणार नाही, अशी खात्री होईल तरच ते सामाजिक सुधारणेला प्राधान्य देतील आणि ज्यांना पारतंत्र्याबद्दल चीड येत नाही ते राजकीय क्रांतीचा विचारही करणार नाहीत. त्यामुळे परकीय आक्रमणाविषयी द्वेष उत्पन्न करणे हेच देशात जहाल राजकारण प्रसारित करण्याचे प्रमुख साधन असते. टिळकांनी याच साधनांचा उपयोग आपल्या राजकारणात करून घेतला, आणि हे करताना सामाजिक रचनेच्या परंपरेला फारसा धक्का लागणार नाही ह्याची काळजी घेतली.

परकीय राजसत्तेच्या आक्रमणामुळे दारिद्र्य व बेकारी वाढत आहे ही जाणीव होताच परंपरागत संस्कृतीचा अभिमान जागृत होऊन क्रांतीवादी व जहाल राजकारणाचा जन्म झाला.[16] सनदशीर राजकारण आणि सशस्त्र क्रांती राजकारणाच्या दरम्यान नि:शस्त्र क्रांतीचे एक स्वतंत्र राजकारण आहे व तेच १९०५ पासून राष्ट्रीय पक्षाने उघडपणे स्विकारले होते. हे राजकारण नैतिक दृष्टया किंवा सुधारलेल्या देशातील प्रशस्त मानलेल्या राजकीय व्यवहार दृष्टया अप्रशस्त आहे असे कोणासही मानता येणे शक्य नव्हते.[17]

राजकीय संघटना म्हणून काँग्रेसची स्थापना झाली असली तरी सामाजिक सुधारणेबाबत विचार विनीमय करण्यास काँग्रेस सभा संपल्यानंतर सामाजिक परिषद भरविली जाई. पण दादाभाई नौरोजी व टिळकांनी राष्ट्रीय सभा केवळ राष्ट्रीय स्वरूपाच्या प्रश्नाचा विचार करेल असा इशारा

---

१६. आ. जावडेकर: आ. भारत पृ. २३५-३६

१७. पूर्वोक्त, पृ. ३१०

दिली होता. राष्ट्रीय काँग्रेस ही संपूर्ण देशाची, लोकांची सभा आहे केवळ हिंदूंची नव्हे म्हणून १८९५ पासून राष्ट्रीय अधिवेशनानंतर सामाजिक परिषदेचे अधिवेशन होऊ न देता राष्ट्रीय काँग्रेसला ख-या अर्थाने राजकीय संघटना बनविण्याचे काम टिळकांनी केले.

टिळक आणि लाला लजपतराय हे १८८९ मध्ये एकाच वेळी राष्ट्रीय सभेत सामील झाले आणि त्यांनी राष्ट्रीय सभेवर आपल्या विचाराचा प्रभाव प्रस्थापित करुन राजवटी विरुध्द जनतेत असंतोष निर्माण करण्यास सुरुवात केली. "रयतेने आपली दुःखे स्वतः सभेत हजर राहून सभेत सांगितली पाहिजेत किंवा निदान ज्यांच्या दुःखाबद्दल आम्ही सरकारशी लढतो ते ते लोक तरी सभेत असले पाहिजेत."[१८] असे शेतक-यांना आव्हान करुन प्रांतीक सभेत आणण्याचे प्रयत्न केले.

१९०५ च्या बंगालच्या फाळणीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या राजकारणाला तीव्र स्वरुप मिळून लाला, बाल, पाल या त्रयीने देशव्यापी चळवळ सुरु केली. लोकांना आपल्या हक्काची जाणीव करुन देवून त्यासाठी सरकारच्या कार्यात अडथळे आणून आपल्या मागण्या पूर्ण करण्यास भाग पाडायला लागले. बंगालमध्ये फाळणीविरोधी विदेशी मालावर बहिष्कार टाकण्याचे ठरविले तेव्हा टिळक बिपीनचंद्र पाल, लाला लजपत यांनी ह्या बहिष्कार चळवळीला राष्ट्रव्यापी स्वरुप देवून यहान मताला देशभर मान्यता मिळविण्यात यश मिळविले. बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण,

---

१८. केसरीतील लेख : भाग १, पृ. ५३६

स्वराज्य ह्या चतु:सूत्री कार्यक्रम जाहीर करुन त्याचा प्रचार संपूर्ण देशात केला. त्याशिवाय सरकार ठिकाणावर येणार नाही हेही लोकांना पटवून दिले.

स्वदेशी मालाचा पुरस्कार करुन विदेशी मालावर बहिष्कार टाकावा. मातृभाषेतून राष्ट्रीय शिक्षण देवून राष्ट्रजागृती घडवून स्वराज्याची मागणी करावी आणि सरकारच्या जुलमी कायद्यांचा विरोध करावा हे केसरीतुन टिळक जनतेला पटवून देवु लागले. वेळ पडल्यास त्यांनी नेमस्तावरही टिका केली. काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी भिक्षादेही वृत्ती सोडावी आणि अपमानीत बंगाली लोकांना सहकार्य करुन सरकारशी लढा द्यावा असे आव्हाहन नेमस्तांना केले. मातृभाषेतून जनजागृती लवकर होऊ शकते असा विश्वास टिळकांना असल्यामुळे त्यांनी आपले विचार "केसरी" या मराठी वृत्तपत्रातुन जनतेपर्यंत पोहचविले आणि त्यांच्या मताप्रमाणे जनजागृती होण्यास सुरुवात झाली होती. १५ ऑगस्ट १९०७ च्या लेखात "मागे न पाहता पुढे कुशाल चा. सरकारच्या दडपशाहीला भिक घालु नका- असे आव्हान त्यांनी जनतेला केले. "राष्ट्रीय बहिष्कार" हा केसरीतील टिळकांचा लेख इतका लोकप्रिय झाला की त्याचे भाषांतर प्रांतीय भाषेत करुन देशभर प्रसिध्द झाले संपूर्ण देशात त्यामुळे स्वदेशी आणि बहिष्काराचे वारे निर्माण झाले व देशात सर्वत्र नवचैतन्य निर्माण झाले.

टिळकांचे अनुयायी तात्यासाहेब केळकर, कृष्णाजीपंत खाडीलकर, गंगाधरराव देशपांडे, दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, बापुजी अणे इत्यादी महाराष्ट्रातील पुढाऱ्यांनी टिळकांचा संदेश महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण राष्ट्रात पोहचविण्यास मदत केली. बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय, अरविंद घोष टिळकांच्या चतु:सूत्री कार्यक्रमाला पाठिंबा दर्शवून देशात कर्झन

विरोधी राजकारण सुरु केले होते. यामुळे मात्र नेमस्तांना जहालगट प्रभावी होतो की काय? ही भिती वाटल्यामुळे टिळकांना राष्ट्रीय काँग्रेसचा अध्यक्ष होण्याला किंवा त्यांच्या कोणत्याही ठरावाला संमती न देण्याचे धोरण स्विकारले.[१९]

नेमस्तांच्या ह्या दुराग्रही धोरणामुळेच सुरतची काँग्रेस मोडली. सुरत काँग्रेस मोडल्यानंतरही नेमस्तांनी वेगळी काँग्रेस भरवू नये कारण तिला जनतेचा पाठिंबा मिळणार नाही आणि सरकारवर तिचा दबाव पडणार नाही असे टिळकांना वाटत असल्यामुळे त्यांनी संयुक्त काँग्रेस करण्याचा प्रयत्न केला हे त्यांचे लेख व भाषणे यावरुन दिसून येते. देशहितापुढे मानापमान बाजूला सारावे असे त्यांचे मत होते. पण त्यांच्या या प्रयत्नाला अनेकांनी "लोचटपणा" हे नाव दिले तर नेमस्तांनी "टिळकांना नवीन काँग्रेस स्थापन करण्याचे धैर्य नाही म्हणून ते पुन्हापुन्हा आमच्याकडे येत आहेत." असा आरोप करुन टिळकांना देशहित साधू दिले नाही. "सुरत काँग्रेस कोणी मोडली? या मुद्यावर अनेक उलट सुलट विचार टिळकांनंतरही सुरु होते. पण बहुतेकांनी टिळकांना पूर्णपणे दोषी ठरविले नाही हे त्यांच्या समकालीनांनी लिहिलेल्या पुस्तकावरुन लक्षात येते.

स्वदेशी पुरस्काराची कल्पना जुनीच असली तरी तिचा राजकीय शस्त्र म्हणून वापर करण्याचा विचार नविन होता नेमस्तांना स्वदेशी मालाचा वापर करण्यात विरोध नसला तरी देशात पुरेसे उत्पादन नाही म्हणून बहिष्काराला विरोध होता, राष्ट्रीय शिक्षण या शस्त्रांची भर टिळकांनी टाकली होती. नेमस्त व जहाल यांचे मतभेद स्वदेशी, बहिष्कार संबंधी असला तरी नेमस्तांनी भुमिका आठमुठेपणाची होती हे दिसून येते. "स्वराज्य" हे जहालांचे ध्येय बनले आणि ध्येयप्राप्तीसाठी एकनिष्ठेने

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१९ भा.द. खेर, लोकमान्य टिळक दर्शन, पृ. ७४-७५

कार्यप्रवण भूमिका घेणे जहालांना योग्य वाटत होती "आजचे जहाल उद्याचे नेमस्त होत असे टिळकांना वाटत असल्यामुळे "जहाल" हे प्रगती सूचक नाव आहे असे त्यांचे मत होते. राष्ट्रीय सभेचे हे स्वरूप पुढे कायम राहीले. कालान्तराने टिळकांचे अनुयायी म्हणविणारे हे राष्ट्रीय सभेतून बाहेर पडले होते. पण टिळकांनी जे राष्ट्रीय सभेचे स्वरूप सुधारले ते बदलले नाही"[२०] हे लक्षात ठेवायला हवे.

टिळकांच्या विचारसरणीतील लोकाभिमुखता आणि सुधारणा विरोध यातील विसंगती तत्कालीन परिस्थितीतून निर्माण झालेली होती. टिळकांनी दाखविलेला स्वाभिमान व बाणेदारपणामुळे जहाल संप्रदाय फोफावला.[२१] त्यांच्या लेखावरून त्यांच्या लोकाभिमुख राजकारणाचे स्वरूप लक्षात येते. "ब्रिटिश सरकार विरुध्द जी देशाचे विरोधी भावना निर्माण झाली त्या लाटेत नेमस्त राजकारण वाहून गेले" असे अरविंद घोषांनी म्हटले आहे. बहिष्कार मार्गाने स्वराज्याचा जन्मसिध्द हक्क प्राप्त करून घेता येईल. अशी लोकमान्यांची श्रध्दा होती असे तळवळकरांनी म्हटले आहे.[२२] टिळकांना आपल्या कोणत्याही समकालीन भारतीय नेत्यापेक्षा अधिक लोकप्रियता मिळाली पण राजकीय नेत्याच्या यशाचे गमक केवळ त्याची लोकप्रियता असत नाही. मनुष्य बळ व साधनसामुग्री यांच्यावरील नियंत्रणाचे साधन असलेल्या सत्तेची प्राप्ती हे अन्य कोणत्याही राजकारण्याप्रमाणे टिळकांचेही साध्य असले पाहिजे ह्या निकषाचे तपासून पाहता टिळकांचे अपयश नजरेत भरते. समारंभ, सोहळ्या प्रसंगीचा लोकांचा उदंड उत्साह ही राजकारणाच्या जमेची बाजू मांडता येत नाही. "असंतोषाचे जनक"

---

२०. गो. पारिख, आ.रा. शिल्पकार, पृ. ३७–३८

२१. नलिनी पंडित, महाराष्ट्रातील रा. विकास, पृ. ८८

२२. ग. तळवलकर : नौरोजी ते नेहरु: पृ. १३२

ठरलेल्या टिळकांना शासनाने दंड शक्तीचा वापर करून सत्तेच्या राजकारणाच्या दृष्टीने कायमचे पायबंदी करून टाकले होते. शासन यंत्रणेच्या औपचारिक चौकटीत त्यांना आजन्म प्रवेश मिळू न देण्याचा कट केला होता. त्यामुळे राज्यकर्ते व भारतीय जनतेतील मध्यस्थांची भूमिका करता आली नाही व राष्ट्रीय चळवळीवर ते आपली मते लादू शकले नाहीत. ज्या मार्गांनी टिळकांनी सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला तो अंशतः त्यांच्या अपयशास कारणीभूत ठरला. नव्या जुन्या परंपराचा त्यांनी आश्रय घेतल्यामुळे दक्षिणेत त्यांना मोठा अनुयायी वर्ग लाभला असला तरी त्यामुळे असंख्य विरोधक ही निर्माण झाले. पंजाब, बंगाल, मद्रास इ. प्रांतातील लोकांना गणपती व शिवाजीच्या उत्सवातील प्रेरणा जाणणे शक्य नसल्यामुळे टिळकांचा राष्ट्रवाद महाराष्ट्रपुरताच मर्यादित राहिला आणि महाराष्ट्र हे काही त्यावतत राजकीय केन्द्र नव्हते.[२३]

टिळकांच्या देशभक्ती आणि स्वार्थत्यागाबद्दल लोकांच्या मनात आदर असला तरी सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा मिळवून देशव्यापी चळवळ उभारण्यास लागणारे सामर्थ्य त्यांच्या पक्षास कधीच प्राप्त झाले नाही. तरी पण राजकीय चळवळीमधून जनतेला आपल्या सामाजिक हक्कांची जाणीव होत होती. राष्ट्रवाद जागृत करून राजकीय चळवळीचे महत्व पटवून राज्यकर्त्यांनी घालविलेल्या मानसिक बौध्दिक, आर्थिक कुचंबणेवर प्रकाश टाकून आपल्या राजकीय कार्याला चालना मिळवून दिली. राजद्रोहाच्या खटल्यामुळे त्यांच्या रूपाने भारतीय जनतेसमोर राजकीय नेत्याचा नवीन आदर्श प्रथमतःच उभा राहिला. चिरोलने म्हटल्याप्रमाणे "टिळकांना "भारतीय असंतोषाचे जनक" म्हणणे अन्यायकारक ठरेल. कारण असंतोषाला एक नकारात्मक, विध्वंसक बाजू प्राप्त होते पण टिळकांचे सकारात्मक,

---

२३. मोठे : आ. भा. रा. विचार : पृ. २६५-६६

रचनात्मक कार्य केले आहे. जनतेला निर्भय करण्याचे मोठे कार्य त्यांनी केल्यामुळे त्यांना "भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार" असे परिखांनी टिळकांना संबोधले आहे. कारण त्यांनी राष्ट्रवाद जागृत करण्याचे कार्य पूर्णत: यशस्वी पणे केले नसले तरी प्रयत्न केले होते. २० जुलै १९०५ च्या बंगालच्या फाळणीने निर्माण झालेल्या सार्वत्रिक असंतोषामुळे, जहाल राष्ट्रवादी गटाला राष्ट्रसभेत आपला प्रभाव पाडण्यास संधी मिळाली. अशावेळी क्रांतिकारकांच्या कणखर ध्येयवादाचा व्यवहार्य व परिणामकारक साधनांशी मेळ घालून तरुणांच्या त्यागबुध्दीला व पराक्रमाला प्रोत्साहन देणाऱ्या तडफदार नेतृत्वाची जेव्हा गरज राष्ट्राला होती तेव्हा जहालवादी राष्ट्रीय पक्षाने ही जबाबदारी स्वत:वर घेतली. टिळकांनी मिळालेल्या ह्या संधीचा फायदा राष्ट्रव्यापी चळवळीत करुन घेतला. सामान्य लोकांच्या शांततामय प्रतिकारावर आधारलेला बहिष्काराचा न्याय कायदेशीर पण प्रखर मार्ग शोधून आपला पक्ष प्रबळ बनविला आणि लोकांची त्याग भावना जागृत केली.[२४]

१९०८ च्या राजद्रोहाच्या आरोपामुळे झालेल्या तुरुंगवासामुळे १९०८-१४ या काळात राष्ट्रीय चळवळीची बरीच पिछेहाट झाली. सरकारच्या दडपशाहीने मुठभर तरुणांच्या दहशतवादाचा तर बिमोड झालाच पण राज्यकर्त्यांचा रोष ओढवून घेणे मध्यमवर्गाला झेपण्यासारखे नसल्यामुळे बहिष्काराची चळवळ हळूहळू मंदावत गेली. राष्ट्रीय प्रवृत्तीच्या पुढाऱ्यांना आणि पत्रकारांना सरकारने भराभर तुरुंगवासात पाठविल्यामुळे जहाल सांप्रदायाची वाताहत झाली म्हणून टिळकांच्या अनुपस्थितीत राष्ट्रसभा पुन्हा मवाळांच्या हातात कायम राहिली.

---

२४. नलिनी पंडित : म. रा. विकास पृ. १०३-१०४

नेमस्तांनी मोर्ले मिन्टो सुधारणेचे स्वागत करून पुन्हा सहकार्याचे धोरण सरकारशी सुरु केले. त्यामुळे लोकांची राजकीय जाणीव आणि अपेक्षांच्या मानाने त्या सुधारणा अगदीच कमी असल्यामुळे जनतेची आगतीकता आणि नैराश्य कायम राहिले.[२५]

टिळकांच्या जहाल राजकीय कार्याची बांधणी नीट झाली नसल्यामुळे त्यांचे राजकारण त्यांच्या अनुपस्थितीत हळूहळू अस्तास गेले आणि पुढे त्यांच्या बरोबर जहाल पक्षही लयास गेला. तरीपण १८८५-१९०८ पर्यंत टिळकांनी देशाला परकीय सत्तेविरुद्ध जागृत करण्याचे महान कार्य घडवून आणले हे विसरता येत नाही. त्यांच्या राजकारणाच्या प्रभावामुळे पुढे गोखले, गांधी, नेहरूंना पुढे राजकीय पाऊल टाकणे सोपे पडले हे मान्य करावे लागेल. टिळकांपूर्वी भारतीय स्वातंत्र्य संग्राम बाल्यावस्थेत होता. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य राजकारणाला तारुण्य प्राप्त करून दिले होते. जरी त्यांचा जहाल गट नष्ट झाला असला तरी त्यांच्या कार्याचा लोकांवर प्रभाव पडलेला होता. आणि त्यामुळेच देश स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जनता तय्यार राहिलेली दिसून येते.

---

२५. नलिनी पंडित : म. रा. विकास : पृ. ११५

## संदर्भग्रंथसूची


**प्राथमिक साधने :**

१. बाळ गंगाधर टिळक — लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख, राजकीय खंड १ ला, आवृत्ती १९२२ नरहर चिंतामणी केळकर, केसरी मराठा संस्था, पुणे.

२. टिळक बा. ग. — लो. टिळकांचे केसरीतील लेख, राजकीय खंड २ रा, आवृत्ती, १९२४, न. चिं. केळकर, केसरी मराठा संस्था, पुणे.

३. टिळक बा. ग. — लो. टि. के. लेख, राजकीय खंड ३ रा, आवृत्ती १९२६, न. चिं. केळकर, केसरी मराठा संस्था, पुणे.

४. टिळक बाळ ग. — लो. टि. के. लेख, राजकीय खंड ४, आवृत्ती, १९२८ केसरी मराठा संस्था, पुणे.

**दुय्यम साधने :**

१. भोळे भास्कर लक्ष्मण — आधुनिक भारतातील राजकीय विचार, आवृत्ती १९७८ ऑगस्ट, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

२. जावडेकर आचार्य शं. द. — आधुनिक भारत, आवृत्ती २९ मार्च १९६८ रा. ना. सरनाईक, सुलभ मुद्रणालय, २१७, शनिवारपेठ, पुणे-२

३. केळकर न. चिं. — लोकमान्य टिळक यांचे चरित्र, पूर्वार्ध १८९८ पर्यंत, आवृत्ती १९२३, जगद्हितेच्छु छापखाना ५०७ शनिवारपेठ, पुणे.

४. केळकर न. चिं. — लो. टिळक यांचे चरित्र, उत्तरार्ध, १८९९-१९१४, आवृत्ती १९२८ जगद्धितेच्छु छापखाना, ४०७, शनिवारपेठ, पुणे.

५. करंदीकर म. अ. — आधुनिक भारताचे शिल्पकार, बाळ गंगाधर टिळक, आवृत्ती १९७२, पतियाला हाउस, नवी दिल्ली.

६. खापर्डे बा. ग. तथा बाबासाहेब खापर्डे — दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र, आवृत्ती १९६२ प्रसाद प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे-२.

७. खेर भा. द. — लोकमान्य टिळक दर्शन, आवृत्ती १९७२ ज.श्री. टिळक, केसरी प्रकाशन, पुणे, ५६८ नारायणपेठ, पुणे-30

८. पारिख गोवर्धन — भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार – बाळ गंगाधर टिळक, आवृत्ती १९६९ मौज प्रकाशन, मुंबई – ४.

९. पंडित नलिनी — महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास आवृत्ती १९७२, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे.

१०. फाटक नरहर रघुनाथ — लोकमान्य, आवृत्ती १९७२, मौज प्रकाशन गृह, मुंबई

११. पाध्ये टिकेकर — आजकालचा महाराष्ट्र, आवृत्ती १९३५ भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई.

१२. पट्टाभि सितारामय्या — कॉंग्रेसका इतिहास, आवृत्ती १९३६ सस्ता साहित्य मंडळ, हिन्दुस्थान टाईम्स प्रेस, दिल्ली.

१३. पळशीकर वसंत. टिळक नेतृत्वाची उभारणी, आवृत्ती १९७३ समाज प्रबोधन पत्रिका, नोव्हें.डिसे.

१४. तळवलकर शरद नौरोजी ते नेहरु, आवृत्ती १९६९ मॅजेस्टिक बुक स्टाल, गिरगाव नाका, मुंबई

<u>ENGLISH BOOKS</u> :

1. Keer Dhananjay Lokmanya Tilak, Father of the Indian Freedom struggle, 1969 Popular Prakashan, Bombay.

2. Paravate D.V. Lokmanya Tilak, 1972, Shantilal Harjivan Shaha, Navajivan Press, Ahamadabad 14

3. Tahmankar D.V. Father of the Indian unrest and Maker of the Modern India, 1956 John Murrarj Publisher 50, Albemarle Street, London.